# सुब्बण्णा

कन्नड कादंबरी

लेखक
डॉ. मास्ती व्यंकटेश अय्यंगार

अनुवादक
डॉ. वा. द. बेंद्रे

साहित्य आणि संस्कृती मंडळ
महाराष्ट्र राज्य

भाषांतरमाला क्र. ३४

# सुब्बण्णा

[डॉ. मास्ती वेंकटेश अय्यंगारलिखित "सुब्बण्णा"
या कन्नड कादंबरीचा अनुवाद]

अनुवादक

डॉ. वा. द. बेंद्रे

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : १९७४ (शके १८९५)

© भाषांतरित आवृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकाधीन.

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई — ३२.

मूळ प्रकाशक :
डॉ. मास्ती वेंकटेश अय्यंगार,
बसवन गुडी एक्स्टेन्शन,
बंगलोर.

मुद्रक :
श. म. देव
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार पेठ, पुणे ३०.

किंमत रु. ३ — ००

# निवेदन

मराठी भाषेला व साहित्याला ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात पश्चिमी भाषांचा दर्जा प्राप्त व्हावा; इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी भाषांना जसे विद्यापीठीय स्तरावर स्वयंपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे, तसे मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे; इंग्रजी भाषेला व साहित्याला आज भारतीय विद्यापीठांमध्ये जसे प्रमुख स्थान आहे तसे स्थान महाराष्ट्रामधील विद्यापीठात मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने साहित्य आणि संस्कृति मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. विश्वकोश, मराठी महाकोश, वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत आहेत.

संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटिन इत्यादी पश्चिमी भाषांतील अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा भाषांतरमालेचा उद्देश आहे.

भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्याना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्य व भारतीय भाषांतील सुमारे ३०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस्, ॲरिस्टोफेनीस्, युरिपिडिस्, प्लेटो, ॲरिस्टॉट्ल, थॉमस ॲक्वाइनस्, न्यूटन, डार्विन, रूसो, कांट, हेगेल, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉल्स्टॉय्, दोस्तएव्स्की, स्तानिस्लाव्स्की, बर्ट्रान्ड रसेल, रूथ बेनेडिक्ट, रायशेन्बाख, व्हाइटहेड, क्रोचे, मालिनव्स्की कासिरेर्, गॉर्डन् व्ही. चाइल्ड् इत्यादिकांचा या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भरताचे नाट्यशास्त्र, संगीतरत्नाकर, ध्वन्यालोक, प्राकृतातील गाथासप्तशती, पालीतील धम्मपद, त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

मंडळाच्या भाषांतर योजनेखाली मंडळाने आतापर्यन्त अनेक अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिलचे "On Liberty", रूसोचे "Social Contract", एम्. एन्. रॉयचे "Reason, Romanticism & Revolution" व "Letters from Jail", स्तानिस्लाव्स्कीचे "An Actor Prepares" तुर्गेनेव्हचे "Fathers & Sons", रायशेनबाखचे "Rise of Scientific Philosophy", गन्नर मिरदालचे "Economic Theory and Under-developed Regions", कै. पां. वा. काणे यांचे "History of Dharmshastra", कोपलँडचे "Music & Imagination" इत्यादी पुस्तकांची भाषांतरे व सारानुवाद प्रकाशित झाली आहेत.

मंडळाच्या भाषांतर-योजनेत कन्नड, गुजराती, बंगाली, तेलुगु, तामिळ इत्यादी भारतीय भाषांतील अभिजात ग्रंथांचाही समावेश आहे. प्रस्तुत भाषांतर हे डॉ. मास्ती वेंकटेश अय्यंगार यांच्या "सुब्बण्णा" या कन्नड कादंबरीचे आहे. सदर भाषांतर डॉ. वा. द. बेंद्रे, धारवाड यांनी मंडळाच्या वतीने केले असून ते "सुब्बण्णा" या शीर्षकाने मंडळाच्या भाषांतर-योजनेत प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

या कादंबरीचे मराठी भाषांतर प्रकाशित करण्यास साहित्य-संस्कृति मंडळास परवानगी दिल्याबद्दल डॉ. मास्ती वेंकटेश अय्यंगार यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

| | |
|---|---|
| वाई. | लक्ष्मणशास्त्री जोशी |
| दिनांक २० फेब्रुवारी १९७४ : | अध्यक्ष, |
| १ फाल्गुन १८९५ : | महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ, |
| | सचिवालय, मुंबई - ३२. |

सदर पुस्तक सुरुवातीला जोड पुस्तक म्हणून छापावयाचे ठरले होते. पण आता काही अपरिहार्य शासकीय व वैधिक कारणांस्तव ते स्वतंत्र छापण्याची जरूर असल्यामुळे पृष्ठ-क्रमांक २९ पासून सुरू झाले आहेत. तरीही हे भाषांतर संपूर्ण आहे. त्यात मूळचा कोणताही भाग गाळलेला नाही.

**प्रकाशक**

# सुब्बण्णा

# डॉ. मास्ती वेंकटेश अय्यंगार

**- श्रीनिवास -**

**(जन्म ६–६–१८९१)**

बऱ्याच प्रख्यात लोकांची जीवन-चरित्रे पाहता, त्यांच्या यशस्वी जीवनाची वाटचाल ही दारिद्र्याच्या वाळवंटातूनच झालेली आहे असे आढळून येईल. याला डॉ. मास्ती वेंकटेश अय्यंगारही अपवाद नाहीत. ते गरीब घराण्यात जन्मले. खेड्यात वाढले. पण संस्कृत धार्मिक ग्रंथ, रामायण-महाभारत इत्यादींच्या सहवासात, भारतीय जीवनदृष्टीच्या समृद्ध वातावरणात पोसले गेले. अंगच्या हुषारीमुळे वरच्या हुद्यावर चढले. डॉ. मास्ती मद्रास विद्यापीठाच्या एम्. ए. पदवी परीक्षेत इंग्लीश विषयात पहिले आले. म्हैसूर सिव्हिल सर्व्हिस परीक्षेतही त्यांनी पहिला क्रमांक मिळविला. त्यामुळे असिस्टंट कमिशनर, रेव्हिन्यू कमिशनर इत्यादी मोठमोठे हुद्दे त्यांनी भूषविले. त्यांची मातृभाषा तंमीळ; पण ते कन्नड कवी, नाटककार, कथालेखक, कादंबरीकार, समीक्षक म्हणून प्रसिद्धीस आले. आधुनिक कन्नड कथावाङ्मयाचे जनक म्हणून कन्नड साहित्यातले त्यांचे स्थान श्रेष्ठ आहे.

भारतीय साहित्य व संस्कृती आणि पाश्चिमात्य साहित्य व संस्कृती यांचा सखोल अभ्यास डॉ. मास्तींनी केलेला आहे. राजवाड्यापासून झोपडीपर्यंतचे विविध थरांचे जीवन त्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिलेले आहे. लहानपणी गरिबी व मोठेपणी अधिकार अशा परस्परविरोधी वातावरणात डॉ. मास्ती वाढले. गरिबीत आत्मगौरवाला धक्का न लागू देण्याची दक्षता त्यांनी घेतली, तर मोठेपणी अधिकाराची मदोन्मत्तता त्यांना स्पर्श करू शकली नाही. विद्वत्ता, जीवनातील सुखदुःखे निरखून पाहण्याची आवड, परदुःख शीतल न मानण्याची मनोवृत्ती इत्यादी गुणांमुळे डॉ. मास्ती अधिकारक्षेत्रातून साहित्याक्षेत्रात खेचले गेले असे म्हणावे लागते.

१९१० पासून आजपर्यंत डॉ. मास्तींची साहित्यसेवा अव्याहत चालू आहे. तेरा कथासंग्रह, बारा कवितासंग्रह, विसाहून अधिक नाटके, आठ समालोचनात्मक ग्रंथ, दोन कादंबऱ्या, दोन जीवन-चरित्रे, एक आत्मचरित्र इत्यादी ६० वर ग्रंथ त्यांनी आजवर प्रकाशित केलेले आहेत. त्यांचे आत्मचरित्र 'भाव' या नावाने प्रसिद्ध झाले आहे. त्यामध्ये जीवनातले कोणतेही खाचखळगे व चढउतार त्यांनी लपवून ठेवलेले नाहीत. त्यांचा सडेतोडपणा या आत्मचरित्रातही प्रकर्षाने दिसून येतो.

१९४४ पासून सतत २१ वर्षे 'जीवन' नावाचे मासिक चालवून पुष्कळ लेखकांना त्यांनी उजेडात आणले. एवढेच नव्हे तर धनसाहाय्य देऊन, आपल्या मित्रांच्या साहाय्याने, खालील लेखकांची पुस्तके प्रकाशित करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे :

(१) कुवेंपु – 'कोळलु'.
(२) द. रा. बेंद्रे – 'गरी'.
(३) गोरूर रामस्वामी अय्यंगार – 'हळ्ळीय चित्रगळु'.
(४) देबुडु नरसिंहशास्त्री – 'विचारणे'.
(५) पु. ति. नरसिंहाचार्य – 'हणते'.

(६) टी. पी. कैलासम् — 'हुत्तदाळ्ळि हुत्त'.

हे सारेच लेखक नंतरच्या काळात कन्नड साहित्यातील प्रख्यात लेखक झाले.

'The poetry of Valmiki' आणि 'The popular culture of Karnatak' या त्यांच्या दोन्ही पुस्तकांना वाचकांकडून मान मिळालेला आहे. यांच्या काही कथासंग्रहांचे व चन्नबसवनायक या कादंबरीचे इंग्रजी भाषांतर प्रकाशित होऊन तर बरीच वर्षे झाली.

१९२९ साली बेळगावमध्ये भरलेल्या १५ व्या कन्नड साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद डॉ. मास्तींनी भूषविले. १९४४ मध्ये भरलेल्या अखिल भारत ओरिएंटल कॉन्फरन्सचे ते अध्यक्ष झाले. १९५७ साली कर्नाटक विद्यापीठाने डॉक्टरेट पदवी देऊन त्यांचा गौरव केला. १९६८ साली 'कथासंग्रह १२-१३' याला साहित्य अकादमीकडून पुरस्कार मिळाला. डॉ. मास्तींनी कन्नड साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष म्हणूनही मोलाचे काम केलेले आहे.

"माझ्या वडीलांनी पूजिलेला रामराय माझ्या अंतरंगात असून मात्यापित्यांप्रमाणे माझे रक्षण करीत आहे व गुरूप्रमाणे सन्मार्गदर्शनही करीत आहे" असे डॉ. मास्तींनी सांगितलेले आहे. 'रामायण' हा त्यांचा उपास्यग्रंथ आहे. म्हणूनच त्यांनी १९७२ मध्ये 'श्रीराम पट्टाभिषेक' या नावाचे काव्य लिहिले. 'रामायण' महाकाव्याचा ओघ डॉ. मास्तींच्या हृदयी स्थिर आहे. त्यांच्या स्वभावात रागरुसवा नाही. संथ पाण्याप्रमाणे त्यांची जीवनयात्रा चालू आहे. मंदस्मित हा त्यांच्या जीवनाचा गाभा आहे.

डॉ. मास्तींच्या आजवर ७८ लघुकथा प्रसिद्ध झाल्या असून त्यांची छापील पृष्ठसंख्या १२५० होईल असा अंदाज प्रा. ए. एन्. मूर्ती राव यांनी केलेला आहे. 'नवरात्री' नावाचे पाच काव्यकथासंग्रह आहेत. डॉ. मास्तींच्या व्यक्तिमत्त्वात कथालेखक व कवी यांचा मनोज्ञ मिलाफ झाल्यामुळे त्यांच्या लघुकथा म्हणजे जणू गद्य भावकाव्यच आहेत. त्यांनी लिहिलेल्या लघुकथांमध्ये सामाजिक, राजकीय व कौटुंबिक अशा तीन तऱ्हेच्या कथा आहेत. त्यांच्या अनेक कथा कर्नाटकातील घरोघरी परिचित आहेत. "वस्तू, अभिव्यक्ती, जगाची रीत व प्रतिभा या चौफेरातून दैवसाह्याने कोणतीही कला व्यक्त होते. डॉ. मास्तींच्या कथनकलेत वरील पाचही लक्षणे आहेत" असे डॉ. द. रा. बेंद्रे म्हणतात. त्याचप्रमाणे आणखी एके ठिकाणी त्यांनी असेही म्हटले आहे की, "डॉ. मास्ती कधीही अग्नीस पाणी म्हणणार नाहीत, सापास फूल म्हणणार नाहीत. वाघास वाघच म्हणतील. ते राखेला अंगारा मानणार नाहीत अगर कडू पदार्थास अट्टाहासाने गोड म्हणणार नाहीत." याचाच अर्थ असा की मास्तींची कथनकला शंभर टक्के निर्भेळ आहे; तिच्यात कसलीही भेसळ सापडणार नाही. डॉ. मास्ती कधीही अलंकारांच्या मोहात सापडत नाहीत. स्वभावोक्तीच त्यांच्या कथेचा, काव्याचा, नाटकाचा प्राण आहे. उत्प्रेक्षा त्यांना आवडत नाही.

कन्नड कथावाङ्मयात १९२० — ४२, १९४३ — ४७ व १९४७ नंतर असे तीन कालखंड पडतात. डॉ. मास्ती हे प्रथमखंडातील प्रमुख लेखक होत. पंजे, एम्. एन्. कामत व केरूर वासुदेवाचार्य हेही प्रथमखंडातीलच कथालेखक आहेत. लोकांना आवडणाऱ्या, भाषादेवीला भूषवणाऱ्या, जगातील इतर वाङ्मयातील उत्तमोत्तम कथांच्या उंचीला पोहोचतील अशा कथा लिहिणाराच लघुकथांचा जनक असू शकतो. पंजे, एम्. एन्. कामत, केरूर वासुदेवाचार्य व डॉ. मास्ती या चौघांच्या लघुकथा तुलनात्मकदृष्ट्या पाहिल्या असता वरील गुण फक्त मास्तींच्या कथेत प्रकर्षाने दिसून येत असल्यामुळे, डॉ. मास्तीच कन्नड

लघुकथेचे जनक आहेत असे श्री. गौरूर रामस्वामी अय्यंगार यांचे मत आहे. "जनकराजाकडे जसे सीतेचे जनकत्व जाते तद्वतच कन्नड लघुकथेचे जनक आहेत डॉ. मास्ती" असे डॉ. रं. श्री. मुगळींनी सांगितले आहे. कालिदासाच्या पूर्वीही संस्कृत वाङ्मय होतेच, परंतु कालिदासाने आपल्या अद्वितीय प्रतिभेने एक युग निर्माण नाही का केले? तद्वतच डॉ. मास्ती हेही लघुकथाक्षेत्रात एका कालखंडाचे निर्माते आहेत. देबुड्डु नवरत्न रामराव, आनंदकंद, ए. आर. कृष्णशास्त्री, 'डी. व्ही. जी.' हे या कालखंडातील लेखक आहेत. या सर्वच लेखकांच्या कथांना भारतीय संस्कृतीचा सुगंध लाभला आहे.

जीवनातील श्रद्धा रंगविणे, उपदेश करण्याच्या भरीस फारसे न पडणे, शुद्ध हास्यास वाव देणे, स्पष्ट, सरळ व सहजरीत्या सर्व काही सांगणे ह्या वैशिष्ट्यांनी डॉ. मास्तींनी आपला स्वतंत्र मार्ग लघुकथेला घालून दिलेला आहे. या मार्गाने गेलेले 'आनंद', श्रीस्वामी, के. गोपाल कृष्णराय यांनीही उत्तम लघुकथाकार म्हणून ख्याती मिळविलेली आहे.

'अ. न. कृ.', 'त. रा. सु.', 'निरंजन', बसवराज कट्टीमनी, 'चदुरंग' इत्यादी लघुकथाकार हे १९४३ नंतरच्या दुसऱ्या कालखंडाचे निर्माते आहेत. दलितवर्गाबद्दल दया, सामाजिक, विषमतेबद्दल चीड व बंडाला बंडानेच उत्तर देणे हा या कालखंडातील लेखकांचा दृष्टिकोन आहे.

१९४७ नंतर मनोवैज्ञानिक दृष्टिकोनातून नवकथा लिहिणाऱ्यांचा पंथ तिसरा. रामचंद्र शर्मा, यू. आर. अनंतमूर्ती, शांतीनाथ देसाई, यशवंत चित्ताल, पी. लंकेश, पूर्णचंद्र तेजस्वी इ. लोकांची नावे कन्नड नवकथाकार म्हणून घेतली जातात.

या तीनही कालखंडांत डॉ. मास्तींच्या लघुकथा प्रसिद्ध होत आल्या आहेत. कन्नड भाषिक लोकांचे जीवन व त्यांची संस्कृती याबद्दल डॉ. मास्तींना अपार प्रेम व अभिमान आहे. त्यांच्या कथाकथांमधून त्या संस्कृतीची जाण आपणास दिसून येते व तीच त्या कथांची प्रमुख आकर्षणशक्ती आहे. डॉ. मास्तींनी रवीन्द्रनाथ टागोर व रामकृष्ण परमहंस यांची जीवनचरित्रे लिहिलेली आहेत. याचा अर्थ असा नव्हे की, डॉ. मास्तींच्यावर या दोन्ही महापुरुषांच्या विचारांचा संपूर्ण पगडा आहे. कारण डॉ. रवीन्द्रनाथ टागोरांच्या कथेत वरचेवर होणारा उपदेशाचा मारा डॉ. मास्तींच्या कथेत नाही. कमीत कमी उपदेश हेच डॉ. मास्तींच्या कथेचे वैशिष्ट्य. संस्कृत नाटककार भास म्हणजे डॉ. मास्ती असे एक समीकरम श्री. के. शिवराम ऐताळ यांनी दिलेले आहे.

डॉ. मास्तींनी शेक्सपीअरची हॅम्लेट, ऑथेल्लो, किंग लियर, ट्वेल्थ नाईट ही नाटके व इतर काही नाटकांतील दृश्ये यांची कन्नड भाषांतरे केली आहेत. पुरंदरदास व कनकदास या संतांच्या जीवनावर आधारित नाटकेही त्यांनी रचली आहेत. कन्नड भाषा, साहित्य व संस्कृती याविषयीही त्यांनी अनेक ग्रंथांची रचना केलेली आहे. इतके विविध, विपुल, भारदस्त व मौल्यवान वाङ्मय त्यांनी निर्मिले आहे. त्यात 'सुब्बण्णा' ही सुदीर्घ कथा ही डॉ. मास्तींच्या व्यक्तीमत्त्वाचा एक पैलू आहे असे म्हणता येईल.

'सुब्बण्णा' ही सुदीर्घ कथा अथवा कादंबरिका १९२८ साली प्रथम प्रकाशित झाली. १९६४ सालापर्यंत त्या पुस्तकाची बारा पुनर्मुद्रणे झाली आहेत, हे या कादंबरीच्या लोकप्रियतेचे निदर्शक म्हणता येईल. १९४३ साली ह्या कादंबरीचे इंग्रजी भाषांतरही प्रकाशित झाले. आता १९७४ मध्ये प्रस्तुत मराठी भाषांतर रसिक वाचकांना देण्यात मला फारच आनंद वाटत आहे.

दिवंगत नवरत्न रामराव यांनी एकदा शामण्णा नावाच्या एका वयोवृद्ध गायकाची गोष्ट डॉ. मास्तींना सांगितली. दोघांनाही वाटले या वृत्तांतावर काही लिहिणे अवश्य आहे. पण शेवटी डॉ. मास्तींनी नवरत्न रामराव यांच्या संमतीने शामण्णाच्या जीवनात फेरफार करून, त्यास कलात्मकतेची कलाटणी देऊन 'सुब्बण्णा' ही कादंबरी रचिली. "कला लपविण्याची कला म्हणजे श्रीकृष्णाच्या तोंडात विश्वरूप दर्शन लपल्यासारखेच आहे" अशी उपमा, डॉ. मास्तींच्या सुब्बण्णाच्या कथनशैलीविषयी सांगतांना श्री. गौरीश कायकिंणींनी दिली आहे.

ह्या कादंबरीत सुब्बण्णाची आई, पत्नी, नीलासानी, मुंबईत मिठाई विकणारी बाई, सुभेदारांची बायको व मुलगी इतकी प्रमुख स्त्री-पात्रे येतात. प्रत्येक स्त्री-पात्राची रीत निराळी. त्यामुळे सुब्बण्णाचे जीवनही त्या अनुरोधाने हेलकावे खाते. स्त्री-पात्राच्या वैशिष्ट्यातून पुरुष-पात्र खुलविणे ही डॉ. मास्तींची एक खुबी आहे. सुब्बण्णाच्या आईत आईपणापेक्षा सासूपणा जास्त, पत्नीत आलेले भोग भोगणे या जातीची भारतीयता, नीलासानी वेश्या असूनही सुब्बण्णाच्या बाबतीत गोपीप्रमाणे भक्तिशील, मिठाई विकणाऱ्या म्हातारीत परस्परांवर उपकार करण्यातच जीवनाची सार्थकता आहे ही विशाल दृष्टी व सुभेदारांच्या पत्नीत श्रीमंतांनी कलाकारांनी सांभाळले नाही तर कोण सांभाळणार?- या दृष्टीची आश्रयबुद्धी डॉ. मास्तींनी दाखविलेली आहे.

संगीतात स्थायी व संचारी स्वर असतात. संचारी स्वरांचे आंदोलन हाच संगीताचा गाभा आहे. तद्वत् सुब्बण्णाच्या जीवनसंगीताचे संचार हेच प्रधान लक्षण आहे. देहाचा यथाकाली त्याग हा त्याच्या जीवनाचा स्थायी स्वर म्हणावा लागेल. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हेच जीवनाचे चार पुरुषार्थ. सुब्बण्णाच्या जीवनात मात्र या चारही पुरुषार्थांचा मिलाफ संगीतातच होतो. सामान्यपणे गवयांचे जीवन चमत्कारिक असते. कलावंत हा चारित्र्यहीनच असतो असे समजण्याचा एक काळ होता. पण डॉ. मास्तींनी मात्र 'सुब्बण्णा' हे निष्कलंक चारित्र्याचे पात्र रंगवून कलावंतावरील डागच जणू धुऊन टाकलेला आहे. संगीतसेवा करीतच एके दिवशी सुब्बण्णाचा प्राण जातो, हीच खरी मुक्ती. जीवनाचा बंध व मोक्ष हा प्रश्न डॉ. मास्तींनी कुशल रीतीने हाताळलेला आहे. हेच त्यांच्या कथनकलेचे कौशल्य होय.

संपूर्ण कादंबरीची प्रत वाचकांच्या हाती आहे, म्हणून आता जास्त लिहीत नाही. मराठी वाचकवर्गच रसिक दृष्टीने या कादंबरीचे मूल्यमापन करील. डॉ. मास्तींची कथनकला उच्च कोटीस पोचते ती त्यांच्या लघुकथेतून. त्यांच्या लघुकथेच्या निवडक संग्रहाचा मराठीत अनुवाद करणे योग्य होईल असे मला वाटते.

डॉ. मास्तींचा व माझे वडील डॉ. द. रा. बेंद्रे यांचा ऋणानुबंध जुना आहे. डॉ. मास्तींनी डॉ. बेंद्रे यांना संकटकाळी बहुमोल अशी मदत केलेली आहे. डॉ. बेंद्रे डॉ. मास्तींना थोरले भाऊ म्हणून मान देतात, त्याचप्रमाणे डॉ. मास्तींनीही डॉ. बेंद्रे यांचा आपला भाऊ म्हणून साहित्यातून उल्लेख केलेला आहे. डॉ. बेंद्रे यांनी आपले काही ग्रंथ डॉ. मास्तींना अर्पण केले आहेत.

मी लहानपणी फारच रागीट होतो. 'राग नसावा, हसू असावे' असे एक वाक्य त्यांनी आपल्या तपस्वी वाणीने सांगितले. त्या मंत्राच्या प्रभावाने माझ्या जीवनात फार मोठा बदल झाला. ह्या वैयक्तिक गोष्टीचा मी येथे उल्लेख करण्याचे कारण एवढेच की, साहित्यिकाच्या जीवनतपस्येवरच त्याच्या साहित्याचे मूल्य अवलंबून असते. विपुल साहित्य निर्माण करून कीर्ती मिळविलेल्या या ८३ वर्षांच्या वाङ्मयतपस्व्याच्या गौरवात माझ्या या भाषांतरित कृतीने अशी काय मोठी भर पडणार आहे? ह्यापूर्वी १९५३—५४ साली डॉ.

मास्तीरचित ‘अनारकली’ हे नाटक मी मराठीमध्ये आणले. माझ्या वडिलांनी त्या नाटकाकरिता मराठीतच गाणी रचून दिली. हस्तलिखित प्रत तयार झाली — व कोपऱ्यात पडून राहिली !

सेवाबुद्धीनेच मी हे भाषांतर केलेले आहे. मी काही मराठी लेखक नाही. भाषिक बांधव्य या उदात्त हेतूने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाच्या भाषांतर विभागाचे मानसेवी संपादक श्री. बा. रं. सुंठणकर यांनी हे काम मला दिले व मीही त्याच भावनेने ही सेवा केली आहे. असा हा सुयोग घडवून आणणाऱ्या साहित्य-संस्कृति मंडळाचा व श्री. सुंठणकरांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

माझ्या लेखनकार्यात माझी पत्नी सौ. विशाखा ही नेहमीच मदत करते. ती मदत याही कार्यात आहे हे मी नमूद केलेच पाहिजे. माझी ही सेवा साहित्य आणि संस्कृति मंडळाच्या द्वारा मी डॉ. मास्तींना समर्पित करीत आहे.

१८—२—१९४७

**वा. द. बेंद्रे,**
रीडर व प्रमुख
कन्नड विभाग,
किटेल् कॉलेज, धारवाड.

# १

श्री मन्महाराज तिसरे कृष्णराज वडेयर यांचा तो काळ. ते जेव्हा म्हैसूरच्या सिंहासनावर विराजमान झाले तेव्हा विद्वनांना, रसिकांना, कलाकोविदांना पूर्वी कधीही मिळाला नव्हता एवढा आश्रय त्यांच्या दरबारी मिळाला. महाराज स्वभावतःच उदार असून ते स्वतः विद्वान, शास्त्रज्ञ व कवीही होते. त्यामुळे त्यांना विद्येविषयी अत्यंत आदर होता. त्यांच्या आश्रयाच्या अपेक्षेने आलेल्या कुणालाच ते नाही म्हणत नसत. त्यांच्या उदार आश्रयाखाली आलेल्यांपैकीच एक होत पुराणिक नारायणशास्त्री. शास्त्रींचे पूर्वज चामराजनगराचे, पण गेल्या तीनचार पिढ्यांपासून त्यांचे घराणे म्हैसूरमध्येच होते. नारायणशास्त्रींनी संस्कृत भाषेमध्ये सर्वांगीण पांडित्य मिळविले होते. विशेषतः पुराण सांगण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांची वाणी गंभीर आणि रसाळ होती. त्यांचे बोलणे प्रवाही असून संथ होते. त्यामुळेच सभेमध्ये इतर पंडितांपेक्षा त्यांचे भाषण सरस ठरत असे. देवभक्तिपरायण महाराजांनी पुराण सांगण्याच्या कामी शास्त्रींची नेमणूक केली. वेळोवेळी त्यांना बोलावून महाराज पुराणश्रवण करीत असत. त्यामुळे 'पुराणिक नारायणशास्त्री' असेच त्यांचे नाव अधिक रूढ झाले.

नारायणशास्त्रींना दोन मुली व एक मुलगा. मुलगा सर्वात लहान. त्यांचे नाव होते सुब्बण्णा. वडिलांप्रमाणेच संस्कृत शिकून सुब्बण्णा पंडित झाला असता तर त्यालाही सुब्रह्मण्यशास्त्री असे म्हटले गेले असते. त्यानेही पुराण सांगितले असते, परंतु त्याचे मन संस्कृत भाषेकडे न वळता संगीताकडेच वळले. त्याला ओळखणारे सर्वजण त्याला 'सुब्बण्णा' अशीच हाक मारीत, 'सुब्रह्मण्य' असे कोणी म्हणत नसत. याचे कारण संस्कृत जाणणाऱ्यालाच सुब्रह्मण्य हे नाव शोभले असते. पण या गवयाला कशाला ते नाव? तो सुब्बण्णा म्हणूनच राहिला. त्याची जीवनकथा म्हणजेच आमची ही कथा.

मी सुब्बण्णांना जे पाहिले ते फार उशीरा. त्यांच्या बाळपणच्या गोष्टी त्यांच्याच तोंडून मी वेळोवेळी ऐकल्या होत्या. तोरेयपुरात माझे सासरे राहात असत. त्यांना सुब्बण्णांची राहणी चांगलीच परिचित होती. मीही त्यांना काही वेळा पाहिलेले आठवते. त्यांचे अखेरचे दिवस तर मी प्रत्यक्ष पाहिले. सुब्बण्णांविषयी आणखी काही गोष्टी मी इकडूनतिकडून समजूनही घेतल्या, तरीही सुब्बण्णा ही काय व्यक्ती होती ह्याचे निरूपण मी पूर्णत्वाने केले आहे असे मला म्हणवत नाही. कठीण शिळेत असलेले सुवर्णकण गोळा करण्यासाठी त्या शिळेचे चूर्ण करावे लागते, रसायन ओतावे लागते, वेगळे झालेले सोने तापवून शुद्ध करावे लागते. कठीण शिळा कुठे व त्यातील ते शुद्ध सोने कुठे ! त्याचप्रमाणे सुब्बण्णांचे कठीण हृदय हळूहळू देवकृपेने मृदू होत जाऊन संस्काराने ते शेवटी सोनेच बनले. असे जे घडले त्याचे विवेचन मी कसे करू? शुद्ध सोन्याचे मोल शब्दांत का वर्णिले जाणार आहे? पण ज्यांनी सुब्बण्णांचे परिवर्तन पाहिले आहे त्यांना मी थोडेसे सांगितले तरी सुब्बण्णांच्या परिपूर्ण जीवनाची कल्पना येईल. ही कथा वाचताना मी जे सांगितले आहे त्यावरच अवलंबून न राहता वाचकांनी कथानकास आपल्या कल्पनेची जोड दिल्यास ते अधिक रंगतदार होईल.

# २

सुब्बण्णा सुब्रह्मण्यशास्त्री झाले नाहीत हे मी सांगितले आहेच. या कथेचा सारांश यातच आहे असे म्हणावे लागेल. जेव्हा जन्मले तेव्हा नारायणशास्त्रींना फारच आनंद झाला. कारण त्यांना पहिल्या तीन्ही मुलीच असून त्यांतील एक वारली होती. चौथीही मुलगीच झाली असती तर काय करणार? पण तसे घडले नाही. पुत्रप्राप्ती म्हणजे त्यांच्या जीवनातील जणू पर्वणीच ठरली. त्यामुळे त्यांना एक प्रकारची पूर्णता लाभली. शास्त्रींच्या बायकोच्या मनासही उभारी आली. यामुळेच दोघांनीही मुलाला अत्यंत दक्षतेने वाढविले. मुलगा सातआठ वर्षांचा होताच शास्त्रींनी स्वतः त्याला अक्षरओळख करून दिली व अमरकोशातील एकदोन सर्ग त्याच्याकडून पाठ करवून घेतले. पण का कुणास ठाऊक त्याची विद्या पुढे काही वाढली नाही. जन्मतःच मुलाचा कल संगीताकडे होता. शास्त्रींचा गोड आवाज मुलात उतरला, पण त्यांची संस्कृताची आवड मात्र उतरली नाही असेच म्हणावे लागेल. सात वर्षांचा तो मुलगा 'यस्य ज्ञानदयासिन्धो' हे पद अनवट रागात गाऊन दाखवत असे, पण त्याचे लक्ष अर्थाकडे कधीच नसे. कधीकधी वडील त्याला पाठ शिकवून झाल्यावर बाहेर जाऊन येत. ते परतले तरी तो पाठ गोड गळ्याने गाण्यात मुलगा इतका रंगून जात असे की आपण काय शिकलो हेच तो विसरत असे. सुरुवातीला कुणीही घरी आले की त्यांच्या समोर मुलाचा श्लोक म्हणून दाखवण्याचा कार्यक्रम होत असे. त्या आईवडिलांनाही एक प्रकारचा अभिमान वाटत असे. ऐकणारेही त्याच्या गोड आवाजास मान डोलावून शाबासकी देत. त्यामुळे मुलाचे लक्ष संगीतावरच स्थिरावले. संस्कृतविषयी त्याला आस्था वाटेनाशी झाली.

राजवाड्यात अशी एक घटना घडली की त्यामुळे मुलाचा संगीताकडील ओढा जास्तच वाढला. एके दिवशी शास्त्री मुलासह अंतःपुरात पुराण सांगण्यासाठी गेले होते, तेव्हा त्यांनी मुलास 'शुक्लांबरधरं' श्लोक म्हणावयास सांगितले. सर्वांना त्याची गाण्याची पद्धत फारच आवडली. तेवढ्यात महाराजही तेथे आले व पुराण ऐकण्यास बसले. सुब्बण्णा वडिलांच्या जवळच बसून वडील जे जे सांगतील ते सारे लक्षपूर्वक ऐकत होता व मधूनमधून महाराजांच्याकडे वळून त्यांचा तो सुंदर चेहरा, कपाळावरील गंधाचा मोठा टिळा व विशाल चेहऱ्याला शोभून दिसणाऱ्या झोकदार मिशा पाहात बसला. महाराजांचेही लक्ष दोनतीन वेळा त्याच्याकडे गेले. मुलगा फारच चुणचुणीत दिसतो असे त्यांना वाटले. पुराण संपताच "शास्त्रीबोवा, हा तुमचा मुलगा काय?" असे त्यांनी शास्त्रींना विचारले. "होय, महाप्रभू" शास्त्री उत्तरले. महाराजांनी हसतहसत मुलाला विचारले, "काय, तुम्ही अप्पाजींच्यासारखं पुराण सांगणार का?"

"नाही, मी पुराण सांगत नाही. मी गाणं गातो."
"वा! फारच छान! म्हण पाहू एकादं गाणं."

'श्री राघवं दशरथात्मजं' हा श्लोक त्याने रागदारीत गाऊन दाखविला आणि 'कस्तूरीतिलकं....' हेही आपल्याला म्हणता येत असल्याचे त्याने सांगितले. महाराजांना त्याचा आवाज ऐकून फार आनंद झाला. लगेच त्यांनी एका ताटात पान-सुपारी व महावस्त्र मागवून मुलास दिले. "फार हुषार आहेस तू. संगीत चांगले शीक, म्हणजे आम्ही तुला दरबारी पोषाख देऊ." असे मुलास सांगून शास्त्रींना महाराज म्हणाले, "मुलगा चुणचुणीत दिसतोय शास्त्री ! उत्तम शिकवलंत तर तो मोठा प्रसिद्ध होईल."

शास्त्री व सुब्बण्णा घरी परतले.

सुबण्णांच्या डोक्यात महाराजांकडून दरबारी पोषाख मिळवला पाहिजे हे घोळू लागले. ते दृढनिश्चयी होते. लहानपणीसुद्धा ते हट्टी. महाराजांची कृपा संपादण्याचे ज्या दिवशी त्याच्या मनाने घेतले त्या दिवसापासून कोठेही गाण्याची मैफल होवो, तेथे तो जाऊन बसू लागला. लहान सहान मंडळांत गाऊही लागला. अवघ्या चौदाव्या वर्षी त्याने संगीतात अद्‌भुत प्रगती केली. त्यामुळे प्रारंभी सुब्बण्णाशी प्रेमाने, विश्वासाने वागणाऱ्या गवयांच्या मनात सुब्बण्णाविषयी काही वेळा कौतुक तर काही वेळा मत्सर वाटू लागला. सुब्बण्णा गात असे, एवढेच नव्हे तर मृदंग व फिडल वाजवण्यातही तो कुशल होता. वडिलांच्या मनात आपल्या मुलाला संस्कृत शिकवावे, पुराण-कथनकला शिकवावी असे असल्याचे सुब्बण्णास माहीत होते. त्यामुळे आपण संगीत ऐकायला जातो हे तो लपवीत असे. मुलाला संस्कृतात गोडी वाटत नाही याची व्यथा वडिलांना होती, शिवाय त्यांना आपल्या मुलाने संगीतात काय प्रगती केली आहे हे कळण्याचा कधी प्रसंगच आला नाही. मुलानेही आपण संगीतकला परिपूर्ण शिकून सर्वांना एकदम आश्चर्यचकित करावे असा बेत केला. आपण रोज काय करतो हे त्याने घरातील कुणालाच कळू दिले नव्हते.

सुब्बण्णास आपण संगीत शिकतो हे लपवून ठेवण्यास आणखी एक कारण होते. संगीतसभा काही वेळा विद्वानाच्या घरांत भरत होत्या, तर अनेक वेळा कलावंतिणींच्या घरी. सुब्बण्णाची संगीताची अभिरुची जसजशी वाढू लागली तसतसे तो कोठेही भरणाऱ्या संगीतसभेला जाऊ लागला. त्यामुळे म्हैसूरमधील जवळजवळ साऱ्याच वारांगनांच्या घरी त्याचे जाणेयेणे वाढले. थोडा रुंदट चेहरा, तेजस्वी डोळे, काळ्याभोर कमानदार भुवया, ओठावरची नुकतीच फुटलेली मिसरूड, लाल कुंकवाचा पुसट हात फिरवल्याप्रमाणे गुलाबी ओठ या सर्वांमुळे तो अत्यंत रेखीव दिसत असे. नित्यनियमित कर्मे करीत असल्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे आगळेच तेज होते. पिण्यासाठी सहजपणे आईचे स्तन चाचपणाऱ्या बालकाची निरागसता त्याच्या यौवनपूर्व सरळ वागण्यात दिसून येत होती. असे असल्यावर त्याच्यावर कोण बरे मोहित होणार नाही? नायकिणींना तर त्याच्याविषयी असाधारण आपुलकी वाटत होती. हा जेव्हाजेव्हा त्यांच्याकडे जाई तेव्हातेव्हा त्या त्याला दूध, फळफळावळे देत असत व एक गाणे गा असा आग्रह करीत. आणि जर सुब्बण्णाने त्यांना गाणे गाण्यास सांगितले तर त्या स्वखुषीने गाऊन त्याला आनंद देत असत. अशीच पंधरा वर्षे गेली. वडिलांच्या नकळत सुब्बण्णा संगीतात पारंगत झाला. प्रमुख संगीतकारांच्या मालिकेत त्याचे नांव गोवले जाऊ लागले. त्यामुळे कोठेही हिंडण्याचा अधिकार त्याला प्राप्त झाला.

हे सारे होण्यापूर्वीच सुब्बण्णाचा विवाह झाला होता. त्याच्या बायकोचे नांव मला निश्चित माहीत नाही. [याचे कारण सुब्बण्णा जेव्हाजेव्हा तिला उद्देशून बोलत तेव्हातेव्हा 'त्या' असाच उल्लेख करीत असत.] तिचे नांव काय असे विचारण्याचे माझ्या मनातच आले नाही. "ललिता हे नाव अगदी शोभिवंत आहे. ललितासहस्र प्रख्यात आहे. आमचं पालन करणारी माता ललिताच नाही का?" अशा तऱ्हेचे ते बोलत असताना एकदा थोडे थांबून "ह्या नांवाच्या बायकाच अशा. त्यांच्यात लोकमातेचा अंश असतो." असे ते म्हणाले. असा अभिप्राय व्यक्त करताना त्यांची दृष्टी कोठेतरी लांब भिडलेली होती. स्वप्नात भासमान होणाऱ्या आपल्या मृत पत्नीचे चिंतन करीत ते बोलत असावेत असेच मला वाटले. त्यामुळे सुब्बण्णाच्या पत्नीचे नाव ललिता होते असे आपण समजूया. सुब्बण्णाचे सतराव्या वर्षी लग्न झाले. शास्त्रींच्या मिळकतीवरच घरचा संसार चालू होता. सुबण्णांची मिळकत शून्यच होती. संगीत शिकवणाऱ्यांनी पैसा मिळवायचा झाला तर फार दिवस वाट पहावी लागते. पौरोहित्य शिकलेल्यांचे तसे नसते. कुठे ना कुठे काम मिळते किंवा पुराण सांगूनही घर चालवता येते. सुब्बण्णाने संगीतास वाहून घेतल्यामुळे मिळकतीच्या वरील वाटा बंद झाल्या. सुब्बण्णा मिळविण्याजोगा होऊनही शास्त्रींना संसार चालवण्यास त्याची मदत होत

नसे. आपला मुलगा मोठा होऊनही मिळवत नाही, भारभूत झाला आहे हे पाहून, वडील झाले तरी कसे स्वस्थ बसतील? शास्त्री एकेकदा मुलास रागावून काही बोलायचे. फार दिवस ते ऐकून घेऊन शेवटी एकदा मुलगा त्यांना म्हणाला, "मला कशाला बोलता? मला अन्न घालावं लागतं म्हणूनच ना हे सारं बोलणं? मी आपला निघून जातो. माझं पोट भरून घेण्यास मी समर्थ आहे."

त्यावर तत्काळ आई उत्तरली, "तू जाशील. पण तुझ्या बायकोला कोण पोसणार? तिलाही तुला घेऊन जावं लागेल! जाशील?"

"माझं लग्न करावयास कोणी सांगितलं होतं? मी कधी विचारलं होतं? तुम्ही लग्न केलंत. आता तुम्हीच पोसा तिला. तुम्हाला जमत नसेल तर तिला तिच्या माहेरी पोचवून द्या."

एकूण त्या दिवशी घरात भलतेच तंग वातावरण झाले. लगेच सुब्बण्णा कोठेतरी निघून गेला. त्याने जेवण केले नव्हते, त्यामुळे ललितेनेही जेवण सोडले. वडिलांनी कसेबसे दोन घास खाल्ले व तेही निघून गेले. आईने सुनेस पुष्कळ जेवणाचा आग्रह केला व "तुम्हाला कुणाला अन्न नको तर आता मी तरी कशी खाऊ?" असे म्हणून तिनेही जेवण सोडले. शास्त्रीदंपतीला त्या दिवशी पुत्रसुख म्हणजे काय ह्याचा एक आगळा—वेगळा अनुभव आला !

सुब्बण्णाची मिळकत नसली तरी संगीतात त्याचे प्रावीण्य पुरेसे होते. येत्या नवरात्रात महाराजांचे पुढे सुब्बण्णाची गाण्याची बैठक घडवून आणतो असे वीणावादकाने आश्वासन दिले होते. त्यामुळे सुब्बण्णाचा संगीताचा अभ्यास जोरदार सुरू झाला. घरी गाण्याचा रियाज करण्यास अनुकूलता नाही व उत्तेजनही नाही, त्यामुळे सुब्बण्णा आपल्या संगीताच्या अभ्यासासाठी एका वेश्येच्या घरी जाऊ लागला. वेश्येच्या सहवासाने तो बिघडला की नाही हे मी सांगू शकत नाही, कारण ते मला माहीत नाही. एवढ्यानेच माणूस बिघडतो म्हणजे तरी काय? वेश्या नीला ही सुब्बण्णाच्या गाण्यावर बेहद खूष होती; एवढेच नव्हे तर सुब्बण्णा ब्राह्मण असल्यामुळे त्याला ती देवाप्रमाणे मानीत होती. तिला पैशाला तोटा नव्हता. ती अनेक लोकांना हवीहवीशी वाटे, परंतु सुब्बण्णाविषयी मात्र तिच्या मनात नितांत भक्ती व विश्वास होता. स्वभावतः ती गोपस्त्रियांप्रमाणे कृष्णाची उपासक होती. रूपाने सुंदर, व्यक्तिमत्वाने, प्रभावी अशा या सुब्बण्णास पाहून तो जणू कृष्णच अशी तिची भावना झाली होती. तो घरी येताच पाय धुण्यास नीला पाणी देत असे. प्रशस्त माडीवर सुब्बण्णाच्या रियाजासाठी तिने एक स्वतंत्र खोली दिली होती. गालिचा, लोड, संगीताभ्यासास लागणारी फिडल, मृदंग इत्यादी वाद्ये यांनी ती खोली सुसज्ज होती. छोट्या टेबलावर ब्राह्मण आचाऱ्याकडून तयार करविलेले खाद्यपदार्थ ठेवलेले असत. सुब्बण्णा हातपाय धुऊन येऊन बसताच नीला हसतमुखाने खोलीत येत असे व पाचदहा मिनिटे हास्यविनोद करून 'आता आपण अभ्यासास प्रारंभ करा' असे सांगून ती घरात निघून जाई. सुब्बण्णा स्वतः फिडल वाजवत, सुचतील त्या ताना घेत, त्या कशा रंगतात ते स्वतःच पहात. तासन् तास योगात मग्न होत असे. एकेकदा जेवणाची वेळ होताच, 'देवा, आपली घरी जाण्याची वेळ झाली,' अशी नीलाने आठवण केली नाही तर सुब्बण्णास घरी जाण्याचे भानच रहात नसे.

त्या दिवशी भांडण झाल्यावरही सुब्बण्णा नीलाच्या घरी गेला. त्याचे मन अनेक कारणांमुळे दुखावले गेले होते. आपण घरी डोईजड झालो ही भावना त्याच्या असमाधानाचे प्रमुख कारण होती. बालपणी सारेच लोक वडिलांच्याकडे अगर इतर कुणाकडे तरी राहतात. तेव्हा आपण त्यांच्यावर विसंबून आहोत ही भावना नसते. थोडे मोठे होताच आपण जे काय करतो ते बरोबर नाही, दुसऱ्याकडे आपण का

जेवावे? दुसऱ्यावर का उगीच अवलबूंन रहावे? — असे विचार येऊ लागतात. त्याप्रमाणे सुब्बण्णालाही ही जाणीव वडील बोलून दाखवण्यापूर्वीच आलेली होती. परंतु यातून वाट काय, हा प्रश्न सुटला नव्हता. थोड्याच दिवसांत आपल्या शास्त्रीय संगीताची बैठक महाराजांपुढे करावी, त्यामुळे आपल्याला थोडीतरी कमाई होईल, अशी त्याला आशा होती. आपण जेव्हा सभेत गाऊ लागू तेव्हा ते पाहून वडिलांना फार बरे वाटेल. जेव्हा महाराज आपले मासिक वेतन ठरवतील तेव्हा ते एकून वडिलांचा ऊर अभिमानाने भरून येईल अशी स्वप्ने सुब्बण्णा मोठ्या आनंदाने पाहात असे. परंतु आता जे घडले त्यामुळे तो फारच त्रस्त झाला. मी नालायक व बेकार आहे असेच सारे समजताता काय? या बायकोची वेसण नसती तर मी कोठेही गेलो असतो. ही धोंडच माझ्या गळ्यात पडली आहे, असे विचार त्याच्या मनात भरकटू लागले. बायकोविषयी येवढेच का प्रेम, असे मला विचारू नका. अलीकडील प्रेम वैषयिक असते. पण पूर्वीच्या लोकांचे प्रेम बायकोविषयीच्या अश्रद्धेतून निर्माण होत असले तरी, पत्नीस लोकमाता मानण्याइतक्या भक्तीत त्याची परिणती होत असे. सुब्बण्णाचेही तसेच झाले. तो वयाने लहान असल्यामुळे त्याला बायकोविषयी अजूनही अश्रद्धाच होती म्हणा ना ! याचे कारण असे की त्या काळी पतिपत्नीने परस्परांविषयी उघड प्रीती दाखवण्याची पद्धतच नव्हती. ललिता सावित्रीप्रमाणे असूनही तिला सुब्बण्णाची सेवा करणे अशक्य होते. सुब्बण्णा जेव्हा घरी येई तेव्हा त्याला दुरूनच पाहून तिला संतोष मानावा लागत असे. 'तुझ्या नवऱ्याला पाय धुण्यास पाणी दे' म्हणून सासूने सांगितले तरच पाणी द्यावयाचे, नाही तर गप्प बसावयाचे.

एके दिवशी सुब्बण्णा येताच ती सहजपणे पाणी घेऊन पुढे आली तेव्हा 'काय काळ आला बाई ! पन्नास वर्षे संसार केलेल्या बाईपेक्षा ही आली आहे मोठी पाणी देणारी. आम्ही आमच्या वेळी असं काही केलं असतं..... तर......' त्या सबंध दिवसात पाचसात वेळा तरी हे उद्‌गार सासूबाईच्या तोंडून तिला ऐकावे लागले. 'देवा, ह्या जर आज घडलेलं विसरल्या तर पुनश्च मी असं कधी करणार नाही.' असे ललिता मनात म्हणाली व त्याप्रमाणे ती वागलीही. ललितेने पाणी दिलेल्या दिवशी आपल्या आईने काय गोंधळ केला हे सुब्बण्णास माहीत होते, परंतु तो काही बोलला नाही. त्याविषयी त्याने फार विचारही केला नसावा, इतका तो संगीतात मग्न असे. घरी ललिता जरी पाणी देत नसे तरी त्याला नीलाकडून पाणी मिळत होते. पुरुषाला काय, कोठेतरी एकीकडे अशी वागणूक मिळाली तर पुरे ! कोठे मिळाली नाही तरी ते फारसे मनावरही घेत नाहीत. नीला म्हणजे सुब्बण्णाच्या जीवनातील एक प्रमुख भाग व बायको म्हणजे एक अटळ जबाबदारी झाली होती. या साऱ्या कारणांमुळे विमनस्क झालेला सुब्बण्णा सारा दिवस नीलाकडे घालवून रात्री झोपण्यास तेवढा घरी आला.

शास्त्री घरी येऊन थोडा वेळ झाला होता. काही म्हटले तरी पितृहृदय ते! वयात आलेल्या मुलाला आपण असे बोलावयास नको होते असे त्यांना वाटावयास लागले व घरी येताच मुलगा आला का याची त्यांनी आपल्या पत्नीजवळ चौकशी केली. आधीच ती भुकेली होती, बर ह्या प्रश्नामुळे उफाळून ती उत्तरली, "मला काय विचारता? उभी आहे बघा तिथे लोपामुद्रा, विचारा तिला !" शास्त्रींना ती काय म्हणते ते कळले नाही. त्यामुळे "कुणाला?" असे त्यांनी विचारले. "पुरे झालं तुमचं. आपण आपला मुलगा, आपला मुलगा म्हणून वाढवावयाचं एवढंच. हा सारा भ्रम आहे. जन्म देणारे फक्त आपण. अधिकार गाजवणारे वेगळेच असतात. जन्मदात्री म्हातारी अन्नाशिवाय मरते आहे याची जाणीवही न बाळगता निघून गेलाय बघा तो! जेवायलाही आला नाही त्यामुळे हीसुद्धा हट्टानं उपाशी राहिली. हिनंच कान फुंकले असतील त्याचे. आजकालच्या पोरी अगदी मायावी मोहिनीच असताता! म्हातारी मरू दे म्हणून आपल्या नवऱ्याला जेवणास येऊ नका असं सांगून पाठवलं आहे हिनं."

ही सरबत्ती संपल्यावर शास्त्री म्हणाले, "यात शिकवायचं काय असतं? सारं आपोआप येतं."

"तुम्हांला काय कळतं यात? ही येण्यापूर्वी असं कधी घडलं होतं का? ही आली आणि हे नवीन सुरू झालं."

या प्रकारे सासू रागाच्या भरात वाटेल ते बोलली. आपण सुनेस किती दुखवत आहोत याची तिला कल्पना आली नाही. हीच तर सर्वांची कथा आहे. आपला मुलगा कितीही चुकीने वागला तरी त्या चुकीची जबाबदारी आई त्याच्यावर कधी घालत नाही. त्याच्या मनात कोणीतरी भरवून दिले असावे असेच ती म्हणते. भरवू देणारे कोण? कोण म्हणून शोधणेच नको! यक्षिणी जवळच असते. मुलाने काही चूक केली तर त्याचा दोष कुणावर तरी लादता यावा म्हणूनच सासवा सून आणण्याची घाई करतात.

वरील प्रकार चालू असतानाच सुब्बण्णा घरात आला. शास्त्रींची संध्या चालू होती. आई धुमसतच होती. ललिता कोपऱ्यात बसून आसवे गाळीत होती. सुब्बण्णा काहीही न बोलता आत गेला. हातपाय धुऊन तो संध्या करण्यास बसला. बायकांच्याकडे लक्ष न देता वडील व मुलगा ह्यांनी झटपट संध्या आटोपली. सुब्बण्णा बाहेर निघाला. "जेवून जा रे" असे वडिलांनी सांगितले. "मला भूक नाही." सुब्बण्णाने उलट उत्तर दिले.

"होय बाबा! कशी भूक लागेल ती? तुझी बायको जेव्हा घरी आली तेव्हा तिनं आपल्या बापाकडून अमृत आणून जणू तुझ्या पोटी ओतलं की नाही? तिलाही भूक नाही, तुलाही भूक नाही. आमच्याच दोघांच्या पोटात भुकेचं भूत शिरलंय म्हणावयाचं !" आई गरजली.

"कशाला उगीच बोलतेस?" असे पत्नीला थोपवून शास्त्री मुलास म्हणाले, "माझ्या एका बोलण्यामुळे तू व तुझ्या बायकोनं असं जेवण सोडणं बरं नाही. राग विसरा आता."

"ये बाई, तू जेवावयास बस मीही जेवते, असं मी म्हणाले. आता काय मी तिच्या पाया पडले नाही एवढेच. ती काय ऐकणारी आहे? आता तीच जेवली नाही तर मी कशी जेवणार?" असे सासूने आपले समर्थन केले. तेव्हा सुब्बण्णाला आपली आई जेवली नाही हे कळले व यास कारण आपली बायको आहे हे कळताच त्याचा राग उफाळून आला. तो ललितेकडे झटकन् वळला.

"का जेवली नाहीस तू? काय आरंभलं आहेस हे?" ह्या वाक्यांबरोबरच सुब्बण्णाने थाडदिशी तिच्या दोन थोबाडीत ठेवून दिल्या.

खरेच! हे लिहितांना माझे डोळे भरून येत आहेत. तसे पाहिले तर ललितेने शेवटी शेवटी फारच सुख पाहिले. सुब्बण्णाही पुढेपुढे तिला देवाचा अवतार मानू लागला. परंतु त्या दिवसाची गोष्ट समजली तर कोणीही व्यथित होईल. अशी काय तिने चूक केली होती? सुब्बण्णा रागामुळे न जेवता निघून गेला. तो न जेवल्यामुळे बायकोही जेवली नाही. खरे म्हणजे तिला कोणत्याही तऱ्हेचे असामाधन नव्हते. सासरे नवऱ्याला बोलले अगर आपण भार झालो अशा कोणत्याच गोष्टी तिच्या मनास लागलेल्या नव्हत्या. बापलेकात अशा शेकडो गोष्टी होत असतात, असे तिने समाधान मानून घेतले होते. आई मुलाविषयी बोललेले ऐकून 'आई नाही तर कोण बरं असं बोलू शकेल?' असेच तिच्या मनात आले. तिने काही चूक केली व सासू काही बोलली तर 'ठीकच आहे. मुलाला त्यांनी जन्म दिला आहे. मी कोण त्यांची? बोलणारच त्या.' असे म्हणून ती थोडी खिन्न होत असे व 'यापुढे असं करू नये, सासू सांगेल तसं ऐकावं' असा मनाशी निश्चय करी. परंपरानिष्ठ घरात वाढलेली मुलगी ती. तिची आईही फार बुद्धिमान. आपल्या

सासू-सासऱ्यांशी, दिरांशी, नणंदांशी, जावांशी वीस वर्षे संसार करून तो विवेक तिच्या आईस प्राप्त झाला होता, तो सारा तिने मुलीस शिकवला होता. त्यामुळे ललिता सोळा वर्षांची असूनही तिला तीस वर्षांची समजूत होती. ती शक्यतो चांगलीच वागे. सासू-सासऱ्यांचे व इतरांचे शुभ चिंतीत असे. काही झाले तरी सासू-सासऱ्यांबद्दल असलेला तिचा आदर कमी झाला नाही. हा जो विवेक तिच्यात बाणला होता त्यानेच तिला त्या दिवशी नवरा उपाशी असल्यामुळे जेवण सोडण्यास लावले होते. पण यामुळे मात्र थोबाडीत मिळाली. मार मिळालेल्या क्षणी तिला काहीही सुचले नाही. तिने देवघराकडे धाव घेतली व आईची आठवण केली. पाच मिनिटे ती ढसाढसा रडली. मग रडून काय उपयोग म्हणून शांत होऊन सासऱ्याला व नवऱ्याला वाढण्यासाठी तिने तापपाट मांडले.

बायकोस मारल्याने सुब्बण्णास काही बरे वाटले नाही. दुसऱ्याच क्षणी, त्याला आपण तसे करावयास नको होते असे वाटले. या सर्वांस आपला रागच कारण असे वाटून, आपण कोठेतरी जावे हा जो विचार त्याच्या मनात आला होता तो त्याने सोडून दिला. वडिलांचे स्तोत्रपठण संपल्यावर पाटावर जाऊन उभा राहिला. वडील बसल्यावर तोही बसून जेवू लागला व नंतर वडिलांच्या हस्तलिखित ग्रंथावरील धूळ झाडत बसला. तेवढ्यात ललिता जेवण करून मागची आवरासावर करून, माजघराच्या शेजारील खोलीत नवऱ्याचे अंथरूण घातल्यानंतर देवघरात सासूच्या शेजारी येऊन बसली. भांडून भांडून दमल्यामुळे त्या दिवशी कुणालाच जागे रहावे असे वाटत नव्हते. शास्त्री माजघरातच झोपले. “जाऊन झोप आता. रोज मीच काय सांगावयाचं?” असे सासू म्हणताच ललिता झोपावयास गेली.

ललितेचे वर्णन करून तिच्या मनातील भावना पिंजून दाखविण्याची शक्ती माझ्या ठायी नाही. ललिता कशी होती हे मला माहीत नाही. त्यामुळे तिच्याबद्दल कल्पना करण्यात अडचणी आहेत. मी तिला पाहिलेले नाही ह्याची खंत वाटण्याचे कारण नाही. स्त्रियांविषयी असलेला आदर व्यक्त करण्यासाठी कवी कधीकधी अतिशयोक्ती करतात असे मला वाटते. कवीमहाराज, शृंगाराचा स्वतःवरच परिणाम झाल्याने कामुकापुढे अनावृत्त स्तनयुग्मांचे वर्णन तुम्ही करता. ती स्तनयुग्मे म्हणजे लोकमातेची स्तने असून हजारो क्षुद्र जीवांचे त्या स्तनांनी पोषण केले आहे. असे असता त्यांचे विदूषकी वर्णन करण्याचे धाष्टर्य कशासाठी? तुझ्या आईच्या अंगांगांचे तू कधी वर्णन करशील का? तुझ्या बहिणीच्या अंगांगांचे कधी वर्णन करशील का? कवीने स्त्रीचे वर्णन असे करण्याला कारण तरी काय? स्त्री प्रेयसी असते त्याहून जास्त ती माता असते. जिला तू पत्नी म्हणून समजतोस ती एका विशिष्ट क्षणी पत्नी असूनही एरवी ती तुझी माताच असते. मी कवी नाही. ललितेस पाहिले असते तरी तिचा चेहरा असा होता, तिचे डोळे तसे होते, तिचे ओठ अमुक होते, असे वर्णन करण्यास माझे मन तयार झाले नसते. ती सुंदर होती एवढे मात्र सांगितले असते. आपण आपल्या गृहिणीमध्ये काय पाहून आकर्षित होतो? डोळे? नाक? ओठ? अपरिचित स्त्रियांचे रूप पाहून काही वेळा मन आकर्षिले जाईल, परंतु घरच्या स्त्रियांविषयी तसे होत नाही. कोणत्याही स्त्रीमध्ये शारीरिक आकर्षण काही वेळाच प्रभावी ठरते. नंतर प्रेम, दया, नर्मविनोद, लालित्य, नाजुकपणा यांनी घडललेले तिचे अवर्णनीय व्यक्तिमत्त्वच प्रभावी ठरते. त्यामुळे मी ललितेच्या अशाच गुणांचे वर्णन केले पाहिजे. पण ते वर्णन करण्याची शक्ती मला नाही.

स्त्रियांबद्दल बोलायचे तर साऱ्या स्त्रिया एकसारख्या असतात असे नव्हे. ललिता व तिची सासू यांच्यांत काही भेद नव्हता असेही नव्हे. चारचौघींत ललितेचे वागणे चांगले होते एवढेच. त्यामुळे रोजच्या रोज तिच्यांतील गुण वाढत गेले. जेव्हा तिच्या नवऱ्याने तिच्या गालफडात दिली तेव्हा ती गांगरून गेली

होती. तरी झोपण्याच्या खोलीत जाताना मात्र तिची भीती आणि दुःख नाहीसे होऊन तिला नवऱ्याबद्दल आत्मीयता वाटू लागली होती.

तोवर सुब्बण्णा तिच्याशी विशेष बोललेला नव्हता. दोघेही तसे लहानच. रिकामटेकड्या गप्पा मारण्याचा दोघांचाही स्वभाव नव्हता. बोलावयाचेच झाले तर रात्री जे काय थोडे बोलतील तेवढेच. शिवाय आपण नवऱ्याशी बोलत असताना आपली सासू दाराला कान लावून ऐकत आहे असा संशय तिला एक-दोन वेळा आला होता. त्यामुळे जी थोडीफार बोलणी बोलावयाची तीसुद्धा शालीनपणे बोलून संपवून टाकत असे.

सुब्बण्णाला संसारविषयी प्रेम जेमतेमच. त्याला आपण संगीतात पंडित झाले पाहिजे या विचारापुढे काहीही नको होते व स्त्रियांकडून जो मानमरातब मिळावा तो त्यास नीलाकडे मिळतच होता. रात्री फार उशीरापर्यंत ललितेला नवऱ्याची वाट पहावी लागत असे. परंतु तो आल्यावर पाय धुण्यास पाणी देऊन, तो पाटावर बसल्यावर हसतमुखाने त्याच्याशी गप्पा मारण्याची त्या घरात मुभा नव्हती. त्यामुळे ललिता व सुब्बण्णाचा संबंध असूनही नसल्याप्रमाणे होता. सर्व व्यवहार यांत्रिकपणे होत होते. असा होता त्याचा संसार. सुब्बण्णाने जेव्हा हात उगारला तेव्हां ही माझी बायको, हिला मी काहीही करीन असा भाव त्याच्यात दिसून येत होता व तो ललितालाही कळला होता. तिचे अंतःकरण तिला सांगत होते की आम्ही दोघे एक आहोत. सासूसासरे वेगळे, सारा प्रपंच वेगळा, पण आपण दोघे मात्र एक, असे तिला वाटत होते. याहून पुढे जाऊन तिला असे वाटले की, मारले म्हणून काय झाले? ते काय परके आहेत का? ते माझेच आहेत. तिला तिच्या आईने सांगितलेले आठवले. 'पती म्हणजे परमेश्वर. पुरुषांना देव शोधून काढावा लागतो, पण बाईला मात्र तो समोरच दिसतो. त्यानं काही त्रास दिला म्हणून काय देवाला सोडून जाता येतं? त्यानं शिव्या दिल्या किंवा मारलं तरी स्त्रीनं पुरुषास सोडून जाता कामा नये.' ललितेने या प्रकारे आपल्या मनाचे समाधान करून घेतले. 'आता जागे असतील की झोपले असतील? बोलतील की अजून राग उतरला नसेल?-' अशा विचारचक्रातच ललिता सावकाश खोलीत गेली. तिने कडी लावली. ती पतीच्या अंथरुणाजवळ जाऊन बसली. सुब्बण्णा डाव्या कुशीवर डोळे मिटून पडला होता. ललिता इतक्या लवकर येईल असे त्याला वाटले नव्हते. रोजच्याप्रमाणेच सावकाश येईल असा अंदाज होता. आदल्या दिवशी रात्री त्याला झोप लागल्यावर ललिता खोलीत येऊन दिवा मालवून पांघरूण सरळ करून आवाज न करता शांतपणे येऊन झोपली होती, पण आज मात्र ती जरा लांब झोपेल असा त्याचा कयास होता. ती येताच बोलावयाचे की नाही? आपण बोललो तरी ती सरळ बोलेल की नाही? — असा तोही विचार करीत होता. चूक तिची, तरी देखील मारलेले हे जरा जादा झाले. चूक तिची आहे, पण आता समाधान करून बघू.

रोजच्याप्रमाणे ललितेने आज दिवा मालवला नाही, त्यामुळे ती आलेली त्याला झटकन् कळले नाही. ती दिवा ठेवूनच हळुवारपणे जवळ येऊन बसली. नवरा झोपला आहे असे तिला वाटले. नितांत आदराने तिची दृष्टी त्याच्यावरून फिरली. 'नवऱ्यास पहाव. पण दृष्ट लागेल असं निरखून पाहू नये. नवरा म्हणजे पारिजाताचं फूल. ते नजरेनंहि कोमेजून जाईल.' ही तिच्या आईची वाणी एकदम तिला स्मरली. म्हणून तिने पाहणे सोडून दिले. तरीही ती मनाने न्याहाळतच होती. मुलाप्रमाणे त्याला कवटाळून घ्यावे असेही तिला वाटले. पण तेवढे स्वातंत्र्य नव्हते. शिवाय त्याला झोप लागली होती. तरीही ललितेने, नवऱ्याने ज्या उजव्या हाताने तिला मारले होते त्याच्या तळहाताला आपल्या नाजुक ओठांनी कळत नकळत स्पर्श केला. सुब्बण्णा झोपलेला नव्हता. पर्वतराजाच्या कन्येच्या तपाला जसा शंकर प्रसन्न झाला त्याप्रमाणे

सुब्बण्णाने काहीही न बोलता, तर्कवितर्क न करता तिला हृदयाशी धरले व 'फार लागलं का?' असे तिच्या कानात विचारले.

खरे पाहिले तर मला येथे जरा हसूच येते. शंकर तो काय, ती पर्वतकन्या काय, आणि शेवटी 'लागलं का' हे विचारणे काय, जीवन हे असेच असते. प्रणयभावनेला जो आकार येतो तो अशाच गोष्टींनी. सुब्बण्णा जर एखादा नाटककार झाला असता तर तो याहूनही रसपूर्ण काही बोलला असता. नाटककार या प्रसंगावर लिहीत असताना दोघांच्याही बोलण्याची कल्पना तोच करतो. परंतु रोज आम्ही जे खरे नाटक करतो त्यात ती मुलगी काय बोलेल ह्याची कल्पना करता येत नाही. त्यामुळे आपण काय बोलावयाचे हे काही तोंडपाठ करून ठेवता येत नाही. असे असल्यामुळे त्या दिवशी ते दोघे काय बोलले ते मी कसे सांगू? वयाने तरुण असलेले जोडपे प्रणयाच्या नव्हाळीत काय बोलेल ह्याची कल्पना कोण करू शकणार? ते काही असो, त्या दिवशी सुब्बण्णा व ललिता खूपच वेळ बोलत बसले असणार, पण आपण काय बोलतो हे त्यांनाही कळले नसेल. कारण तेथे बोलणे मुख्य नसून मनोमीलन खरे असते. त्या दिवशीच्या बोलण्यामुळे ललिता व सुब्बण्णांची मने एक झाली. अधिक जवळीक निर्णाण झाली. ललिता खरीच गृहिणी झाली. म्हणजे आजवर ती गृहिणी झालीच नव्हती काय असे तुम्ही विचाराल. 'हो, नव्हती' असेच सांगावे लागेल. स्त्रीला पतीच्या हृदयात ज्या दिवशी स्थान मिळते त्याच दिवशी ती खरी गृहिणी बनते.

# ३

थोड्याच दिवसांत संगीतापासून आपल्याला काहीतरी प्राप्ती होण्याचा संभव आहे असे सुब्बण्णाने दुसऱ्याच दिवशी वडिलांना कळविले. हे ऐकून नारायणशास्त्रींना एक प्रकारे खेदच वाटला. कारण त्यांच्या घराण्यातील सर्व लोक मोठमोठे संस्कृत पंडित होऊन गेले होते. त्या मालिकेत स्वतः तेही संस्कृत पंडित झाले. त्यांना हा एकुलता एक मुलगा. तो संस्कृत पंडित न होता गवयी झाला म्हणून ते व्यथित झाले. वैदिकांच्या सभेत बसून 'स्वस्ति' म्हणून महाराजांना आशीर्वाद देणे कुठे व सर्वांच्या पुढे सेवकाप्रमाणे बसून 'हा हा, हू हू' करणे कुठे? त्यांना एकाएकी आपल्या पूर्वजांनी निर्मिलेल्या मंदिराचे शिखर कोसळल्याप्रमाणे वाटले. पण करावयाचे काय? काय घडावयाचे होते ते घडले असे म्हणून त्यांनी तो विचार सोडून दिला.

सुब्बण्णाच्या आईलाही फार राग आला. आपल्या पोटचे पोर एखाद्या कलावंतिणीप्रमाणे गाणारे निपजावे याची तिला खंत वाटली. एकेकाचा स्वभाव! काही लोकांना अधिकार गाजवण्यात सुख वाटते तर काहींना इतरांना सुख देण्यात सुख वाटते. वैकुंठात विष्णूच्या सान्निध्यात असणारा देवर्षिप्रमुख नारद हा गायक होता हे काही लोक विसरतात. पांडित्यामुळे देवास जसे संतुष्ट करता येते तसेच गायनादि कलेनेही देव प्रसन्न होतो याचा आपण विचार करत नाही. संस्कृत पंडित महाराजांना आशीर्वाद देतात. गाणे शिकणाऱ्या प्रामुख्याने वेश्या, त्यामुळे कमी दर्जाचे व संस्कृत श्रेष्ठ दर्जाचे असा समज त्या काळी सर्वत्र होता. का कुणास ठाऊन सुब्बण्णाच्या आईने या सर्वास कारण ललिता आहे असे ठरविले! सुब्बण्णा गाणे शिकतो याचा अर्थच तो वेश्येच्या घरी जातो, असे सुब्बण्णाच्या आईने ओळखले. 'हल्लीच्या पोरींना काय सांगावं? आपल्या नवऱ्यांना संभाळता देखील येत नाही. त्या जर नवऱ्याशी चांगलं वागल्या तर ते कशाला वेगळीकडे जातील?' असा सुब्बण्णाच्या आईने त्या दिवशी आलेल्या शेजारणीच्या समोर आपला अभिप्राय व्यक्त केला. 'आम्ही जर अशा वागलो असतो तर आमच्या संसाराची गत काय झाली असती?' त्यांचे बोलणे ऐकणाऱ्या कुणाचीही अशी समजूत होणे सहज शक्य होते की लहान वयात नारायणशास्त्रीही अयोग्य रीतीने वागत असावेत व सुब्बण्णाच्या आईने फार कौशल्याने त्यांना वाटेवर आणले असावे! सासवा अशा नसतील तर त्या कशा असणार? काहीतरी एक कारण शोधून सुनांना बोलत राहणे एवढेच त्यांचे काम. आदल्या दिवशी सुनेस मायावी मोहिनी म्हणण्यात व आज त्याच सुनेस नवऱ्यास कह्यात ठेवता येत नाही असे म्हणण्यात फार अंतर घडले हे तिच्या लक्षातच आले नाही. संधी सापडताच बोलून घेणे हे एकच त्यामागील तत्त्व होते. त्या दिवशी सुब्बण्णाने आपल्या संगीताच्या अभ्यासाचे रहस्य व्यक्त केले व त्या घरात असंतोषाची लाट उसळली.

या घटनेमुळे सुब्बण्णाच्या मनात आईविषयी एक प्रकारची तिरस्काराची भावना डोकावली. त्या दिवशी आपण आईचे बोलणे ऐकून बायकोस मारले ही चूकच झाली असे वाटल्यामुळे म्हणा अगर बायकोविषयी जास्त प्रेम वाटू लागल्यामुळे म्हणा सुब्बण्णात हा बदल झाला होता. कारण काही असो, वेलीपासून फळ दुरावू लागले. संगीताच्या विषयावरून, नवऱ्याला कह्यात ठेवणे जमले नाही, असे जे सुनेला आपली आई बोलली होती तेही सुब्बण्णाच्या कानी आले होते. हेदेखील आई व मुलात वितुष्ट येण्यास कारण झाले.

हे पुढेपुढे वाढतच गेले. आजवर काय वाढतील ते मुकाट्याने जेवणाऱ्या आज्ञाधारक मुलात हळूहळू जो बदल होत होता तो आईच्या ध्यानात आला नाही. सून म्हणजे मोहिनी आहे, मायाविनी आहे

असे केवळ नावे ठेवण्यासाठी सासू म्हणत असे. मुलाला सुनेने काबूत ठेवलेले नाही अशीच तिची दृढ समजूत होती, त्यामुळे ती मुलगा-सुनेबरोबर पूर्ववत् वागत असे. परंतु सुब्बण्णास मात्र आईचे सर्वच वागणे विचित्र वाटू लागले. पूर्वी एखादे वेळी सुनेने देवाच्या पूजेची उपकरणी विसळण्यात एक दोन मिनिटे उशीर केला तर लगेच येऊन 'मीच करावं सारं' असे पुटपुटत सारी भांडी घासण्यासाठी घेऊन जात असे हे सुब्बण्णाने कित्येकदा पाहिले होते. त्याविषयी तो काही बोलतही नव्हता. आजही तसेच घडले. त्याच वेळी त्याची बायको बाहेरच्या खोलीचा केर काढत होती. 'एका वेळी दोन कामे ती कशी करणार?' असे आईस म्हणावे असे त्याच्या अस्वस्थ मनात आले, पण त्याने ते आवरले.

या दरम्यान गर्भवती असलेली शास्त्रींची धाकटी मुलगी लक्ष्मी घरी आली. त्यामुळे घरातील असमाधानेचे वातावरण वाढण्यात भरच पडली. ती घरात येताच आई म्हणाली, "काय सुख आहे म्हणून या घरात आलीस बाई! काय तुझा भाऊ मिळवता आहे की तो दुधादह्याचे हंडे आणून ठेवतोय? फक्त हे एकटे राबराब राबतात. बाकी सगळे बसून खातात! अशा प्रसंगी मी तुला कसं हवं नको बघू?"

हे व अशा प्रकारचे बोल ऐकून ललितेचे तोंड लहान होत असे. पण सुब्बण्णास कारण समजले नव्हते. नवऱ्यास सांगून टाकावे असे तिच्या मनात एकदोन वेळा येऊन गेले. परंतु आई-मुलात भांडण लावण्याचा उपद्व्याप नको ह्या विचाराने ती गप्प होती. रोज घट्ट दही मुलीकरिता काढून ठेवून बाकीच्या दह्यात पाणी घालून घुसळून सुब्बण्णाची आई वाढत असे. एके दिवशी नारायणशास्त्री म्हणाले,

"का आज दही पातळ झालं आहे?"

"सर्वांना घट्ट दही वाढत बसले तर ते कसं पुरवठ्याला येईल?"

हे आईचे बोलणे ऐकून शेजारीच जेवावयास बसलेल्या सुब्बण्णाच्या मनावर परिणाम झाला. नंतर ललिता व लक्ष्मी जेवत असताना सुब्बण्णा कोणत्या तरी कारणाने स्वयंपाकघरात गेला. ललिता सर्वांच्या प्रमाणे पातळ दही घेऊन भात कालवत होती. बहिणीच्या पानात मात्र घट्ट दही होते. हे पाहून 'ह्या घट्ट दह्यातलं थोडं दही बाबांना वाढलं असतं तर चाललं असतं' असे सुब्बण्णाच्या मनात आले. हे मनातील बोल त्याने बोलून दाखवले असते तर कदाचित् आई सावध झाली असती. पण तो काही बोलला नाही. अशा प्रकारे मुलाच्या मनातील आईविषयीची अढी वाढतच चालली. आपली आई आपल्या बायकोस नीट वागवत नाही, आपण तिच्यासाठी चांगला संसार थाटला नाही, असेही त्याला वाटू लागले.

चूक काढावयाची म्हटले तर साऱ्या चुकाच दिसू लागतात. अशा ह्या संसारात तर विचारावयास नको. ललितेलाही आता दिवस राहिले होते. पण तिच्याकडचे कोणीच तिला घेऊन गेले नाही, त्यामुळे प्रत्येक गोष्टीत तिला सासूच्या तोंडाकडे बघावे लागे. पण सासूबाईंनी, सासूपणाला साजेल असेच वागून तिची फारशी विचारपूस केली नाही. केर काढणे तिला त्रासदायक होत आहे हे पाहूनही सासूने तिचे केर काढणे थांबवले नाही, मुलीप्रमाणे खास दहीही तिला वाढण्यात आले नाही. हे सारे सुब्बण्णा पहात होता. त्याला विचित्रही वाटत होते. शास्त्रींनी मात्र गर्भवतीचे सर्व धार्मिक संस्कार घडवून आणले. यथावकाश ललिता प्रसूत होऊन तिला मुलगा झाला.

सुब्बण्णास मात्र फारसा आनंद झाला नाही. आपल्या दोघांच्या परावलंबी जीवनात आणखी एकाची भर पडली असेच तिला वाटले. काही विघ्नसंतोषी लोकांच्या कारवाईमुळे त्या वर्षीची नवरात्रीत

सुब्बण्णास दरबारात गाण्याची संधी मिळाली नाही. आपण थोडेतरी मिळवू शकू असे जे त्यास वाटले होते तेही हुकले. अनेक लोकांचा आधारस्तंभ झालेले उदारशील महाराजही दुर्दैवाने त्याच वर्षी स्वर्गवासी झाले. एखादे झाड उन्मळून पडल्यावर त्यावर राहणाऱ्या पक्ष्यांची जी केविलवाणी स्थिती व्हावी तशी महाराजांच्या आश्रयातील अनेक पंडितांची झाली. वृद्ध पंडित लोक या वयात आता कोठे जावयाचे म्हणून तेथेच राहिले. आणखी काही लोक महाराजांचे घर म्हणजे आपलेच घर ह्या आत्मीयतेने राहिले. अशा ह्या लोकांत शास्त्रीजी एक होते. 'इतके दिवस ह्यांचे मीठ खाल्ले आहे तर आता इथेच रहावे. मीही म्हातारा झालो आहे. युवराजांना आयुरारोग्य संपत्ती लाभो असे शुभ चिंतून ते देतील त्यांच्यात सुखाने रहावे.' असे शास्त्रींनी ठरविले. राजवाड्यास पूर्वीप्रमाणे वैभवाने खर्च करण्याची अनुकूलता राहिलेली नव्हती. परंतु शास्त्रींसारख्या लोकांना सोडण्याची इच्छाही नव्हती. जेवढे जमेल तेवढे देऊन परंपरा चालू ठेवावी असे युवराजांनीही ठरविले. त्यामुळे शास्त्रींचे मासिक वेतन कमी झाले. पूर्वीच्याच लोकांची ही गत तर नवीन नेमणूक दुरापास्तच. त्यामुळे सुब्बण्णाला राजवाड्यातून काही प्राप्ती होईल अशी जी आशा होती ती फोल ठरली.

संसारातील दैन्य वाढतच गेले. त्यामुळे सासूचा स्वभाव जास्तच चिडखोर बनला. ललितेला तर दिवसाकाठी दहापाच वेळा आसवे गाळावी लागत होती. तिच्या मुलाच्या संगोपनाकडेही दुर्लक्ष होऊ लागले. नवऱ्यास काही चांगले खावयास घालावे असे तिला वाटे, परंतु ती इच्छा मनातल्या मनातच रहात असे. अशा स्थितीतही मुलीच्या घरी काही ना काही पाठवून देण्याकडे सासूचा कल होताच. सर्वांचेच जीवन राजवाड्यावर अवलंबून होते त्यामुळे सर्वांचीच स्थिती खालावली होती. एकेकदा मुली येऊन, "आई तूप दे थोडं; उद्या परत देते." असे सांगावयच्या. "काय करू बाई! जिथे लक्ष्मी एके काळी पाणी भरत होती तेथे आज काहीही नाही. ज्या बाहेरून आल्या आहेत त्यांचं दैव हे सारं. त्यांनी आपापल्या मुलाबाळांचं पाहून घेतलं तरी पुष्कळ झालं. तुझ्या वडिलांनी कुणाकुणाला सांभाळावयाचं?" असे सुब्बण्णाची आई वैतागाने बोलली तीर थोडेफार तूप द्यावयाचीच. ललितेला हे सारे ऐकून मनस्ताप होई. कधीकधी सासू, मुलगी आल्या वेळी तिला बसवून घेऊन, सुनेच्या लहानसहान चुकाही वर्णन करून सांगावयाची.

असेच एकदा ती सांगत असताना सुब्बण्णा घरी आला. ताईच्या शेजारी तुपाची भरलेली वाटी आहे, आई तिला सुनेविषयी कागाळ्या सांगत आहे. तेव्हा सुब्बण्णा काहीही न बोलता खोलीत जाऊन शाल पांघरून घेऊन बाहेर आला. तो ताईशी नेहमी बोलावयाचा, पण आज त्याला इच्छाच झाली नाही. दोघी मिळून आपल्या बायकोला नांवे ठेवत आहेत ह्याचा त्याला राग आला. ताई थोड्याच वेळात निघून गेली. सुब्बण्णाची आईही थोडा वेळ तिथे बसल्यासारखे करून लगेच मुलीच्या घरी गेली. सुब्बण्णा तेथेच सोप्यात काहीतरी वाचत बसला. दुपार टळत आली होती. नारायणशास्त्री आत आले व सुनेस म्हणाले, "तोंडाची चव गेली आहे. दोन सांडगे तळ." ललितेने त्याप्रमाणे केले. दिवेलागणीच्या सुमारास सासू घरी आली. तळलेले सांडगे पाहून तिने तोंड सोडले. "काय बाई ताठा! घरात तूपसुद्धा नाही आणि सांडगे तळलेन्. माझ्याहून तुझाच हात वर झालाय की." तेव्हा शास्त्री म्हणाले, "मीच सांगितलं होतं. तिला कशाला उगीच बोलतेस?"

"पुरे पुरे. आजवर फक्त नवऱ्यालाच भुरळ घालत होती, आता तुम्हालाही घातलीन् की काय?"

पूर्वी एकदोनदा शास्त्रींना काही खावयास मागितले असता आईने नाकारलेले सुब्बण्णास माहीत होते. जे वडिलांना मिळत नव्हते ते त्याच दिवशी ताईच्या घरी जात असे. आजही तसेच घडले. आईने

वाटीभर तूप ताईस दिले व वडिलांना सांडग्याबद्दल मनाई केली, हे पाहून सुब्बण्णाचा राग वाढला. त्याला काही केल्या तो आवरता आला नाही.

"आई, काय हे तुझं बोलणं! दुपारी एक वाटीभर तूप ताईला दिलंस व आता बाबांना सांडग्यासाठी तूप नाही म्हणतेस!"

"खरं आहे बाबा! आजवर तुम्ही नवरा-बायकोंनी मिळून मला छळून खाल्लंत. आता ह्यांनाही वश करून घेतले. तुम्हीच सुखी रहा. मी जाते माझ्या लेकीकडे!"

"मी काय तुला मुलीकडे जा म्हटलं?"

"अजून म्हणावयाचे काय राहिलं! बाबांनो, संसार जपून करा म्हणून मी सांगावयास गेले तर मी मुलीकडे वाटीभर तूप दिलं अशी चहाडी सांगून ह्यांचं मन कलुषित करतो आहेस. म्हणजे मी या घरात रहावं की जावं, तूच सांग. जिथे तीस वर्षे संसार केला तिथे मुलगी तूप मागण्यास आली तर तेवढं देण्याचंही स्वातंत्र्य नाही मला?"

सुब्बण्णाच्या आईने असा आक्रस्ताळेपणा केला. सुब्बण्णाचा आवाजही चढण्याच्या बेतात होता. तेव्हा ललिता काहीतरी कामाचे निमित्त करून त्याच्या जवळ येऊन "पुरे. तुम्ही तरी गप्प राहा ना!" असे कुजबुजली. सुब्बण्णा शांत झाला. सासूच्या हे लक्षात आले. "अहाहा ऽ ऽ छान फार छान" धडधडीत माझ्या समोर नवऱ्याला शिकवते आहे व हा ऐकतोय! संपलंच म्हणायचं!" सासूने असे फटकारले. आता आपण येथे जास्त वेळ राहणे इष्ट नाही हे ओळखून सुब्बण्णा तेथून निघून गेला.

पुढे पुढ तो संसार फारच विस्कळित होऊ लागला. सुब्बण्णाने संगीतात विशिष्ट दर्जाचे स्थान मिळवले होते, पण काही संगीतज्ञांना त्याच्याबद्दल अनास्था होती. त्यामुळे तो संगीत-सभेत गाण्यास धजत नव्हता. म्हणूनच प्राप्ती शून्य होती. तरीही त्याने सभेत गावे असे ठरविले. वेश्यांना जरी त्याने संगीत शिकवले असते तरी त्यांनी पैसे दिले असते, पण तशा पैशाला जगणे कमी प्रतीचे ठरले असते. वडिलांच्या परिशुद्ध जीवनात असे कलुषित मिश्रण नको म्हणून याने तो मार्ग सोडला होता.

असे सारे चाललेले असताना सुब्बण्णाची दुसरी बहीण तिच्या मुलांसह माहेरी आली. इथे आपल्यापुरता संसार चालणे कठीण तशात ह्यांची भर पडली. सुब्बण्णाची आई आपल्या मुलीच्या मुलांना जास्त तूप वाढून मुलाच्या मुलाला कमी वाढत असे. मुलीच्या मुलांना दही तर मुलाच्या मुलाला ताक. हा सर्व प्रकार मुद्दाम मुलाशी भांडावे म्हणून होत नव्हता, तर तो तिचा स्वभावच होता. हे आपणास वेगळे समजतात तर स्वतःच्या मुलाला त्यांनी स्वतःच नीट बघून घ्यावे असे तिच्या मनात असावे. मुलीच्या मुलांवर जसे ती प्रेम करीत होती तसेच तिचे सुब्बण्णाच्या मुलावरही प्रेम होतेच, पण वरील प्रकार पाहून सुब्बण्णा अनेकदा अस्वस्थ होत असे. त्याला या परिस्थितीत दिलासा देणारे कोणी नव्हते. ते जाणून ललितेने एक-दोन वेळा नवऱ्यास दिलासा देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या वेळी सुब्बण्णा तिच्यावर उखडला होता. "का? आईनं, माझ्यावर अधिकार गाजव म्हणून मनात भरवून दिलं की काय?"

याला ललिता काय उत्तर देणार! 'देवा यांचा राग आवर' अशी प्रार्थना करून ती गप्प बसत असे. आई-मुलात दुरावा वाढतच गेला.

सणासुदीला सासवासुना राजवाड्यात सुवासिनी म्हणून जात असत व दक्षिणा, ओटी, वाण इत्यादी आणत असत. ह्याचीही भर त्यांच्या मासिक प्राप्तीत असावयाची. पण हे सुब्बण्णाला आवडत नसे. आपली बायकामंडळी दुसऱ्यांच्या घरी जेवावयास जातात ह्यात काही त्याला चूक वाटत नव्हती. पण त्यांची मिळकत आपण घरबसल्या खावी ह्याचे त्याला असमाधान होते. एके दिवशी तो घरी आला. पाहतो तर एकीकडे आई संतापलेली, दुसरीकडे ललिता रडत उभी आहे. तेव्हा त्याने काय झाले याची चौकशी केली. "पहा किती वरचढ झाली आहे तुझी बायको! राजवाड्यात सवाष्ण म्हणून जा म्हटलं तर नाही म्हणतेय! मोठी राणी लागून गेली! मीसुद्धा जाऊन येते, तर हिला त्यात काय कमीपणा वाटतो?" असे आईने तावातावाने सांगितले. पाच-सहा दिवसांपासून राजवाड्यात कसलीतरी पूजा चालू होती. त्या निमित्ताने आपली बायको रोज राजवाड्यात जाऊन येते हे सुब्बण्णास माहीत होते. आज ती जाण्याचे का नाकारते हे त्याला कळेना म्हणू त्याने तिला कारण विचारले. त्यावर तिने 'नाही, गेले नाही!' एवढेच उत्तर दिले. तेवढ्यात नारायणशास्त्री आले. घरात घडलेले त्यांना समजले. त्यांनी सुनेची बाजू घेऊन, "नाही तर नाही गेली. त्याच्यावर एवढाच वाद कशाला?" असे म्हटले. सुब्बण्णाला मात्र बायकोचा राग आला. त्याने तिला खोलीत नेले. आत आपल्याला शिव्या व मार बसणार हे जाणूनही ललिता आत गेली. तिला तिच्या आईचे बोल आठवले. 'तारो वा मारो, देवास सोडू नये.' नवऱ्यास देवासमान मानण्याची आईची शिकवण तिच्या सदैव डोळ्यापुढे होती. खोलीत जाताच सुब्बण्णाने विचारले,

"वाण आणण्यास कां गेली नाहीस?"

"का ते मी नाही संगत."

"सांगितलंच पाहिजे."

तिने सांगितले नाही. तेव्हा सुब्बण्णाने "तूं चांडाळीण आहेस, तू अहंकारी आहेस, छळवादी आहेस." असा शिव्यांचा भडिमार करीत हाताने झोडपावयास सुरुवात केली. मुलगा सुनेस मारत आहे हे जाणून नारायमशास्त्री आपल्या बायकोस म्हणाले, "पाहिलंस तुझ्यामुळे त्या गरीब मुलीला मार बसत आहे."

"बसू दे. म्हणजे तरी बुद्धी येईल तिला. मी जाऊन वाण आणते. न जायला अशी कोण ती लागून गेली?"

"ती कां जात नाही म्हणाली?"

"माझ्या बरोबर येते म्हणाली. मी, 'नको. मी अगोदर जाते व नंतर तू जा' असं सांगितलं. त्यास ती तयार नाही."

"बरोबर आहे. तिला एकटीस जाण्यास संकोच वाटत असेल."

"चार दिवस आता एकटीच गेली नाही का? कसला संकोच अन् कसलं काय? कालही नाकारत नाकारत शेवटी गेली. आज तयारच नाही."

“अजाण पोर बिचारी. अजून मारतोय तिला.”

“पुरे पुरे कड घेणं. तो काय खरंच मारतोय का तिला? तसं दाखवतो नुसतं.”

सुब्बण्णाच्या आईची कल्पना ललितेस त्याने काही खरे मारलेले नाही अशी जरी झाली होती तरी ललितेने मात्र खूप मार खाल्ला होता. बायकोने वाण आणण्यास जाणे नाकारलेले सुब्बण्णास कबूल होते पण तिने कारण सांगण्यास नकार दिल्याबद्दल तिला मार मिळाला. त्याने किती जरी मारले तरी त्याला तिने कारण सांगितले नाही. पुष्कळ दिवसांनंतर एकदा तिने कारण सांगितले. राजवाड्यात जाऊन येणे ही रीतच होती. तेथील सारेज रीतीरिवाज जाणणारे पापभीरू धर्मज्ञ असतात अशा समजुतीने ललिता तिन्ही दिवस वाण घेऊ येत होती. चौथ्या दिवशी वाण घेऊन येत असताना पुढच्या दारी एका खोलीतून आपल्याकडेच टक लावून कोणीतरी पहात आहे असे ललितेस दिसले. सत्शील बाईला पुरुषाने ह्या नजरेने आपल्याकडे पाहणे म्हणजे अंगावर वीज पडल्याप्रमाणे वाटते. त्यामुळे ललिता त्या दिवशी भराभर घरी निघून आली व दुसऱ्या दिवशी सासूबरोबर जावयाचा तिने हट्ट धरला. पण सासूने त्यास कबुली दिली नाही. त्याही दिवशी ललिता नाराजीनेच गेली. परत येताना पुढील दार बंद होते. त्यामुळे शेजारच्या खोलीतून बाहेर पडावे लागले. त्याच खोलीत आदल्या दिवशीचाच माणूस उभा असून तो हिच्याकडेच पहात होता. तो कोण हे ललितेला समजले नाही. दुसरे दिवशी मात्र तिने एकटीने वाण आणण्यास जावयाचे नाही असे ठामपणे ठरविले. तसे पाहिले तर ही क्षुल्लक गोष्ट होती. पण ही गोष्ट सासू अगर नवऱ्यापुढे कशी बरे सांगावयाची? तो टवाळखोर कोण होता कुणास ठाऊक? व ही बातमी राजवाड्यात पोहोचली तर उगीचच गोंधळ व्हावयाचा. हे सारे एका वाणामुळेच? वाण आणावयासच गेले नाही तर झाले. त्यामुळे बोलणी बसली तरी बसू देत. असा विचार करूनच ललितेची त्या दिवशीची वागणूक होती.

काही दिवसांनंतर एका संध्याकाळी मुलास कुशीत घेऊन, उतरलेल्या चेहऱ्याने ललिता त्याला थोपटीत होती. सुब्बण्णाने विचारले,

“काय झालं तुला?”

“काही नाही.”

रात्री जेव्हा ललिता झोपावयास आली तेव्हा पुन्हा सुब्बण्णाने चौकशी केली.

“काय सांगावयाचं तुम्हांला? सारं तर माहीतच आहे. इतर मुलांना दही, माझ्या मुलाला मात्र ताक”

“ही तर माहीत असलेली गोष्ट. त्यासाठी इतका का चेहरा टाकलास?”

“हा त्यांचा नातूच ना? ह्यालाही दही वाढण्याची बुद्धी दे देवा असं देवास मागून घेत होते.”

“इतक्या उतरल्या चेहऱ्यानं?”

“नाही. ह्या मुलास संभाळणंच जड झालेल्या दिवसांत मला आता तिसरा महिना चालू आहे! म्हणून काळजी लागली आहे मला.”

हे ऐकताच सुब्बण्णा विचारमग्न झाला व अर्धा तास कोठेतरी हिंडून आला. परत येऊन ललितेस म्हणाला. “हे पहा, तुझे व मुलाचे सारे कपडे बांध.”

“का? कशासाठी? कुठं जावयाचं?”

“विचारू नकोस. जे सांगतो तेवढं कर.” नवऱ्यास राग आला आहे आता बोलण्यात अर्थ नाही हे ओळखून ती सरळ आत गेली. आपले व मुलाचे एकदोन कपडे मिळून एक लहानसे गाठोडे तिने बांधले. सुब्बण्णाने आपलेही कपडे घेतले व तो झोपला. ललिताही गाठोडे जवळच घेऊन झोपी गेली. एकदोन तासांतच सुब्बण्णाने ललितेस उठवले. वडील झोपलेल्या खोलीकडे सुब्बण्णा क्षणभर जाऊन आला व बायकोस म्हणाला,

“तुझ्या इष्टदेवतेचं एकदा स्मरण कर व आता आपण निघू.”

“कुठे म्हणून मी विचारत नाही पण आपणास तिथे जाण्यास किती दिवस लागतील?”

“उगीच प्रश्नोत्तरं करू नकोस.” असे दरडावून आपल्या कपड्याचे गाठोडे व मुलास घेऊन तो दाराकडे निघाला. ललिताही त्याच्या मागोमाग निघाली. पुढला दरवाजा हळूच उघडून परत हळूच बंद केला व ते श्रीरंगपट्टणकडे निघाले.

# ४

कोंबडा आरवण्यापूर्वीच सुब्बण्णा श्रीरंगपट्टणाला पोहोचला. धर्मशाळा पाहताच त्याने बायकोस थोडा वेळ झोप घेण्यास सांगितले. आपणही थोडा वेळ झोपला. नंतर पहाट होताच सर्वांच्या अगोदर तो उठला व बायकोला उठवून त्याने पुन्हा 'चला' असे सांगितले'.

ललिता घाबरली. रात्री तिने सुब्बण्णास काही विचारण्याचा हट्ट धरला नव्हता. कारण तो रागात आहे हे ती जाणून होती. काही क्षण तिला असे वाटले की आपल्याला तो माहेरी सोडण्याकरिता चामराजनगरला जात आहे. थोड्याच वेळात किल्ला ओलांडून पेठेकडे वळताना ती श्रीरंगपट्टणाची वाट आहे हे तिला कळले. ती गप्पच होती. पण जेव्हा श्रीरंगपट्टण ओलांडून सुब्बण्णा पुढे चालला तेव्हा तिने सहजच विचारले.

"अजून किती दूर जावयाचं आहे? उगीच काहीतरी डोक्यात घोळून घेऊ नका. काही झालं तरी ते तुमचे आई-वडील आहेत. ते बोलले म्हणून का असे निघू जावयाचं? चला घरी परत."

"बायकांनी उगीच चौकशी करू नये. मी कुठे जातो तिथे निमूटपणे ये."

"त्याला मी काय नाही म्हणते का? आपण इकडे निघून आलो. सासूबाई व मामंजी किती घाबरले असतील बरे!"

"तू गेलीस म्हणून रडणारं तिथं कोणी नाही. चल पुढं."

"मीच तुमचे कान फुंकले व तुम्हांला बाहेर काढलं असे सासूबाई म्हणतील. उगीच त्यांना कां दुःख द्यायचं?"

"यापुढे त्यांचा आपला काहीही संबंध नाही. चल पुढं."

"सासूबाई रागीट आहेत त्यामुळे मामंजींची आबाळ होईल. तुमचा राग मनातून काढून टाका आणि घरी चला."

"मला शिकवण्यापर्यंत मजल गेली का तुझी?"

"घरी असताना मोठी माणसं दोन शब्द सांगावयाची. आता इथं मी नाही तर तुम्हांला दुसरं कोण सांगणार?"

"बस् बस्! इतका पुळका आला असेल तर जा घरी. मी ह्या मुलाला घेऊन जातो."

असे म्हणून सुब्बण्णाने मुलास खांद्यावर घेतले व आपले गाठोडे घेऊन तो निघाला. बोलून काही उपयोग नाही हे जाणून ललिताही पाठोपाठ निघाली.

पहाटे सासूबाई उठून पाहतात तर सून उठलेल्याचे चिन्हच दिसेना. बरे झाले, आज एक कारण मिळाले, या समाधानातच त्यांनी सडारांगोळी केली व 'ही काय झोप की सोंग! इतकं कसलं ते झोपायचं? घरात सून असून सारं काम मी म्हातारीनंच करावयाचं!' असे धुसफुसत त्यांनी केरवाऱ्याला सुरुवात केली. नारायणशास्त्री आपल्या बायकोला म्हणाले. "बरं नसेल. कशाला उगीच ओरडतेस? सुब्बण्णा नाही का उठला?"

"सकाळी दार उघडं होतं. गेला असेल कुठंतरी."

सुनेने बोलणी खावयास नकोत ह्या उद्देशाने शास्त्री त्याच्या खोलीजवळ गेले. व 'ललिता, अग ललिता' अशी त्यांनी हाक मारली. उत्तर आले नाही. हळूच दार उघडून आत येऊन पाहतात तर आत कोणीच नाही. 'उठलीय की. न उठायला काय झालं!' असे पुटपुटत ते तळ्याकडे गेले.

नारायणशास्त्री परत येईतोपर्यंत दुपार झाली होती. ते आल्यावर त्यांच्या बायकोने परत आरडाओरडा सुरू केला. 'पहा! सुनेनं केलेलं काम. काही न कळणाऱ्या माझ्या मुलाला फूस लावून माहेरी घेऊन गेली आहे. मागील खेपेचं बाळंतपण मी काय केलं नाही? मला बोल लावायला जेवढं करावं तेवढं सारं करते ती.'

मुलगा, सून व नातू घरात नाहीत हे कळताच नारायणशास्त्रींचे मन क्षणभर गोंधळले. नंतर ते म्हणाले. "येथे राहून कंटाळा आला असेल म्हणून तिला माहेरी नेलं असेल." पण त्यांच्या मनात मात्र येऊन गेले की हे न सांगता कां गेले असतील? सुब्बण्णा जरी जाऊया म्हणाला तरी सून तशी करणारी नव्हे. सुब्बण्णा जरा हट्टी आहे. आपण जर हे सांगितले तर उगीच आरडओरडा होईल म्हणून तसे केले असावे असे म्हणून ते आपल्या कामाला लागले.

पाच-सहा दिवस झाले तरी सुब्बण्णाचा पत्ता नव्हता. शास्त्रींना जेवण जाईनासे झाले. एकुलता एक मुलगा. त्याला पंचवीस वर्षे वाढवले. तोच धाकटा आणि तोच थोरला. वयाने तो मोठा असला तरी अजून त्याचे बाळपणच त्यांच्या डोळ्यापुढे येत होते. नातवावरही त्यांचे फार प्रेम होते. रोज त्यांच्या बरोबर सुब्बण्णा जेवावयास बसत असे. आता तो नसल्यामुळे त्यांना जेवण नकोसे वाटू लागले. कां बरे अजून आला नाही असा विचार त्यांच्या मनात घोळत असे. अलीकडे सुब्बण्णाच्या आईच्या मनातही एक प्रकारची भीती निर्माण होऊ लागली. सुब्बण्णाने जर वेगळे घर केले तर सुनेला चांगले वागवले नाही म्हणून लोक म्हणतील ही तिला भीती पडली. सुब्बण्णा एकटा जरी घरी आला तरी त्याची समजूत घालून सुनेस परत बोलावून घेता येईल व आपली अब्रू वाचेल. नंतर एके दिवशी मुलाविषयी शास्त्रींनी चिंता व्यक्त केली. तेव्हा सुब्बण्णाची आई म्हणाली, "फार दिवसांनी सासुरवाडीस गेला आहे. आठ एक दिवस रहा म्हणाले असतील. राहिला आहे झालं. एवढं तुम्हांला सुनं सुनं वाटत असेल तर लवकर ये म्हणून निरोप पाठवा."

खरं सांगायचे म्हणजे सुनेच्या माहेरी जाऊन चौकशी करावी असे सुब्बण्णाच्या आईच्या मनात होते. परंतु तिचा अहंकार आड येत होता. शास्त्रींनी एका माणसाला चामराजनगराजवळील सुनेच्या गावी

पाठवले. पण गड्याबरोबर आला मात्र ललितेचा चुलतभाऊ! “ललिता आणि जावईबापू आमच्या गावी जातो म्हणून निघाले का?” असे त्यानेच उलट विचारले.

“हो ! येथून निघून तर पुष्कळ दिवस झाले.”
“नाही ! आले नाहीत ते. वाटेत चोरांनी, दरोडेखोरांनी तर त्यांनी गाठलं नसेल?”

शास्त्रींच्या काळजाचे पाणी पाणी झाले. आपल्या बायकोचा त्रागा सहन न होऊन सुनेनेच नवऱ्याला बाहेर काढले असावे, असे त्यांना वाटले. परंतु मुलगाच आपणहून बाहेर पडला असेल असे या प्रसंगीही त्यांना वाटले नाही. कारण काही झाले तरी मुलगाच तो. असा विचार त्यांच्या मनात चालला असताना व्याह्यांना उद्देशून शास्त्री म्हणाले, “घरात बायकाबायकांत काही झालं व हे लोक बाहेर पडले. त्यामुळे मला वाटलं ते तुमच्याचकडे आले असतील. तुमच्याकडेही नाहीत म्हणता? आता पाहू कोठे गेले आहेत ते.”

सुब्बण्णाची आई मात्र सुनेवरच ठपका देऊन म्हणाली, “पहा! माझी मुलगी घरी आली आणि ही बाहेर पडली. हिच्या मनात नव्हतं तर मी माझ्या मुलीला तेव्हाच परत पाठवलं असतं. ही नवराबायको सुखानं राहिलेलं पाहणं मला काय नको आहे?”

ललितेचा भाऊ शास्त्रींना म्हणाला, “तुम्ही आता त्यांना कुठं हुडकणार? तुमचा अंदाज जरी तुम्ही सांगितलात तरी मी जाऊन तपास करीन व सापडले तर बरोबर घेऊनही येईन.”

शास्त्रींनी संमती दिली. राजवाड्यातील एका गड्यास सोबतीस दिले व खर्चासाठी काही पैसेही दिले.

सुब्बण्णा कोणत्या वाटेने गेला हेच कळले नाही. त्यामुळे आठ-दहा दिवसांनंतर व्याही व गडी हात हलवत परत आले. आता मात्र शास्त्री हताश होऊन कुढू लागले!

“मीच अभागी. सुनेबरोबर राहण्याचं भाग्य माझ्याच नशिबी नाही. सुब्बण्णा परत येऊ दे. त्रीणेश्वर देवळात शंभर नारळ फोडीन” असा स्वतःस दोष देत सुब्बण्णाची आई नवस बोलली. घरावर दुःखाची दाट छाया पसरली.

रात्री घरून निघताना कोठे जावयाचे हे काही सुब्बण्णाने ठरविले नव्हते. कोठेतरी घरापासून दूरदूर जावयाचे व तेथे एक लहानसे घर करून बायकामुलासह रहावयाचे. संगीत शिकवून उपजीविका चालविणे काही कठीण होणार नाही. वेश्यांना जरी शिकवले तरी परगावी कोण नावे ठेवणार? मुलाला वाटेल तेवढे दही घालता येईल, बायकोस निष्कारण अश्रू ढाळावे लागणार नाहीत, असे विचार मनात आणीत, मजल दरमजल करीत चार महिन्यांनी तो काशीस पोहोचला. आपली बायको गर्भवती आहे हे जणू विसरलाच होता. प्रवासाच्या दगदगीमुळे रायचूरच्या जवळपास असताना ललिलतेचा गर्भस्त्राव झाला. त्यामुळे एक आठवडा तेथे मुक्काम करावा लागला. काशीस पोहोचेपर्यंत ललिता हैराण झाली. मुलगा रोड झाला. सुब्बण्णाही कंटाळला. एक महिना ते तेथेच राहिले. नंतर कलकत्त्याला पोहोचले. तेथे सुब्बण्णाने एक छोटेसे घर भाड्याने घेतले व संगीताच्या शिकवण्या करून कलकत्त्यातील एका सावकारास, सावकाराच्याच नावाने नीलास पैसे पाठवण्यास सांगितले. कारण सुब्बण्णाने गाव सोडताना

प्रवासखर्चासाठी नीलाकडून पैसे घेतले होते. आज तो त्या ऋणातून मुक्त झाला होता. आजपासून त्याचा व म्हैसूरचा संबंध सुटला व तो आता जणू बंगालीच बनला.

पन्नास वर्षे एकूण सुब्बण्णा कलकत्त्यात राहिला. पस्तीस वर्षे तरी त्याने म्हैसूरशी संबंधही ठेवला नव्हता. त्यामुळे त्याच्या जीवनाच्या ह्या भागाचे वर्णन मी विस्ताराने करीत नाही. ह्याचे कारण मला ते माहीत नाही. सुब्बण्णा कशाविषयीही कधी बोलत नसे. कलकत्त्यातील त्या पस्तीस वर्षांविषयी तर त्याने मौनच स्वीकारले होते. मी आपणहून कधी तो विषय काढला तर ते म्हणावयाचे 'तो विषय काढू नका.' ते स्वतः आपणहून केव्हातरी बोललेल्या एक दोन संदर्भांवरून मला त्यांच्या जीवनाची अशी कल्पना आली. सुब्बण्णा कलकत्त्यास गेल्यावर एक दोन वर्षे, म्हैसूरमध्ये आपले वडील आपल्याविषयी काळजी करीत असतील हेही तो विसरला होता. नीलाला आपण पैसे पाठवल्यामुळे आपण जिवंत आहोत हे म्हैसूरमध्ये एकाला तरी समजेल असे त्याने गृहीत धरले होते आणि झालेही तसेच. मुंबईच्या सावकाराकडून आलेल्या हुंडीविषयी सावकार वर्धमान याने नीलाकडे निरोप पाठवला, "तुला उत्तरेकडून पैसे यावयाचे आहेत का?"

"नाही."

"मुंबईच्या सावकाराकडून तुझ्या नावे पैसे आले आहेत. उत्तरेकडून कुणी तरी पाठवले आहेत म्हणे!"

"किती?"

"दीडशे? "

नीलाला तात्काळ आठवले की आपण काही महिन्यापूर्वी दीडशे रुपये फक्त सुब्बण्णालाच दिलेले आहेत. दुसऱ्या दिवसापासूनच सुब्बण्णा आपल्या घरी आला नाही. देशांतराला गेला असे नंतर आपणास समजले. त्या दिवशी रात्री सुब्बण्णा जेव्हा आला तेव्हा तिने आश्चर्याने विचारले,

"काय! या वेळी आलात? "

"हो नीला! माझं एक काम कर."

"सांगावं!"

"पैसे पाहिजेत मला."

"किती?"

"शंभर रुपये दे. मी परत करीन तुला."

"एवढेच ना?"

असे म्हणून नीला चटकन् आत गेली व शंभराची एक नोट आणि पन्नासाची एक नोटही घेऊन आली. शंभराची नोट सुब्बण्णास दिली. "पुरतील एवढे? हे घ्या अजून पन्नास. अडीअडचणीला उपयोगी पडतील." असे म्हणून तिने पन्नासाची नोट पुढे केली. क्षणभर सुब्बण्णा थबकून उभा राहिला. पण लगेच ती नोट घेऊन म्हणाल, "असू देत. दीडशे पाठवीन तुला."

"परत पाठवण्याचं काही कारण नाही. तुमच्या सारख्यांना पैसे देण्यानंच आमचा जन्म सार्थकी लागतो"

पाच-सहा महिन्यानंतर कोठून तरी हे दीडशे रुपये आले यावरून ते पैसे सुब्बण्णानेच पाठवले आहेत हे तिला समजले. पण ते पैसे घेताना मात्र तिला अतिशय दुःख झाले. ते पैसे आणून तिने देवाच्या पेटीत ठेवले व सुब्बण्णाची आठवण म्हणून त्याची ती पूजा करू लागली. एक-दोन वर्षांपर्यंत तिने त्या पैशाच हातही लावला नव्हता. पण असे सुब्बण्णाकडून पैसे आले हे सुब्बण्णाच्या आईवडिलांना कळविले, 'आईला विसरला तरी वेश्येची आठवण आहे!' असे निष्ठुर उद्‌गार सुब्बण्णाच्या आईने काढले.

"अजूनही तू तुझा निष्ठुरपणा सोडत नाहीस. काय करावयाचं!" शास्त्री हताशपणे म्हणाले.

"मी तरी काय करणार! माझ्यासारखाच तोही हट्टी आहे. माझंच कर्म! त्या सुनेला वागवून घेण्याचं भाग्य माझ्या नशिबी नाही. पण तुम्ही काही म्हणा, माझा मुलगा कितीही हट्टी असला तरी तो कधीही मला उलटून बोलला नाही. त्याला घेऊन ती कुठं गेली देव जाणे!" असे म्हणून सुब्बण्णाच्या आईने अश्रू ढाळले व आपल्या सुनेस एकदा पाहण्याची इच्छा व्यक्त केली.

सासू-सुनेची भेट घडलीच नाही. सासूचे बोलणे कठोर होते, वागणे कठोर होते, पण मन कठोर नव्हते. सासूने सलगी करू नये म्हणून सुब्बण्णाची आई तशी वागायची. सून निघून गेल्यावर त्या फारच हळव्या बनल्या. मुलाला सुनेला आपणच दूर केले या विचाराने त्या पस्तावल्या. दोन-तीन वर्षे आईवडिलांनी मुलगा व सून परत येतील म्हणून वाट पाहिली. शेवटी एकदा सुब्बण्णाची आई म्हणाली. "आली नाहीत तरी चालेल. जेथे आहेत तेथे सुखी आहेत असं कळलं तरी पुरे."

"आमच्या समोर नाहीत तर कुठंही सुखात राहू देत या म्हणण्यात काय अर्थ आहे?" नारायणशास्त्री म्हणाले.

वडिलांचे वय झाल्यामुळे मुलींपैकी एक ना एक घरी येऊन रहात असे. म्हातारे वडील नातवंडांशी खेळत मन रमवीत असत. मधून मधून सुब्बण्णाच्या मुलाची आठवण होताच नातवंडांशी खेळणे विसरून शून्यात नजर लावून बसत. त्यांची ही रीत घरात सर्वांना कळून गेली होती. कुणालाही त्यांचे कसे समाधान करावे कळत नसे. मध्येच मुलगी येऊन म्हणावयाची, 'बाबा, आज मी मिरीचं सार करू का?' 'आज पुराणाला केव्हा जाणार?' असे प्रश्न विचारून वडिलांचे लक्ष दुसरीकडे वळवत असे. अशीच दहा वर्षे गेली.

हरिद्वारला जत्रा होती. शास्त्री राजवाड्याकडून मदत घेऊन गंगायात्रेस निघाले. बायकोही बरोबर होती. म्हैसूरमधील आणखी दोघेतिघे जण बरोबर होते. शास्त्रींना वाटावयाचे की या यात्रेत कुठेतरी मुलगा

दृष्टीस पडेल. पण मनातील हा विचार त्यांनी बायकोपुढे कधीच बोलून दाखवला नाही. कलकत्त्यामध्ये ललिता एके दिवशी सुब्बण्णासा म्हणाली. “हरिद्वार इतकं जवळ असून आपण ह्या तीर्थास जात नाही म्हणजे काय? जाऊयाच” तिने अगदी हट्टच धरला. त्यामुळे सुब्बण्णा ललिता व मुलासह हरिद्वारकडे निघाला. तसे पाहिले तर यापूर्वी ललिताने अनेक वेळा आपल्या गावी जाण्याविषयी बोलणे काढले होते. पण दर खेपेस सुब्बण्णा म्हणावयाचा ‘ती एक गोष्ट सोडून काही बोल.’ पण आता आढेवेढे न घेता तो झटकन हरिद्वाराला निघालेला पाहून तिला फार बरे वाटले. मेळ्याला म्हैसूरहून निश्चित कोणीतरी येणार, त्यांच्याकडून आपल्या गावी आपली खुशाली कळविता येईल, त्यांचे क्षेमकुशल समजून घेता येईल, आलेल्या लोकांना पाहिल्यावर कदाचित सुब्बण्णाचे मनही बदलेल, असे तिचे मनोराज्य चालले होते. पण सुब्बण्णाला मात्र सारखे भय वाटावयाचे, कोणीतरी म्हैसूरकडचे भेटून गावी चल असा आग्रह धरला तर काय करावयाचे? म्हैसूर व आपले घर ह्याविषयी त्याला तिटकारा निर्माण झालेला होता.

एकदाचे ते हरिद्वाराला आले. एके दिवशी सुब्बण्णास म्हैसूरकडील एका माणसाने पाहिले सुब्बण्णा ‘सुब्बण्णा’, ‘सुब्बण्णा’ अशा हाका मारीत तो मागून आला. सुब्बण्णाने वळून पाहिले व एका घोळक्यात शिरून लपण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तो माणूस ‘सुब्बण्णा, तुझे आईवडील आले आहेत’ असे ओरडला. हे ऐकताच सुब्बण्णाला एक क्षणभर वाटले की वडिलांना भेटावे. तेवढ्यात त्याचे दुसरे मन म्हणाले, ‘छे! काही नको. ज्यांचा मी कोणी लागत नाही म्हणून गाव सोडून आलो त्यांना कशाला भेटावयाचं?’ सुब्बण्णा तेथून निसटला व पुढील अर्ध्या तासात त्याने बायकोमुलास काहीही न बोलू देता कलकत्त्यास परत नेले!

सुब्बण्णाला ज्याने पाहिले होते त्याने नारायणाशास्त्री व त्यांच्या बायकोस तसे सांगितले. ह्या गोष्टीवर सुब्बण्णाच्या आईने विश्वास ठेवला नाही असे दिसले. कारण त्या म्हणाल्या, “कुणाला तरी पाहून सुब्बण्णा म्हणत असाल तुम्ही.” पण शास्त्री मात्र मनात म्हणाले, “सुब्बण्णाच असेल तो. त्याला जर मला भेटावयाचं असतं तर तो आला असता. ते भाग्य या जन्मी नाही. सुब्बण्णा भेटेल या इच्छेनं गंगायात्रेचं मी केवळ निमित्त केलं तरी गंगामाते, माझे हे पाप धुऊन टाक.” अशी त्यांनी प्रार्थना केली. यात्रा संपली. सारे म्हैसूरला परतले.

पुढील वर्षी नारायणशास्त्री कैलासवासी झाले. सुब्बण्णाच्या आईने मुलीच्या मुलाकडून क्रियाकर्म करविले. घर भाड्याने देऊन मुलींच्याचकडे थोडे थोडे दिवस त्या राहू लागल्या. वय वाढले तशी व्यथा वाढली. तीन वर्षांत त्यांनाही देवाज्ञा झाली. जावयांनी त्यांचे ते घर विकून पैसे वाटून घेतले. सुब्बण्णाच्या आईवडिलांची कहाणी येथे संपली.

# ५

तसे पाहिले तर सुब्बण्णा कलकत्त्यात फार सुखात होता असे म्हणता येणार नाही. कारण सुख लावून घेण्याचा त्याचा स्वभाव नव्हता. लोकांच्याकडून तो इतक्या चांगुलपणाची अपेक्षा तो करी की, परिणामतः त्याच्या पदरी निराशाच येई. अशा ह्या स्वभावाच्या लोकांना सूर्य जरा कमी तेजस्वी वाटला, वारा जरा मंद वाटला तरी त्यात काही नवल नाही. म्हैसूरचे लोक चांगले वाटले नाहीत म्हणून कलकत्त्यात आला. घरच्या लोकांप्रमाणेच बाहेरचे लोकही त्याला बरे वाटले नाहीत. तीच कथा कलकत्त्याची. गवई लोकांत एक प्रकारचा मत्सर हा सर्वत्र असावयाचाच. त्याला महाराजांच्या पुढे जाण्याची संधीच मिळालेली नव्हती, त्यामुळे त्याला जीवन नकोसे वाटले होते, म्हणून तो कलकत्त्याला आला. येथील लोकांविषयीही त्याली मत्सर, अनादर उत्पन्न झाला. जन्मगांवीच आपुलकीने बोलणारे लोक कमी, हे तर परकेच गाव. असे असूनही कलकत्त्यात त्याला गाण्याच्या काही शिकवण्या मिळाल्या. दाक्षिणात्या पद्धतीचे गाणे काही लोकांना आवडले हेच त्याचे कारण. लहानलहान गाण्याच्या बैठकाही झाल्या. थोडाफार पैसाही मिळाला. एकंदरीत जीवनाला गती मिळाली. ललितेस चांगली लुगडी घेता आली. मुलाला कपडे शिवता आले. बाहेर ओळखीदेखी फार नसल्यामुळे घरात मन रमले. ललितेविषयी आपुलकी वाढली. तिचा स्वभाव जसजसा उमजत गेला तसतसा तिच्याबद्दल आदर निर्माण झाला. मुलगा तर त्याचा पंचप्राण होता. दोघांविषयीचे प्रेमच जणू त्याच्या हृदयातून गाणे होऊन बाहेर पडत होते. चारचौघांच्या संसाराप्रमाणे याच्याही संसारात सुखदुःखाचा लपंडाव चालू होता.

ललितेच्या अंगाला सुख मानवू लागले. तिच्या लेखी सुब्बण्णाच सारा प्रपंच व परमेश्वर होता. तो सुखात असलेला पाहिला म्हणजे त्याहून जास्त तिला काहीच नको होते. अशा मनोवृत्तीच्या स्त्रिया अनेक असतात. पुराणातील सीतासावित्रीच्याच जणू या प्रतिनिधी! या स्त्रियांची जी एकनिष्ठा असते ती कोणत्याही तपस्याहून कमी म्हणता येणार नाही. त्यामुळे त्यांना जीवनात सारे काही मिळते. ललितेचेही तसेच झाले. ललितेला पूर्वीपासूनच सुख व आशा याविषयी विशेष आसक्ती नव्हती. मी आणि माझे ही भावना तिने जिंकलेली होती. अशा मनोवृत्तीची ललिता आपला पती व मुलगा हे सोडून दुसरे जगच नाही असे मनात असे. ती जणू त्यांचे रक्षण करणारी देवता बनली. नवऱ्याचा संगीताचा छंद तिच्यातही उतरला. ती शेजारपाजारच्या मुलांना जमवून त्यांना लोकगीते शिकवत असे. घरकाम, गौरीची पूजा, मुलाचे पालन, नवऱ्याची मर्जी राखणे, शेजाऱ्यांच्या सुखदुःखात सहभागी होणे हेच तिचे जीवन झाले होते.

जीवन काय, कोठेही कंठता येते. त्याला विशेष कष्ट पडत नाहीत. योग्य रीतीने जीवन कसे घालवावे हे शोधण्यास कष्ट फार पडतात. सुब्बण्णा व ललिता अत्यंत शांत रीतीने कलकत्त्यात बारा वर्षे राहिली. या काळात त्यांना एक मुलगी झाली. त्यानंतर तीन वर्षांनी एक मुलगा झाला. फार दिवसांनंतर झालेल्या मुलास अत्यंत प्रेमाने चार वर्षे त्यांनी वाढवले. परंतु तो जगला नाही व एकाएकी थोरल्या मुलाला, शेषाला विषमज्वर झाला व काहीही इलाज न चालता तो देवाघरी गेला.

ललितेला अत्यंत दुःख झाले. सुब्बण्णास तर अंगावर वीज पडल्याप्रमाणे झाले. दुःखी ललितेने गौरीपूजेत अधिकच मन गुंतवले व प्रार्थना केली 'आई, त्याला तू बोलावून घेतलंस त्याकरिता मी रडत नाही. पण मागं राहिलेल्यांचं रक्षण कर एवढंच माझं मागणं,' असा नवस मागून घेण्याचे कारण असे की काही दिवसांपूर्वी, आपले सासूसासरे स्वर्गस्थ झाल्याचे स्वप्न तिने पाहिले होते. पण तिने ते नवऱ्यास

कळविले नव्हते. आपले भय, आपली आशा हे सारे दमन करून देवाची जिवाभावाने भक्ती करणे, पतीस देव मानणे हीच तिची जीवननिष्ठा होती. सुब्बण्णाच्या कष्टी जीवास ह्या मुलाच्या मृत्यूने फारच मोठा धक्का बसला. ललिता देवाकडे जशी वळली तसा सुब्बण्णा वळला नाही. देवाविषयी विचार करून तो असे म्हणत असे की 'कसला देव अन् काय? रत्नासारख्या माझ्या मुलाला हिरावून नेलं! यापेक्षा मोलाचं माझ्याकडे काय होतं?' तरीही काही दिवसांनी दुःखाचा पूर ओसरला. सुब्बण्णा पुनः पहिल्याप्रमाणे गाण्याच्या शिकवण्या करण्यात रमू लागला. वाढते वय व दुःखाचा तडाखा या दोन्ही गोष्टींमुळे नकळतच त्याचे मन हळुवार होत चालले होते.

मुलगी आता नऊ वर्षांची झाली. त्यामुळे ललिता पुन्हा पुन्हा गावाची आठवण काढू लागली. मुलगी आता लग्नाला झाली, तिला योग्य वर शोधला पाहिजे, असे ती म्हणू लागली. पण सुब्बण्णा गावी जाण्यास तयार नव्हता. तेथे गेल्यावर आई-वडिलांच्याकडे गेले पाहिजे. ते हयात तरी आहेत की नाहीत हे माहीत नाही. घरून निघताना शेषाला घेऊन आलो. आता मात्र त्याच्याशिवायच जावयाची वेळ येणार, हे विचार त्याला गावी जाण्यापासून परावृत्त करीत होते. पण मुलीस वर पाहणे अगत्याचे आहे या दृष्टीने गावी चौकशी तरी करावी म्हणून पत्र पाठवून पहावे एवढी मनाची तयारी सुब्बण्णा करू पहात होता. तेवढ्यात एके दिवशी, गंगेच्या काठी अंग धुण्यास गेलेली मुलगी प्रवाहात वाहून गेली! अंधारात सापडून छाती फोडून घेणाऱ्या मुलाप्रमाणे सुब्बण्णा व ललिताची स्थिती झाली. "मी गेल्या जन्मी असं काय पाप केलं म्हणून हे सारं माझ्या वाट्यास येत आहे? या जन्मी मी तुम्हाला तुमच्या आईवडिलांपासून दूर केलं म्हणूनच ही शिक्षा मी अनुभवीत आहे काय?" असा आकांत करीत ती नदीकाठी बसून राहिली. विचार करण्याची शक्तीच नाहीशी झालेला सुब्बण्णा मुलीची अंत्यक्रिया आटोपून, बायकोचा हात धरून घरी परतला.

ही शोकांतिका वर्णन करण्यास मला दुःख होत आहे. पण जसे घडले तसेच सांगितल्याशिवाय गत्यंतर नाही. ही काही कल्पित कथा नव्हे. ललितेच्या जीवनात दुखण्याने प्रवेश केला. तिने गाव सोडण्याविषयी हट्ट धरला. पण सुब्बण्णाची भावना मात्र निराळी होती. केवढ्या जिद्दीने आपण आलो! आणि आज असा हताश परिस्थितीत आपण परत जातो याचा अर्थ काय? तेथे जाऊन तरी काय होणार आहे? राहूया इथेच. कावळा जसा पाण्यात भिजतो तसे आपण दुःखात भिजून निघालो. आता कुठेही जीवनयात्रा संपविली तरी सारखेच – त्याच्या मनातील हे सारे जाणून ललिता गप्प राहिली. ती म्हणाली, 'आई जगदंबे! पती हाच परमेश्वर अशी भावना जी दिलीस ती टिकून राहू दे. सारं दुःख पाहून झालं. आता ह्यांचं सुखदुःख तूच पहा व मला सवाष्णपणीच मरण येऊ दे हीच प्रार्थना. मरणापूर्वी मला आईची भेट होण्याइतकं पुण्य दे.'

ते पुण्य तिला मिळालेच नाही. पण मागितलेले इतर मात्र मिळाले. सतत तीन वर्षे दुखणे बळावत गेले व एके दिवशी ती निघून गेली.

शेवटच्या क्षणापर्यंत, एखाद्या लहान मुलाची जशी काळजी घ्यावी तशी काळजी सुब्बण्णाने ललितेची घेतली. शेवटी शेवटी तरी नवराबायकोचे नाते गळून पडून भाऊबहिणींचे प्रेम त्यांच्यात उत्पन्न झाले. त्यांची मने एक झाली. ललिता केव्हाही 'देवाची इच्छा, देवाचं काम' अशाच शब्दांत बोलत असे. सुब्बण्णा तिचे सारे बोलणे ऐकत तिच्या शेजारी बसे. 'किती संस्कार-संपन्न जीव आहे हा! मीच हेकेखोर. माझ्या हट्टामुळे मी सांगेन ती सारे करीत ही आपले स्वत्व विसरून गेली. हिची देवभक्ती अपार' असे विचार बसल्या बसल्या त्याच्या मनात येत. 'आपणास सुधारण्याकरिता अवतार घेऊन आलेली जणू ही देवीच'

अशी सुब्बण्णाची ललितेविषयी धारणा झाली. त्यामुळेच तो ललिता गेल्यावर रडत बसला नाही. तिची उत्तरक्रिया उरकून, आता आपण काय करावे याचा तो विचार करू लागला. ज्या देवावर ललितेची एवढी दृढ निष्ठा होती त्या देवाविषयी आपल्यातही काही भक्तिभाव निर्माण होऊ दे म्हणून तो एकदा यात्रा करून आला.

## ६

आम्ही जन्माला कां येतो? आपण कसे जगतो? आपण कोठून येतो व कोठे जातो? संसारसागरात उचंबळून येणाऱ्या लाटांच्या पर्वतांना हिमालय समजून कां घाबरतो? हालअपेष्टांना भ्रम म्हणायचे की भीती म्हणायची? सुख शाश्वत की तृप्ती शाश्वत? —अशाच हजारो प्रश्नांचा विचार करीत करीत सुब्बण्णा एकटाच यात्रा करत हिंडला. त्यांनी अनेक देवांची सेवा केली. परत कलकत्त्यास येईपर्यंत त्याला वरील प्रश्नांना निश्चित असे उत्तर मिळाले नाही. जीवन म्हणजे एक बहुरूपी नाटक आहे असे वाटले. त्याला आता साठ वर्षे झाली. त्याला मागचे सारे काही आठवत होते. आपण वैतागाच्या भरात म्हैसूर सोडले, कलकत्त्यास संसार थाटला, हे सारे एका नाटकाप्रमाणेच वाटत होते. आपली ललितेशी गाठ पडली हे आपल्या जन्मातील मोठे पुण्य असे तो समजला. तिने जीवनात जी सहनशीलता दाखवली ती आपण दाखवू शकलो नाही याचे त्याला वाईट वाटत होते. आपण आईवडिलांना सोडून आलो ही चूक झाली असेही त्यांच्या मनात आले. आपला मुलगा व मुलगी गेली त्या वेळी आपल्याला किती दुःख झाले त्यावरून आपण आईवडिलांना सोडून आलो तेव्हा त्यांना किती बरे दुःख झाले असेल याची सुब्बण्णाला आज कल्पना येत होती. आपण तर आपल्या नाकासमोर पाहून चालणारे, इतरांच्या सुखःदुखाकडे आपण पहात नाही असे अनेक विचार यात्रा संपवून कलकत्त्यास येईपर्यंत सुब्बण्णाच्या मनात घोळत होते.

सुब्बण्णा कलकत्त्यास आले. मुलगा व ललिता यांची आठवण बळावली. आपण केले ते चुकीचे होते. मुलगा फारच लहान वयात गेला. तो म्हैसूरला असता तर त्याला किती सुख झाले असते कोण जाणे! दहीभात वाढण्याचेही त्या घरात स्वातंत्र्य नव्हते. ललितेला तरी सुख झाले असते का? कारण तिला रोज बोलणी खावी लागत होती. हा सारा विचार आल्या बरोबर सुब्बण्णाला पुन्हा वाटावयाचे की आपण केले तेच बरोबर झाले. परप्रांतात आलो तरी काय झाले? कसेही वागलो तरी काय झाले? ललिता व मुलगा यांना आपण त्यांच्या हयातीत निश्चित सुख दिले. आता माझी जीवनकथा कशीही झाली तरी चालेल. मी कसाही वागलो तरी चालेल. उरले तेवढे दिवस कसेतरी घालवले म्हणजे झाले, असा सुब्बण्णाने विचार केला. त्याने घरात सर्वत्र नजर फिरविली. त्याच्या पोटात कालवाकालव झाली. त्याच्या सुखाकरिता, ज्याच्या पालनपोषणाकरिता आम्ही येथे आलो, तोच मुलगा गेला! जिच्याकरिता हे घर उभे केले तीच गेली! त्या दोघांच्या बरोबर मी बांधलेले मनोरे, मुलांनी बांधलेल्या वाळूच्या घरकुलाप्रमाणे उद्ध्वस्त झाले. देवाच्या सान्निध्यात असताना आम्हाला जी शांती लाभते ती संसारात लाभत नाही. सुब्बण्णा रहात होता तेच घर आता त्यांनी विकत घेतले होते. संसारासाठी लागणारे नाना तऱ्हेचे सामानही घेतले होते. मुलासाठी अनेक तऱ्हेचे कपडे करविले होते. मुलगा गेल्यावर ललितेने ते सारे कपडे एका पेटीत भरून ठेवले होते. मुलीकरिता घेतलेले कपडे, दागिने आणखी एका पेटीत ठेवले होते. ललितेचे सामान तर होतेच. सुब्बण्णाने हे सारे पाहिले. पेटीतील वस्तू न् वस्तू काढून पाहिली. जे सुख गमावून बसला होता त्याचे चिंतन करून तो थकला. शेवटी त्या कलकत्त्याच्या घरात राहणे शक्य नाही असे त्याला वाटले. त्यामुळे त्याने आपल्याकडे शिकवणीस येणाऱ्या सर्व मुलांना बोलावून ‘मी आता गावी जाणार आहे. तुम्हाला या घरातील जे सामान पाहिजे ते घ्या’ असे सांगितले. त्या मुलांनी घेऊन उरलेले सामान आसपासच्या गोरगरिबांना वाटले. घर एका भजनी मंडळास दिले व फार दिवसाच्या सोबती फिडल आणि पैसे बरोबर घेऊन सुब्बण्णाने कलकत्ता सोडले.

पण कुठे जावयाचे हेच त्याने ठरविले नव्हते. तो स्टेशनवर आला. हातात असलेले सर्व पैसे स्टेशनमास्तरला देऊन तो म्हणाला,

“एक तिकीट द्या.”

“कुठलं?”

“कुठलंही”

“म्हणजे? कोणत्या गावी जावयाचं तुम्हाला?”

स्टेशनमास्तरने जरा चढत्या सुरातच विचारले. सुब्बण्णाला आपल्या त्या अवस्थेची जाणीव होऊनही थोडा राग व थोडे हसू आले. तो स्टेशनमास्तरला म्हणाला. “साहेब, अमुक एका गावचं तिकीट द्या म्हटलं तर ते तिकट तुमच्याकडे आहे की नाही हे पाहण्याचे कष्ट तुम्हाला पडतात. पण मी कोणत्याही गावचं तिकीट द्या म्हणतोय तर तुम्हाला त्यांत काय त्रास वाटतो? तुमच्या हातातील पैसे मोजा व त्या पैशात कुठपर्यंतचं तिकिट देता येईल ते द्या.”

स्टेशनमास्तरने निरखून पाहिले. वेडा दिसतोय! दक्षिण देशाचा असावा, असा अंदाज करून त्याने मुंबईचे तिकीट देऊन टाकले व राहिलेले तीन रुपये आणि चिल्लर परत केली. ते तिकिट कोणत्या गावचे आहे हेही न पाहता सुब्बण्णा गाडीत बसला.

# ७

दोनचार दिवसांच्या प्रवासानंतर सुब्बण्णा मुंबईस पोहोचला. पोहोचताच स्टेशनवर त्याचे तिकीट मागून घेतले गेले. त्यामुळे त्याच्या लक्षात आले की आपला प्रवास संपला. म्हणून तो तेथे मिठाईच्या दुकानाजवळ बसून फिडल वाजवू लागला येणारे जाणारे लोक त्याचे वादन ऐकण्यास जमू लागले. साहजिकच मिठाईचा खप वाढला. शेवटी त्या दुकानाची म्हातारी मालकीण म्हणाली, "बाबारे, तुझ्यामुळे माझ्या मिठाईचा खप वाढला. त्याकरिता मी तुला काहीतरी देणार आहे. घेशील ना?"

"मला काही नको. मला एक वेळ पोट भरण्याएवढी मिठाई द्या म्हणजे पुरे."

"ठीक आहे. अवश्य देते. रोज जरी तू आलास तरी मी तुला मिठाई देईन."

असे म्हणून म्हातारीने त्या दिवशी मिठाई दिली. सुब्बण्णालाही हा परस्पर व्यवहार बरा वाटला. त्यामुळे पुढे पंधरा दिवस तो रोज फिडल वाजवून मिठाई घेत असे. पंधराव्या दिवशी सुब्बण्णा फिडल वाजवत असताना एक मोटार त्या दुकानासमोर येऊन थडकली. मोटारीत बसलेला माणूस फार श्रीमंत दिसत होता. त्याच्या हातातील हिऱ्याची आंगठीच हजार रुपयांची असावी. अशा त्या श्रीमंताची मोटार पाहून साऱ्या लोकांनी वाट करून दिली. त्या श्रीमंताने पाचदहा मिनिटे मोटारीत बसूनच फिडलवादन ऐकले व नंतर त्या म्हातारीजवळ चौकशी केली, "हा कोण? तुझं आणि त्याचं काय नातं आहे?"

"तो कोण हे मला माहीत नाही. रोज तो फिडल वाजवतो आणि मी त्याला मिठाई देते."

सुब्बण्णाचा राग वाजवून झाल्यावर त्या धनिकाने विचारले, "काय राव, तुमचं गाव कोणतं?"

सुब्बण्णाला संगीत-सुखाशिवाय कसल्याही बोलण्यात गुंतणे नको होते, त्यामुळे तो 'गीतगोविंदा' तील दुसरे एक गीत वाजवण्यात मग्न झाला. धनिकाला ते ऐकून अतिशय आनंद झाला. ते गाणे संपताच धनिकाने चढत्या आवाजात विचारले, "राव, आमच्याबरोबर येता का जरा? संगीत ऐकावयाची इच्छा आहे आम्हाला." त्याचा तो आवाज ऐकून सुब्बण्णाला थोडा रागच आला. ह्या दुकानापुढे वाजवणे त्याने आपण होऊनच ठरविले होते. त्यात स्वार्थ व परमार्थ दोन्ही साधत होते. त्यामुळे तसे करण्यात सुब्बण्णाला काही कमीपणा वाटला नाही. आपणास रस्त्यावरील वादक समजून तर हा धनिक येवढ्या तोऱ्यात आपल्याला बोलावत नसेल ना, ह्या विचाराने सुब्बण्णा अस्वस्थ झाला. तेवढ्यात त्याने असा विचार केला की अहंकाराला आपण थारा देता कामा नये. पोट भरण्याकरिता पूर्वी नाही का आपण संगीताच्या शिकवण्या केल्या? असेच आताही समजू व धनिकाचे आमंत्रण स्वीकारू, असे ठरवून सुब्बण्णा म्हणाला. "चला तर." त्या गावाची चौकशी केली. 'मुंबई' असे उत्तर मिळाले. कोणतेही गाव असले तरी सारखेच या भावनेने सुब्बण्णा गावात शिरला. स्टेशनमास्तरने जे पैसे दिले होते त्यात काही खर्च होऊन आता सुब्बण्णाच्याजवळ फक्त दीड रुपया राहिला होता. गल्लीतील एका दुकानातून त्याने मिठाई विकत घेतली. देवळापुढे बसून तेथे काही वेळ घालवून तेथेच एका नळाला पाणी आलेले पाहताच स्नान आटोपून त्याने ती मिठाई खाल्ली.

प्रवासात अनेक विचार त्याच्या मनात आले. बायकापोरांची आठवण होऊन वाईट वाटले. आपण काहीही मनास फार लावून घेतले नाही तरच आपण सुखी होऊ अशा निर्णयाला सुब्बण्णा आला. जेथे संबंध तेथे दुःख. बंधच विसरल्यावर दुःख कुठले?- हा वेदांत काही नवीन नाही. गीतेमध्ये सांगितलेले तत्त्वही हेच, असे सुब्बण्णाला ऐकून माहीत होते. आता तेच अनुभवास आले. या तत्त्वाचा विसर पडूनच 'मी', 'माझं' करून अनेक कष्टांना तोंड द्यावे लागले. पुन्हा ती चूक करावयाची नाही. आता संन्याशाप्रमाणे रहावयाचे. राहिलेला दीड रुपयाही पुढील तीनचार दिवसांत संपून गेला. पाचव्या दिवशी मिठाई कशी मिळवावयाची हा प्रश्न उभा राहिला. पैसाकरिता काही काम केले तरी ते कामच.

मिठाईवाली म्हातारी सुब्बण्णास मिठाई देण्यास आली. धनिकाने अडविले. "काही नको, मी सारं देईन त्यांना." तेव्हा ती म्हातारी पांच रुपयाची नोट सुब्बण्णा. च्या पुढे करून म्हणाली, "हे घ्या. असू देत तुझ्याकडे अडीअडचणीला."

"पैसे! मला कशाला? नको, नको."

"तुला नाही समजायचं ते. तू आला आहेस परस्थळी. काही आजार वगैरे झाला तर कोण विचारणार? वाईट बोलू नये, तरी म्हणते परस्थळी कुत्र्याच्या मोतीनं मरण न यावं म्हणून केव्हाही चार पैसे बाळगून असावं. त्यातल्या त्यात एकदोन मित्र जोडून घे."

"हे पैसे तुझ्याचकडे असू देत. मला जेव्हा लागतील तेव्हा मागून घेईन तुझ्याकडून."

सुब्बण्णा व सावकार मोटारीत बसून निघून गेले.

धनिकाचे घर जणू राजवाडाच होता. त्याची वयस्कर आई, बायको व एकुलती एक मुलगी एवढाच त्याचा संसार होता. पण भोवतालचा परिवार पुष्कळ होता. धनिकाने आपल्या त्या मोठ्या घरातील रस्त्याकडील शेवटच्या खोलीत सुब्बण्णाला नेले व सांगितले, "तुम्ही इथेच राहा."

सुब्बण्णाच्या मनास येईल तेव्हा त्याने धनिकाला फिडल वाजवून दाखवणे एवढेच त्याला नेमून दिलेले काम होते. सुब्बण्णाला असले भले मोठे घर वा अपरंपार ऐश्वर्य काही नवीन नव्हते. त्याने असे पुष्कळ पाहिले होते. त्याला अशा गोष्टींचा कंटाळा आला होता. पैसेवाले लोक कसे वागतात, कसे बोलतात हे सारे सुब्बण्णाला माहीत होते. त्यामुळे सावकाराला सुब्बण्णाने स्पष्ट सांगितले, "साहेब, मी तुमच्या घरी राहण्यासाठी आलो नाही. मी परगावचा आहे. तुम्हाला गाणं ऐकावयाचं आहे ना? वाजवतो, ऐका. आणि केव्हातरी ये म्हणत असाल तर तसा येतो. तेव्हा ऐका."

"बरं, मग ऐकवा."

सुब्बण्णाने गीतगोविंदातली 'सा विरहे तव दीना' हे गीत वाजवून दाखवले.

सुब्बण्णाचे वाद्य वाजवण्याचे कौशल्य वर्णनातील होते. त्याने तोरेयपूर देवस्थानात एकदा फिडल वाजवले होते ते मी ऐकले होते. इतरांचेही फिडलवादन मी ऐकले आहे. तुलना करायची झाली तर असे

म्हणता येईल की सुब्बण्णाचे फिडलवादन म्हणजे जणू जिवलगाशी केलेले हितगुज होते. इतरांचे वादन म्हणजे सभेत दिलेले भाषण होते. आपले कौशल्य दाखवण्याचे साधन म्हणून इतर लोक वाजवतात पण सुब्बण्णाचे वादन मात्र त्याच्या जीवनाचे अविभाज्य अंगच होते. देहभान हरवून तो वाजवत असे. स्वरच जणू त्याला शोधत येत असत. जो भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसावयाचा तोच भाव त्याच्या वादनात व्यक्त व्हावयाचा. 'राधा विरहाने दीन झाली आहे' असे गीत जेव्हा तो देशी तोडीत वाजवत असे तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर कारुण्य ओथंबत असे. करुणेचा स्वर फिडलमधून असा काढावयाचा की बस! जेव्हा एखादा संगीतकार गायन वा वादन आपल्या कौशल्याच्या प्रदर्शनासाठी न करता ती पूजा समजून करतो तेव्हाच त्यात आगळेपण येते. गाणे हे साधन व आपण मोठे संगीतज्ञ असे न मानता जो स्वतःला सामान्य व संगीताला सर्वश्रेष्ठ समजतो त्याच्या गायनात व वादनात रसाचा साक्षात्कार होतो. संगीतकारांना किंवा संगीतज्ञांना हे सांगितले पाहिजे असे नाही. सुब्बण्णाचे वादन ऐकून सभेतील संगीताचे जाणकार असे अगदी बेभान व्हावयाचे! तशी श्रोत्यांची बेहोशी मी अलिकडे पाहिली नाही.

त्या दिवशी सावकाराच्या घरात सुब्बण्णाने जेव्हा 'सा विरहे तव दीना' हे पद वाजवले तेव्हा प्रकृतीला परमात्म्याचा चिरविरह अनुभवीत असताना जेवढे दुःख व्हावे तेवढे सुब्बण्णाच्या वादनातून प्रकट होत होते. त्यामुळेच सावकाराच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वहात होत्या. सावकाराच्या पत्नीनेही तेथेच बसून गाणे ऐकले होते. ती म्हणाली 'वा! फारच छान!' सावकाराची मुलगी सुब्बण्णाच्या जवळच बसून काहीतरी आपण विचित्र पहात आहोत अशा नजरेने एकदा सुब्बण्णाकडे व एकदा सुब्बण्णाच्या फिडल वाजवणाऱ्या हाताकडे पहात होती. सुब्बण्णाच्या वादनात पूर्वी कधीही प्रकट झाली नव्हती तेवढी विरहव्यथा आज साकार झाली होती. विरहव्यथा भोगणारी राधा नसून स्वतः सुब्बण्णाच होता. सारे मानव विरहावस्थेतच असतात, पण त्यांना त्याची जाणीव नसते. संसार म्हणजेच विरह. आपण आपल्या देवाचा शोध घेत असताना तो न दिसल्यामुळे जो ताप भोगतो तोच भवताप. आपण देवास पाहतो त्याच क्षणी आपण सुखी होतो. वयाला साठ वर्षे झाल्यावर सुब्बण्णाने देवाला पाहिले हा अनुभव ह्या दोनतीन क्षणात येऊन गेला. तो अनुभव त्याला स्वप्नवत् वाटला. सुब्बण्णाला जीवनाविषयी अधिकच विरक्ती उत्पन्न झाली. 'देवानं आपणास येथे रहा म्हणून सांगितलं व आपण मात्र निघून गेला. आता त्याची व आपली भेट कधी व्हावयाची? हा देह सोडल्यावरच ना? देवा, मला तुझ्याकडे कधी बरं बोलावून घेणार? तुझ्या विरहानं मी दीन झालो आहे.' अशा अर्थाचे वादन सुब्बण्णाने पुन्हा पुन्हा केले. सावकार खुषीत होते. त्यांची पत्नी त्यांच्या जवळच होती. मुलगीही जवळ होती. त्यामुळे सुब्बण्णा आपला हरवलेला आनंद आठवत होता. क्षणभर चमकून नाहीशा होणाऱ्या विजेप्रमाणे त्याच्या मनःपटलावर पूर्वी अनुभवलेला संतोष उमटून गेला.

गाणे संपताच, पुन्हा कधीतरी येईन, असे सांगून सुब्बण्णांनी सावकाराचा निरोप घेतला. त्या दिवशी त्याला काहीही नको होते. एका देवळात बसून आपल्या साऱ्या स्थितीचे त्याने चिंतन केले व 'देवा, काहीतरी मार्ग दाखव. मला ग्रासलेलं हे नैराश्य जाऊ दे.' अशी देवाची प्रार्थना केली. त्या वेळी ब्रह्मांडाच्या कारुण्य रसाने भरलेल्या कढईस अजाणतेपणे लहानसे भोक पाडणाऱ्या बालकाप्रमाणे त्याची स्थिती झाली. त्यामुळे काहीही कारण नसता आज सुब्बण्णाचे मन दीनपणाने भरून गेले. मानवाचा आत्मा आपल्याकडे वळवून घेण्याची भगवंताची ही रीतच दिसते. वेळोवेळी सुख अगर दुःख देऊन मानव आपणाकडे वळेल असेच देव करतो. आज सुब्बण्णाला दैन्यस्थिती खडतर तपस्या वाटत होती.

त्या दिवशी रात्री सुब्बण्णाला एक स्वप्न पडले. त्यात तो म्हैसूरमध्ये आई-वडिलांची सेवा करीत होता. जाग येऊन पाहतो तर ती अजून मध्यरात्र होती. हे असले कसले स्वप्न! साठ वर्षांचा म्हातारा

झालो. माझ्या जीवनाचे नाटक संपत आले. अजूनही आईवडिलांच्या विषयीचा मोह सुटला नाही—असे काहीतरी विचार त्याच्या मनात येऊन गेले व तशातच त्याला पुन्हा झोप लागली. तेव्हा त्याला मिठाई विकणाऱ्या म्हातारीचे बोलणे आठवले, 'परदेशी आला आहेस, आजारी पडलास तर कोण बघणार? मेलास तर अग्नी देण्यास देखील कोणी नाही. कुत्र्याच्या मोतीनं मरण येईल.' त्या क्षणी त्याला वाटले कसेही करून लवकरात लवकर गावी पोहोचले पाहिजे. सकाळी उठताच सुब्बण्णा सावकाराच्या घरी गेला. सावकार घरात नव्हते. त्यांच्या बायकोने सुब्बण्णाला बसण्यास सांगून फळे व दूध दिले. त्यांच्या मुलीने जवळ बसून त्यांना खाण्याचा आग्रह केला. यामुळे सुब्बण्णाला क्षणभर अत्यंत आनंद वाटला. परंतु आपली मुलगी असती तर तिनेही असाच आग्रह केला असता हा विचार येताच मात्र त्याच्या हृदयात कालवाकालव झाली. त्यामुळे सुब्बण्णा आपल्या मनाशी म्हणाला. 'मी या साऱ्या गोष्टी विसराव्या म्हटलं तरी विसरता येत नाहीत. असो, आता येथून लवकर निघणं बरं.' सावकार येताच गीतगोविंदांतील एक गाणे सुब्बण्णाने गाऊन दाखवले. सावकारांना ते ऐकून अत्यानंद झाला. त्यामुळे ते खूष होऊन म्हणाले, "सुब्बण्णा, तुम्ही आम्हाला नियमित फिडल वाजवून दाखवा. आम्ही तुम्हाला ७५ रुपये पगार देत जाऊ."

"काही हरकत नाही. पण मी गाव सोडून फार वर्षे झाली, म्हणून गावी जाऊन यावं म्हणतो."

सावकारांनी त्याची माहिति विचारली. सुब्बण्णाने थोडक्यात सर्व सांगितले. तेव्हा सावकार म्हणाले. "येथे आमच्याकडे रहा. जेव्हा वाटेल तेव्हा जाऊन या."

"प्रवासात किती पैसे लागतात तेवढे पैसे जमेपर्यंत तुमच्याकडे राहीन; मग जाईन गावी."

"ठीक आहे."

दुसऱ्या दिवशी सुब्बण्णा जेव्हा फिडल वाजवून दाखवण्यासाठी त्यांच्या घरी गेला तेव्हा त्याच्यापुढे पानसुपारीचे ताट आले. त्यामध्ये दोन पंचे, म्हैसूरचे तिकिट व शंभराची नोट एवढे होते. सावकार म्हणाले, "आज तुम्हाला वादन करावंसं वाटल्यास वाजवा. नाहीतर आजच तुम्ही गावी जाण्यासही आमची हरकत नाही."

"मी अजून वाजवून दाखवण्याचं कामही केलं नाही."

"तुम्ही गीतगोविंदातील एक ओळ वाजवलीत त्याला हजार रुपये जरी दिले तरी ते कमीच आहेत." असे म्हणत सावकारांनी सुब्बण्णाला पैसे घेण्याचा आग्रह केला. सुब्बण्णाने विशेष आढेवेढे न घेता ते पैसे घेतले. ते घेताना त्याच्या मनात मिठाईवाल्या म्हातारीचे बोलणे घुमत होते. तेव्हाच त्याने ठरविले की आपण आपल्या उत्तरक्रियेसाठी पैसे जमवून ठेवलेच पाहिजेत! त्याच दिवशी रात्री सुब्बण्णा म्हैसूरकडे निघाला.

## ८

या साऱ्या वर्णनात मी भरावा तितका रंग भरू शकलो नाही हे मी जाणतो. कारण सुब्बण्णाचे जीवनच विलक्षण होते. मी कितीही कल्पनाशक्ती लढवली तरी त्याच्या साऱ्या जीवनाचे उठावदार वर्णन करू शकेन का?

तीन दिवसांचा प्रवास संपला. म्हैसूर जवळ जवळ आले. मद्दूर, मंड्या, श्रीरंगपट्टण, पश्चिमवाहिनी–काय एकेक नावे! त्याच्या फिडलमधील करुणस्वरांप्रमाणे त्याच्या मनात आज ती गावे दुःखमिश्रित सुखांची आठवण करून देत होती. ज्या दिवशी गाव सोडून निघालो ती अवस्था काय व आज परतत आहे ही स्थिती काय? तेव्हा व आता, ते आणि हे– जीवन एकच की निराळे याबद्दल शंका निर्माण होण्याएवढा बदल झाला आहे. त्याला जणू स्वप्नात म्हैसूरला आल्याप्रमाणे वाटले. कारण गाडीत लोक जे बोलत होते ती पद्धत एका नव्या मुलखाची वाटली. पूर्वी म्हैसूरला रेल्वे नव्हती. आज म्हैसूर ओलांडून गाडी पुढे गेली होती. तेव्हा असलेले युवराज श्रीचामराज वडेयर प्रजाजनांना मुलाप्रमाणे समजून राज्य करीत असत. आज ते नाहीत ही बातमी सुब्बण्णाला कलकत्त्यातच कळली होती. आता त्यांचे थोरले चिरंजीव राज्य करीत होते. एकूण सुब्बण्णाच्या मनाला हे युगच निराळे वाटत होते. एखाद्या हरवलेल्या उत्तम गोष्टीविषयी ज्याप्रमाणे हुरहुरावे तसे त्याचे आज झाले होते. तेवढ्यात झटकन् त्याच्या मनाने सांगितले. 'हे जे तू करीत आहेस ते ठीक नाही. सारे विचार सोडून संन्याशाप्रमाणे रहा!'

म्हैसूर जवळ येताच 'आपले आईवडील जिवंत असतील का? आपण त्यांच्या पाया पडून चुका कबूल कराव्यात. आज्ञाधारक बालकाप्रमाणे त्यांची सेवा करावी' असे विचार त्याच्या मनात आले व साहजिकच त्याचे डोळे पाणावले. असे विचार चालू असतानाच गाडी थांबली. सुब्बण्णा उतरला. फिडल व धोतर बगलेत मारले व तो गावात निघाला.

सुब्बण्णाने जेव्हा म्हैसूरमध्ये पाय ठेवला तेव्हा वैशाख महिना चालू होता. पाचसहा दिवस सतत संध्याकाळी पाऊन येऊन सकाळी आकाश निरभ्र असावायचे. देवाच्या उत्सवासाठी सडासंमार्जन केल्याप्रमाणे सर्व वाटा दिसत होत्या. दक्षिणेचा गार वारा वहात होता. पानांनी डवरलेल्या झाडांवर शेकडो पक्षी कूजन करीत होते. सुंदर प्रभातकाळी बालसूर्य आपल्या सहस्र किरणांनी जणू आनंद लुटा असे सांगत होता. सुब्बण्णाच्याही हृदयात आनंदाची भरतीओहोटी चालू होती. पूर्वी अशाच भल्या पहाटे आपण तळ्यावर जाऊन, स्नानादि कर्मे आटोपून, गार वारा अंगावर झेलत आनंदाने घरी येत होतो. येता येता वाटेत कोणत्या रागात, कोणता आलाप, कोणती तान ठीक बसेल याचा विचार चाललेला असे. एखादा किल्ला सर करण्यास निघालेल्या वीरात जसा उत्साह असतो तसा तेव्हाच्या जीवनात होता. तो आज कुठे आहे?

पूर्वी सुब्बण्णाला जीवन खेळ खेळण्यास आवाहन करीत असे. पण आज तो खेळ संपला होता. पूर्वी कुणीतरी सांगितले असते की, हा खेळ असाच चालावयाचा तर सुब्बण्णाचा विश्वास बसला नसता. असा सारा विचार सुब्बण्णाच्या मनात येताच तो स्वतःशी म्हणाला, 'हे सारे विचार कशाला? यापुढे मला सुख मिळालं काय अन् ना मिळालं म्हणून काय झालं! समजा, गावातील शंभर लोक निघून गेले तर दुसरे शंभर पुन्हा तेथे तयार असतातच. तसा मी गेलो तर माझ्या ठिकाणी आणि कुणी येईलच. हा बालसूर्य जो आनंद

देत आहे व बालसदृश राजा जो अनेक लोकांना आश्रय देत आहे ते तसं पूर्वीही होते व पुढेही राहतील. मला जे सुख मिळालं नाही ते पुढील पिढीला मिळू दे.' असा विचार करीत सुब्बण्णा आईवडील रहात असलेल्या घराकडे आला.

घर जवळ जवळ येताच सुब्बण्णाच्या मनात हलकल्लोळ माजला. सरावाप्रमाणे तो घराच्या कट्ट्यावर येऊन बसला. अजून दार उघडलेले नव्हते. रस्त्यावरही लोकांची रहदारी सुरू झाली नव्हती. थोड्या वेळानंतर दार उघडले गेले. सुब्बण्णाने पाहिले, एक नवीनच चेहरा. फिडल व कपड्याचे बोचके घेऊन बसलेल्या म्हाताऱ्यास पाहून त्या गृहस्थाने विचारले. "कोण आपण?"

"आम्ही परगांवचे!"

ही घटना घडून आठ वर्षे झाल्यानंतर सुब्बण्णा मला म्हणत होता, "पहा, जेव्हा त्यांनी तसं विचारलं तेव्हा सहजरीत्या माझ्या तोंडून आम्ही परगावचे असं उत्तर बाहेर पडलं. त्या घरात मी जन्मलो, वाढलो, पंचवीस वर्षे घालविली व काही वर्षांपुरता मी परगावी निघून गेलो, म्हणून मी काय परगावचा झालो? पण कां कुणास ठाऊक माझ्या तोंडून तसं वदविलं गेलं. अरेव्वा! स्वस्थळ आणि परस्थळ यांच्यांत मी विवेक करावयास नको होता का? माझा गाव म्हैसूर व परस्थळ कलकत्ता असं असूनही म्हैसूरला परस्थळ म्हणजे परमेश्वराकडे जाऊन माझं स्थळ भूलोकच आहे असं सांगितल्यासारखं आहे. त्यामुळे परमेश्वर म्हणेल, 'जा मग पुन्हा भूलोकाला.' अरे, हो मी म्हैसूरला परस्थळ म्हटलं खरं. पण मी माझ्या तोंडानं माझं राहण्याचं ठिकाण 'कलकत्ता' असं म्हटलं नाही. म्हैसूर कलकत्ता ही सारी परस्थळंच. कैलास एकच शाश्वत ठिकाण!"

त्या दिवशी जेव्हा सुब्बण्णाने ही स्थिती अनुभवली तेव्हा ती पाहणाऱ्याच्या डोळ्यांत पाणी आले असते. दार उघडलेल्या गृहस्थाने दार बंद करू घेतले. त्यामुळे या घरी कोणीतरी नवीन आलेले दिसते असे समजून सुब्बण्णा कुलूप असलेल्या एका घराच्या कट्ट्यावर जाऊन बसला. थोड्या वेळानंतर पुन्हा घराकडे जाऊन त्याने चौकशी केली.

"येथे पुराणिक शास्त्री रहात होते त्यांचा ठावठिकाणा तुम्हाला माहीत आहे का?"

"शास्त्री? ते देवाघरी जाऊन तीन वर्षे झाली. "

"मग त्यांच्या घरचं कोण आहे आता?"

"नाही, कोणीही नाही."

"त्यांची बायको?"

"त्यांनाही देवाज्ञा झाली."

"त्यांच्या मुली येथेच कोठे रहात होत्या ना?"

“त्यांतली एकटी तरी गेली. दुसरी कोणच्या तरी गावी आपल्या मुलाजवळ असते. मग आम्ही हे घर विकत घेतलं.”

आईवडील असतील का? बहिणीचे काय झाले असेल? अशा साशंक मनाने आलेल्या सुब्बण्णाच्या कानी जे जे पडले ते सारे एकाहून एक वज्रप्रहारासारखे होते. त्यामुळे सुब्बण्णा काहीही बोलले नाहीत. ते तळ्याकडे निघाले. हो आता मात्र म्हैसूर खऱ्या अर्थी परस्थळ झाले. जेथे आपण जन्मलो तेथे आपला असा काय हक्क असतो? जेथे चार लोकांच्या सहवासाने त्यांच्या मनांत आपले खरे नाव स्थिरावू शकते तेच आपले खरे गांव. ओळखणारेच नसल्यावर जन्मलेले गाव तरी आपले असले तरी ते परस्थळच. सुब्बण्णांनी तळ्यावर स्नान केले. आईवडिलांच्या नावाने तर्पण केले व ते म्हणाले, “मी तुमचा मुलगा तुमची शुश्रूषा व उत्तरक्रिया या तर्पणाद्वारे करीत आहे!”

नंतर सुब्बण्णा आपण तोरेयपुरास जावे व नंजनगुड्डास जावे याचा विचार करू लागले. नंजनगुड्ड तोरेयपुराहून जरा दाट वस्तीचे गाव. त्यामुळे तोरेयपुरातील वास्तव्य ‘नारायणा, गोविंदा’ म्हणत पुढील जीवन कंठण्यास ठीक आहे. नाहीतरी आता आपले असे काय व्हावयाचे राहिले आहे? ह्या विचाराने सुब्बण्णा तोरेयपुराकडे निघाले.

# ९

सुब्बण्णा तोरेयपुरमध्ये तेरा वर्षे राहिले. उतारवयात त्यांच्या मनातील सारी अशांती नाहीशी झाली. एका अर्थी ते तत्त्वज्ञानी बनले होते म्हटले तरी चालेल. कुणालाही एका शब्दाने न दुखवता, कुणाकडूनही दुखवून न घेता, जीवनात अमुक एक दोष आहे, अमुक एक व्यथा आहे असे न मानता, शांत स्वभावाने सदाकाळ देवध्यानात राहणारे तत्त्वज्ञानी नव्हेत तर कोण? पण त्यांचा पेहराव तत्त्वज्ञान्याचा नव्हता. शेवटपर्यंत ते फिडल वाजवीतच होते. काही लोकांना शिकवत होते. कोणाच्याही घरी झोपावयास जात नव्हते. कुठल्याही सोप्यावर अगर देवळाच्या आवारात झोपत असत. कट्ट्यावर झोपले असताना यदाकदाचित् पाऊस आलाच तर जवळच्याच एखाद्या छप्पर असलेल्या घराच्या कट्ट्यावर झोपत असत. अशी तेरा वर्षे गेली. जसजसे दिवस चालले तसतसा सुब्बण्णांच्याविषयी लोकांत प्रेम, आदर, गौरव निर्माण झाला. त्याचे कारण एवढेच होते की सुब्बण्णा आपल्या हातून होईल तेवढे सहाय्य इतरांना करीत होते. पण सुब्बण्णांना काय हवे होते? आपल्या मनाच्या तृप्तीसाठी काहीतरी करावयाचे एवढेच! हीच भावना तोरेयपुराच्या लोकांची सुब्बण्णाविषयी होती. असेच योग्याप्रमाणे जीवन व्यतीत करून सुब्बण्णा स्वर्गवासी झाले. ते तोरेयपुरात कसे राहात होते हे आणखी जरा विस्ताराने सांगितले म्हणजे ही कथा संपली.

दुपारी सुब्बण्णा तोरेयपुरात पोहोचले. तोरेयपूर हे नदीच्या काटावर बसलेले एक तालुक्याचे ठिकाण. मोठी देवालये, भरपूर ब्राह्मणवस्ती, अन्नछत्रे असलेले ते गाव होते. तपस्वी लोकांना ते सोयिस्कर होते. त्या दिवशी रात्री सुब्बण्णा देवळात झोपी गेले. लहान मूल झोपेतून जसे दचकून उठते त्याप्रमाणे ‘मी दिशाहीन झालो’ या भावनेने पाचसहा वेळा ते दचकून उठले होते. अशा परिस्थितीत चार दिवस गेले. आसरा नसलेल्यांना देवच त्राता. ‘आपलं आता काय व्हावयाचं राहिलं आहे? मी कां घाबरावं? नारायण, नारायण, म्हणत काळ कंठला की झालं. माझी स्थिती इतरांच्याप्रमाणे नाही म्हणून दुःखी व्हवयाचं. इतरांच्याप्रमाणे एकदा होतो ना? बायका-मुलं मला होती ना? इतर लोक अजून त्याच स्थितीत आहेत. माझी मात्र स्थिती अशी बदलली. आता माझं जीवन मला, त्यांचं जीवन त्यांना. अशीच देवाची इच्छा होती म्हणावयाचं. उगीच कशाला विचार करावयाचं?’

दुसऱ्या दिवशी जेव्हा सुब्बण्णा जागे झाले तेव्हा कोणत्या तरी व्यथेने ते बैचेन झाले. नदीवर जाऊन आंघोळ करून प्रातःकर्मे आटोपून हात जोडून बसले.

गावचे लोक ह्या म्हाताऱ्याकडे पहात होते. चेहरा उतरलेला, वय झालेले, फिडल व कपडे घेऊन आलेला हा माणूस कोण असावा, ह्या विचाराने सारे बघत होते. पण त्याकडे सुब्बण्णांचे लक्ष नव्हते. थोड्याच वेळात सुब्बण्णांच्याजवळ एक मुलगा आला. तो त्या गावातील एका वेश्येचा मुलगा होता. त्याला थोडे थोडे संगीत येत होते. फिडलही थोडेफार वाजवावयास येत होते. त्यामुळे तो सुब्बण्णांच्याकडे आकर्षिला गेला व त्याने विचारले, “बाबा, कोणत्या गावचे तुम्ही?” सुब्बण्णांनी उत्तरच दिले नाही. कारण कुणाशी बोलणेही त्यांना नको होते. थोड्याच वेळात पुन्हा त्या मुलाने विचारले, “काय बाबा, तुमचं गाव कोणतं?”

“कोणतं गाव अन् काय! —”

हे उत्तर ऐकूनसुद्धा मुलगा निघून गेला नाही. तेथेच बसून फिडलला हात लावून त्याने विचारले, “छान आहे फिडल. जरा वाजवून बघू का?”

सुब्बण्णांनी उत्तरच दिले नाही. मग मुगला म्हणाला, “बाबा, हे फिडल मला द्याल? मी तुम्हला पंधरा रुपये देईन” हा सुकल्या चेहऱ्याचा म्हातारा फिडल काय वाजवेल? त्याने ते कोठूनतरी चोरून आणले असेल. थोड्या किंमतीती मिळवावे, या भावनेने त्या मुलाने त्याची किंमत केली. सुब्बण्णांचे उत्तरच नाही.

“काय हो! देणार ना फिडल?”

“देणार नाही, वाजवणार नाही! जसा आलास तसा जा!” सुब्बण्णांना फारच वैताग आला होता.

“हे काय बोलणं तुमचं? आपण तरी वाजवावं नाही तर वाजवणाऱ्यांना द्यावं. ज्यांना वाजवावयाला येत नाही त्यांनी वाद्य जवळ बालगण्यात काय अर्थ आहे?” असे म्हणून त्या मुलाने फिडल घेऊन भैरवी वाजवण्यास आरंभ केला. सुब्बण्णात कलावंताचा आवेश आला. त्यामुळे त्या मुलाचे वाजवणे संपताच त्यांनी फिडल घेतले व त्यांनीच भैरवीच वाजवली.

सुब्बण्णांच्या ह्या वाजवण्यात हिंदुस्थानी गायकीची एक छटा होती. त्यामुळे त्या रागाला विलक्षण शोभा आली होती. मुलाने एक क्षणभरच ती भैरवी ऐकली व लगेच तो म्हणाला, “वा! काय वाजवताय! अगदी कसलेले दिसता ह्याच्यात! वाजवा, वाजवा!” व सुब्बण्णांकडे टक लावून तो बघत राहिला. एवढ्यात आणखी लोक जमा झाले. हे पाहताच सुब्बण्णांनी लवकरात लवकर राग संपविला आणि फिडल व कपडे घेऊन ते तेथून निघून गेले.

सुब्बण्णांना स्वतःविषयी एक प्रकारचे असमाधान वाटले. सारे सोडले तरी संगीताचा अहंकार अजून सुटला नव्हता. एका मुलाने उगीच मजेखातर म्हटलेल्या एका वाक्याने उद्विग्न होऊन आपले पांडित्यप्रदर्शन करण्यास आपण सुरुवात केली, हे थोडे अविवेकीपणाचे झाले, असे त्यांना वाटले. ‘पूर्वायुष्यातील सारं काही गेले – बायको गेली, मुले गेली, बहीण-आई-वडील गेले, तरी या फिडलवरच माझं का बरं एवढं प्रेम गेलेल्या साऱ्या गोष्टींबरोबर हेही जाऊ दे. हे असल्यामुळेच वाजवण्याचा अहंकार माझ्यात उद्‌भवला ना? हेही जाऊं दे. त्याबरोबर संगीताचं व्यसनही जाऊ दे.’ असे ठरवून जरा अंतरावर असलेल्या घाटावर ते गेले. तेथे फार लोक नव्हते. तेथे गेल्यावर तेथे अगोदरच असलेले एकदोघे निघून जाईतोपर्यंत त्यांनी वाट पाहिली. सर्व जण निघून गेल्यावर ते फिडल एका मोठ्या दगडावर आपटण्यासाठी उचलले. पण तसे करण्यास मन धजावले नाही. ते खाली बसले. दोन मिनिटे गेल्यावर सुब्बण्णा पाण्यात उतरून म्हणाले, ‘देवा, सारं काही सोडलं. हे फिडल तरी कशाला? हे सुद्धा सोडतो. मला शांती दे!’ असे म्हणून ते फिडल त्यांनी पाण्यात सोडले! येथे त्याचा ऋणानुबंध संपला. पण घाट चढून येताच त्यांना दुःख अनावर झाले व ते ढसाढसा रडू लागले. नंतर एकदा ही घटना सुब्बण्णांनीच अशी सांगितलेली आठवते की, “माझी बायको गेली, मुलं गेली तरी मी एवढा रडलो नाही. पण फिडल पाण्यात फेकताच माझे प्राण कासावीस झाले.”

फिडलच्या मोहातून मुक्त झालेले सुब्बण्णा नंतर गावात गेले. त्यांनी काही फळे विकत घेतली व देवळात जाऊन देवापुढे ठेवली, नमस्कार केला व तीच फळे नंतर त्यांनी खाल्ली. 'फिडल गेले, आता फक्त हा देह राहिला' असे जरी ते तोंडाने म्हणत होते तरी त्या दिवशी रात्रभर त्यांच्या मनात फिडल पुन्हा पुन्हा येत होते व जाग येताच ते मनास म्हणावयाचे, 'काय वेडा आहेस तू! फिडल जवळ असते तर एखादे देवाचे भजन तरी, एखादा राग तरी वाजवता आला असता. आता संगीतसेवासुद्धा अर्पण करू शकत नाही. जेव्हा बंगालला नवीनच गेलो होतो तेव्हा ते फिडल मी विकत घेतले. अनेक सभांमधून वाजवले. त्याने इतके दिवस जीवनाची साथ केली.'

फिडलविषयी सुब्बण्णांना इतकी ममता वाटत होती यात काही आश्चर्य नाही. दुसऱ्या दिवशी उठण्यास सुब्बण्णांना जरा उशीर लागला. उठून पाहतात तर काय, त्यांनी पाण्यात सोडलेले फिडल त्यांच्या शेजारीच होते!

आपण काही स्वप्न पहात आहोत की काय असे वाटून सुब्बण्णांनी पुन्हा पुन्हा डोळे चोळून पाहिले. पण ते त्यांचेच फिडल होते. हा काय चमत्कार आहे, असे सुब्बण्णांना वाटले. त्याबरोबरच त्यांना फिडल परत मिळाल्याबद्दल आनंदही झाला. म्हणून त्यांनी अत्यंत आदराने तो फिडल उचलून घेतले. हे सारे पहात लपून उभा राहिलेला तो कालचा मुलगा समोर येऊन सुब्बण्णांना नमस्कार करून म्हणाला, "तुम्ही माझे गुरु आहात. काल मी तुम्हाला तसं बोलावयास नको होतं. माझी चूक झाली. अशी भली मोठी विद्या तुमच्याजवळ आहे हे मला कळलं नाही. माझ्याकडून अपराध घडला. क्षमा करा, गुरुदेव."

"असं काय म्हणतोस! तू मला तसं काही वावगं बोलला नाहीस."

"गुरुदेव, तुमच्याबरोबर दुसरं कोणी दिसत नाही. आपण परवानगी दिलीत तर मी राहीन तुमच्याबरोबर."

"छे, मला कोणाची चाकरीसेवा नको, मीच गुलाम, मला कशाला चाकर?"

त्या मुलानेच ते फिडल नदीतून आणले असावे व आपल्याजवळ ठेवले असावे हे सुब्बण्णांना समजले त्यामुळे त्यांना त्या मुलाचा उपकारच वाटला, म्हणून ते त्याच्याशी पूर्वीप्रमाणे तोडून बोलले नाहीत. त्यांचे मन आता मऊ बनले होते. सुब्बण्णा गप्प बसले होते, तो मुलगाही त्यांच्याजवळ गप्पच बसला होता. त्या मुलाला 'जा' असे सांगण्याचे धारष्ट्य त्यांना झाले नाही. थोड्या वेळाने तो मुलगाच म्हणाला. "गुरुदेव, माझं नाव वेंकटरमण. आम्ही जातीने नट. तुम्हाला जेव्हा माझी जरूर लागेल तेव्हा मी येईन. तुम्हाला काही लागलं तर आमच्या घरी या, अगर कुणाकडून सांगून पाठवलं तरी ते मी आणीन." असे सांगून तो निघाला. एकदा त्याला 'रहा' म्हणावे असे सुब्बण्णांना वाटावयाचे व एकदा 'कशाला उगीच? तो कोण कुणास ठाऊक? पुन्हा कशाला बंधात सापडावयाचं?' या विचाराने सुब्बण्णा काहीच न बोलता गप्प राहिले.

दुपारी वेंकटरमण पुन्हा आला. सुब्बण्णा स्नान आटोपून बसले होते. तेव्हा त्यांच्या मनात असा विचार आला की 'काय आपला हा जन्म? दुसऱ्यांच्या जीवनात उपयोगी पडणं राहू दे, कमीत कमा

ऋणमुक्त तरी व्हावयास नको का? ह्या मुलानं मला फिड्ल् आणून दिलं तर त्याचा मोबदला म्हणून त्याला चार धडे शिकवून मी ऋणमुक्त व्हावं.'

वेंकटरमण सुब्बण्णाला नमस्कार करून उभा होता, तेव्हा सुब्बण्णांनी त्याला बसण्यास सांगितले. नीलाच्या आठवणीमुळेही त्यांना त्या मुलाबद्दल जरा ओढ वाटत होती. सुब्बण्णा आपणहूनच त्या मुलाला म्हणाले, “तू फिडल चांगलं वाजवतोस.”

“आपला आशीर्वाद. चारदोन स्वर शिकलोय तेवढंच माझं भांडवल. तुमच्यापुढे माझी कसली विद्या! तुमच्यासारखे वाजवणारे इथे कोणी नाहीत.”

“हे पहा, तुला जेव्हा जेव्हा फिड्ल् वाजवावं असं वाटेल तेव्हा तेव्हा येथे येऊन वाजव, मी ऐकेन.”

“जशी आज्ञा. तुम्ही थोडे जर मला शिकवलं तर मी तुमच्या कृपेनं येथील सर्व लोकांवर मात करीन.”

त्या मुलाचे ते बोलणे त्यांना ढगाच्या गडगडाटाप्रमाणे वाटले. ते ऐकून सुब्बण्णांना आपले बाळपण आठवले. पण ते बोलले नाहीत. वेंकटरमण म्हणाला, “जेवणाची तयारी झाली आहे. चलावं आपण. तुम्ही स्मार्त म्हणून स्मार्तांच्याच घरात तुमच्या जेवणाची सोय केली आहे. ते लोक फार आचारसंपन्न आहेत. त्यांचं नाव दीक्षित.”

सुब्बण्णा मनाशी म्हणाले, ‘हे ऋण वाढतच चाललं’ व ते त्या मुलाला म्हणाले, “बाबारे, हे सारं मला करायला लावू नकोस. तुला जेव्हा पाहिजे तेव्हा फिड्ल् आण. अर्धापाऊण तास वाजव. मी ऐकतो. याहून जास्त तुझ्याकडून मला काही नको.” सुब्बण्णांच्या ह्या बोलण्यावरून सुब्बण्णांचे मन अजून पूर्ण शांत झालेले नाही हे समजून तो मुलगा नमस्कार करून निघून गेला.

आदले दिवशी वेंकटरमण ज्या रीतीने वागला त्यामुळे त्याने सुब्बण्णांना प्रापंचिक बंधनात पुन्हा बांधले असेच म्हणावे लागेल. जेव्हा सुब्बण्णा रागावून निघून गेले तेव्हा त्यांच्या मागोमाग वेंकटरमणही गेला होता. सुब्बण्णा फिड्ल् फोडावयास गेलेले, त्यांनी पाण्यामध्ये फिड्ल् सोडून दिलेले व नंतर पायऱ्यावर बसून ओक्साबोक्सी रडलेले सारे काही वेंकटरमणने पाहिले होते. त्याच्या बालमनाला वाटले होते, ‘किती छान फिड्ल्! जाणकार माणसाला असलं फिड्ल् सोडून देणं कधीतरी जमेल का? माझ्या वागण्यानं यांना इतका वैताग आला? त्यांचं समाधान होईल असं काहीतरी आपल्याला केलंच पाहिजे,’ असे म्हणू वेंकटरमण पाण्यात उडी घेऊन फिड्ल् घेऊन आला. सबंध दिवसभर ते फिड्ल् सुब्बण्णांना देण्याची संधी वेंकटरमण बघत होता, पण जमले नव्हते. दुसऱ्या दिवशी सुब्बण्णा उठावयाच्या आत ते फिड्ल् त्यांच्या जवळ ठेवून त्याने मनात असा निश्चय केला की जर फिड्ल् पाहून सुब्बण्णांना समाधान वाटले तर त्यांच्याशी काही बोलावयाचे, नाहीतर सरळ निघून जावयाचे! त्याने तसेच केले. नंतर जे जे घडले ते सर्व सांगितले आहेच. काही असो, ह्या साऱ्या घटनेमुळे सुब्बण्णांच्या मनात वेंकटरमणाला फिड्ल् वाजवावयास शिकवावे असे आले. भूदेवी ही विष्णुपत्नी, ती आम्हा साऱ्यांची माता आहे. मुलांच्याप्रमाणे हट्ट करून आम्ही तिच्यापासून जितके दूर जाऊ इच्छितो तितके ती आम्हाला जवळ घेऊन समाधान करते. सुब्बण्णा व तोरेयपूर यांमध्ये जो एक संबंध घडून आला तो वाढतच गेला. सुब्बण्णा कोणाकडूनही

सहाय्याची अपेक्षा न करता आपल्यापुरते कोठेही कसाही काळ कंठीत होते, तरीही ते सर्वांना हवेहवेसे वाटत होते. त्यांच्याकडून अनेकांनी फिड्ल् शिकून घेतले. पाण्यात फेकलेले फिड्ल् देवाने परत मिळवून दिले याचाच अर्थ असा की देवाला सुब्बण्णांचे फिड्ल् ऐकावयाचे होते. जीवनात सुख येवा, दुःख येवा, सारे जीवनच देवाची सेवा आहे अशी सुब्बण्णांची भावना होती. ही भावना दिवसागणिक दृढ होत जाऊन दैवी संकेताप्रमाणे भक्तीही त्यांच्यात स्थिरावू लागली.

माझे सासरे १९१० मध्ये तोरेयपूरचे सुभेदार होते. त्या वेळी ते अजून माझे सासरे झालेले नव्हते. त्यांना दोन मुली होत्या. थोरली ललिता पुढे माझी पत्नी झाली. माझे सासरे विक्षिप्तच म्हणा ना. त्यांच्याच विषयी लिहिले तर एक कथाच होईल. त्यांना संगीताची आवड होती. थोडेफार फिड्ल्ही ते वाजवत. त्यांना जर कुणी म्हटले की “वा! काय छान फिड्ल् वाजवता” तर ते म्हणावयाचे, “आमचं कसलं वाजवणं! त्या ऐवजी ‘जर’ तुम्हाला फिड्ल् फारसे चांगले वाजवता येत नाही. तुम्ही कोणाकडे तरी शिका.” असे कुणी सूचित केले तर ते म्हणत, “बरं बरं, तुम्हाला काय कळतं संगीतात? मी जसं वाजवत आहे तसं मोठमोठ्या पंडितानाही जमत नाही.” थोडक्यात म्हणजे कोणी काही बोलले की त्याला त्यांचे उलट उत्तर असावयाचेच. त्यात भांडण काढावयाचा उद्देश असे असे नव्हे. त्यांच्या मनाची ठेवणच तशी होती. सतत अधिकार गाजविण्याची ज्यांना सवय असते त्यांची वागायची तऱ्हाच अशी.

तोरेयपूरमध्ये आमचे सासरे एकदा कचेरीला जात असताना त्यांना रस्त्यात कोणाच्या तरी घरात फिड्ल् वाजत असलेले ऐकू आले. ‘फिड्ल् वाजवणारा कोण?’ अशी त्यांनी चौकशी केली. वाजवणारा वेंकटरमण हे कळल्यावर लगेच त्यांनी त्या दिवशी संध्याकाळी वेंकटरमणास घरी बोलावून घेतले. एक तासभर त्याचे फिड्ल्वादन ऐकून खूष होऊन ते म्हणाले, “वा! चांगला रियाज झाला आहे.” पण शेजारी बसलेला एकजण म्हणाला, “ह्याचं फिड्ल् वाजवणं काय ऐकता! सुब्बण्णांचं वाजवणं एकदा ऐका.”

“सुब्बण्णा कोण?”

“सुब्बण्णा माझे गुरू” वेंकटरमणाने उत्तर दिले.

“ते सध्या येथे आहेत?”

“आहेत.”

“मग त्यांना यावयास सांगा, त्यांचंही ऐकूया.”

“तसे ते यायचे नाहीत” असे म्हणून तेथे जमलेल्या इतरांनी सुब्बण्णांचा स्वभाव माझ्या सासऱ्यांना समजावून सांगितला.

कोणीतरी आपण बोलावूनही येत नाही असे कळले तर त्यांना पुनश्च बोलावण्याचा आमच्या सासऱ्यांचा स्वभाव नव्हता. या गोष्टीस तुम्ही अहंकार म्हणाल, पण मी मात्र तसे म्हणत नाही. मोठ्या लोकांची प्रौढी असे फार तर म्हणा. सुब्बण्णांनीच जर कबूल केले तर त्यांना ललितेस फिड्ल् शिकवण्यास सांगावे असा त्यांचा विचार होता. पण सुब्बण्णा येतच नाहीत म्हटल्यावर ते जमणारा कसे, म्हणून ते गप्प बसले.

आणखी एकदा आमचे सासरे कचेरीला चालले असताना सुब्बण्णा त्यांच्या दृष्टीस पडले. ते एका कट्ट्यावर बसून काही मुलांना फिड्ल् वाजविण्यास शिकवत होते. वाजवता वाजवता त्या रागाच्या आलापनात ते तल्लीन झाले. असे ते अगदी तन्मय होऊन वाजवत असताना माझ्या सासऱ्यांच्या कानावर ते पडले. त्यांच्या रसाळ वाजवण्यावर आमचे सासरे भाळले. ते कचेरीला गेली तरी फिडलच्या सुरांच्या तन्द्रीतच ते होते. त्यामुळे त्या दिवसाचे काम लवकर आटोपून ते घरी आले. घरी येताच कारकुनास बोलावून सांगितले, "आताच जा व सुब्बण्णांना कसंही करून घेऊन या."

कारकून सुब्बण्णांच्याकडे गेला व म्हणाला, "महाराज, आपल्याशी काही बोलावयाचं आहे."

"बोला, काय काम आहे?"

"आमच्या साहेबांनी तुम्हाला बोलावलं आहे. ते फार चांगले रसिक आहेत. तुम्ही अर्धा तास फिड्ल् वाजवून दाखवावं अशी त्यांची इच्छा आहे."

सुब्बण्णा काहीच बोलले नाहीत. कारण त्यांना काही नको होते. सर्वस्वाचा त्याग करणारा मी ह्या शिकवण्या करण्याच्या जाळ्यात अडकलो. आता थोरामोठ्यांच्या घरी फिड्ल् वाजवण्यास जाणे म्हणजे याहून एक मोठे जाळेच. ते सारे आपल्याला नको, असा सुब्बण्णांचा विचार असल्यामुळे ते काही बोलले नाहीत. कारकुनाने फारच आग्रह धरला. तेव्हा सुब्बण्णा म्हणाले, "हे पहा, मी थोरामोठ्यांच्या घरी येत नाही. जा, सांगा तुमच्या साहेबांना की मी येऊ शकत नाही. क्षमा करा." कारकून बिचारा परतला व त्याने सुब्बण्णांचा निरोप कळविला.

आमच्या सासऱ्यांचा राग मस्तकी चढला. "मी सांगून पाठवूनही हा गवई येत नाही? हा कसला अहंकार?"

रंगभूमीवर चाकराची भूमिका करणारा नट राजाची भूमिका करणाऱ्या नटापुढे अगदी नमून असतो परंतु रस्त्यावर जेव्हा त्यांची भेट होते तेव्हा तो तसा नमून वागेल का? अगर त्याने नमून वागावे अशी अपेक्षा धरणे योग्य होईल का? नाटकात राजा झालेला काही वेळा जीवनातही त्याच गुंगीत राहतो आणि चाकराची भूमिका करणारा रंगभूमीवरून बाहेर पडताच आपल्या जीवनाशी पुनः समरस होतो. अशा वेळी मात्र अडचण येते. आताही तसेच झाले. आमचे सासरे संसारास चिकटलेले. उलट सुब्बण्णा विरक्त झालेले. आमच्या सासऱ्यांच्या अपेक्षेनुसार सुब्बण्णांनी त्यांना मान दिला नाही, त्यामुळे सासऱ्यांना राग येणे साहजिक होते. सासऱ्यांच्या ठिकाणी आम्ही कोणी असतो तरीही तसेच झाले असते. 'येत नाही ना? नको येऊ दे!' असे आमच्या सासऱ्यांनी फारच रागाने उद्‌गार काढले व ते गप्प झाले.

ही घटना घडून गेल्यानंतर काही दिवसांनी कारकून आमच्या सासऱ्यांच्या जवळ आला व म्हणाला, "आज संध्याकाळी देवळात फार गर्दी होणार, कारण सुब्बण्णा फिड्ल् वाजवणार आहेत. सणावारी वाजवण्याचा त्यांचा नेम आहे म्हणे. साहेब, आपणही आज ऐकणार का?"

सासऱ्यांच्या मनात पहिला विचार असा आला की, 'जो माणूस आपल्या बोलवण्याचा अव्हेर करतो त्याचं फिड्ल् ऐकण्यास आपण देवळापर्यंत जावयाचं?' पण त्याच वेळी दुसरा विचार असा आला की

'सुब्बण्णा तेथे फिड्ल् वाजवत आहेत म्हणून आपण देवदर्शनालाही जावयाचं नाही हा कुठला न्याय? दर्शनाला गेल्यावर संगीत ऐकावयाचं. माझा गर्व आड येत आहे; दुसरं काही कारण नाही.' अशा ह्या विचाराने सासरे संध्याकाळी देवदर्शनास गेले.

सुब्बण्णा काही लोकांच्या घोळक्यात बसले होते. 'संगीत सेवामवधारय' असे म्हणताच सुब्बण्णा फिड्ल् घेऊन पुढे आले. त्यांचेबरोबर वेंकटरमण होताच.

सुब्बण्णांच्या फिड्लमध्ये जे गाणे उतरत होते त्याचे वर्णन करणे शक्य नाही हे मी पूर्वी सांगितलेच आहे. दिवसेंदिवस त्यांच्या वादनातील माधुर्य वाढतच होते. त्या दिवशी त्यानी भैरवी राग वाजवला. त्यावेळी देवळात असलेल्या सर्व श्रोत्यांना साक्षात् देवदर्शनाचा आनंद झाला. पूजा संपली, लोक निघाले, पण आमच्या सासऱ्यांनी एक काम केले. ते हळूच सुब्बण्णांच्याजवळ सरकले व म्हणाले, "महाराज, तुमच्यासारख्या संगीतज्ज्ञांना आम्ही आमच्याकडे बोलावलं ही चूक झाली. एखाद्या योगसाधनेप्रमाणे तुम्ही संगीताची जोपासना केली आहे."

"पुरे पुरे, अशी बोलणी ऐकली की आमची बुद्धी बिघडून जाते. आम्ही सामान्य माणसं. थोरामोठ्यांच्याकडे आम्ही कसं येणार?"

"तुम्ही आलात तर आम्हाला आनंदच आहे. आमच्या मुलीला संगीत शिकवलंत तर आम्हाला बरं वाटेल. आम्ही तुमचेच. आम्हाला परके समजू नका." असे सांगून आमचे सासरे निघाले.

खरे पाहिले तर आमचे सासरे चारचौघांत असे मनमोकळेपणाने बोलणारे नव्हते. आपल्या वडिलांचा थोरामोठ्यांचा गुण त्यांच्यात उतरला होता. त्यामुळे ते फक्त मोठ्यांना ओळखत व त्यांचाच गौरव करीत. पण सुब्बण्णांच्या गाण्यावर ते लुब्ध झाले होते. कठीण रागदारी सुबण्णा अत्यंत सुगम करून दाखवत असत. विद्येने जो सुसंस्कृत असतो त्याच्या अंगी नम्रपणा असतोच. सुब्बण्णांच्या अंगी असलेला नम्रपणाच त्यांच्या वादनात प्रकट होत होता असे म्हटले तरी चालेल.

परस्परांच्या नम्र वागणुकीमुळे सुब्बण्णा दुसरे दिवशी घरी आले व ललितेला संगीताचे पाठ देऊ लागले. नंतर एकदा सहज बोलत असताना सुब्बण्णा म्हणाले, "सुभेदार म्हणजे कसे काय असतात याची कल्पना नसल्यानं प्रथम बोलावणं आलं त्या वेळी मी येण्यास तयार झालो नाही. पण त्या दिवशीच्या देवळातील त्यांच्या बोलण्यावरून सुभेदारांची रीत मला कळली. शुद्ध बावनकशी सोनं. त्यांच्यात थोडा अहंकार आहेच. अहो, सुभेदार म्हटल्यावर अहंकार हा असायचाच. त्याशिवाय काय कामं होतात?" संगीताचे धडे देण्याच्या निमित्ताने त्यांचे येणेजाणे नियमित झाले व घरोबा वाढला.

माझ्या मोठ्या बहिणीला—अक्काला सुब्बण्णांच्या विषयी फार सहानुभूती वाटत असे. तिचा स्वभावच तसा होता. तिला सर्वांविषयीच अनुकंपा वाटत असे. दुसऱ्यांचे कष्ट तिला पाहवत नसत. नवऱ्याविषयी फार प्रेम व भक्ती होती. मुलांविषयी फारच ममता होती. घरी येणाऱ्या-जाणाऱ्यांच्याविषयीही तिला फार आस्था. घरातील लहानथोरांशी, नोकरचाकरांशी वागण्याची अक्काची पद्धत पाहून सुब्बण्णांनाही तिच्याविषयी आदर निर्माण झाला. एके दिवशी ते मला म्हणाले, "काय ही बाई आहे! मी उभ्या जन्मात अशा एकाच स्त्रीला पाहिलं होतं. आता ही दुसरी."

“कोण ती पहिली?”

“तिनं माझ्याशी एके काळी संसार केला होता!”

हे वाक्य उच्चारताना सुब्बण्णांनी आपले तोंड फिरवले. आमच्या अक्काच्या घरी येण्याने सुब्बण्णांच्या मनाला जरा बरे वाटत असे. ललिता संगीतात आपली हुषारी दाखवत होती. त्यामुळे तिला शिकवण्यात सुब्बण्णांना आनंद वाटत असे. या रीतीने सुब्बण्णांच्या जीवनात, त्यांना नको होते तरी, सुखाचे धागे शिरू लागले. या पाशात अडकू नये असा प्रयत्न सुब्बण्णा करीत होते.

पण काही झाले तीर सुब्बण्णा आमच्या सासऱ्यांच्या घरी जेवण करीत नसत. कधीतरी आम्ही जेवणाचा आग्रह केला तर ते आमचा डोळा चुकवून तेथून निसटत. दोन महिने पुरे झाल्यावर आमचे सासरे संगीत शिकवण्याचा मोबदला म्हणून त्यांना पैसे देण्यास गेले. सुब्बण्णांनी ते नाकारले.

“तुम्हाला जर पगार घ्यावयाचा नसेल तर तुमची शिकवणा नको!”

“मला जर पैसे लागले तर तुम्ही द्यावेत. मी पैसे मागत नाही तर देण्याचा प्रश्नच येत नाही. मला पैसे नकोत.”

“पैसे देण्यास नकोत म्हणून पैशाची गरज नसलेल्या एका म्हाताऱ्याला शिकवणीस ठेवले अशी लोक आम्हाला नावं ठेवतील म्हणून हे पैसे घ्या.”

सुब्बण्णांनी पैसै घेतले नाहीत. ते निघून गेले. दुसरे दिवशी शिकवणीस आले नाहीत. आमच्या सासऱ्यांनी विचारपूस केली. ललितेने सांगितले, “तुम्ही सुब्बण्णांना शिकवणीस येऊ नका असं सांगितलंत म्हणे!”

“हो. जर त्यांना शिकवणीचे पैसे घ्यावयाचे नसतील तर ते यायला नकोत.”

तीन-चार दिवस गेले. नंतर एके दिवशी सुब्बण्णा ललितेस संगीत शिकवत बसलेले दिसले. आमच्या सासऱ्यांनी लगेच पैसे पुढे केले. सुब्बण्णांनी ते घेतले. “आता ठीक झालं! आम्हालाही आनंद झाला व तुम्हालाही बरं.” सासरे म्हणाले.

“मला यत्किंचितही यात आनंद नाही. पण काय करावयाचं? काही झालं तरी तुम्ही मॅजिस्ट्रेट! तुम्हाला पाहिलं म्हणजे आम्हाला भीती वाटते!”

आमचे सासरे हसले. आमच्या सासूबाई तिथे आल्या तेव्हा त्यांना उद्देशून सुब्बण्णा म्हणाले, “काय हो, मी म्हणतो बरोबर आहे ना? मॅजिस्ट्रेटना पाहिल्यावर आमच्यासारख्यांनी भ्यायलं पाहिजे.”

“अशा गोष्टीत काय घाबरवायचं? जे न्याय देतील ते मॅजिस्ट्रेट. अन्याय केला तर अपीलच नाही. त्यांनी पैसे देणं योग्य आणि तुम्ही ते घेणंही योग्य.”

सुब्बण्णा स्वतःशीच हसले. थोड्या वेळाने ते म्हणाले “काय, महाराज अपील करू का?”

“इतर कोणत्याही विषयात चालेल, पण ह्या विषयात अपील चालणार नाही.”

“ठीक आहे!” असे तोंडातल्या तोंडात म्हणत सुब्बण्णा हसले.

जे घडले होते ते असे. आदले दिवशी आमच्य सासूबाई सुब्बण्णांना भेटून म्हणाल्या होत्या, “त्यांचाही हट्ट, तुमचाही हट्ट. अशा दोघांच्या हट्टात त्या मुलीचं शिकणं थांबलं. ते वयानं लहान, तुम्ही मोठे. त्यांचा हट्ट पुरवा व घरी या. मुलीचं शिकणं पुढं चालू दे.”

“ठीक आहे. येतो, पण पैसे घेऊन करू काय? तुमच्या यजमानांना सांगितलं तर ते ऐकेनात.”

“मुलीला संगीत शिकवावं असं तुम्हाला वाटत नाही का?”

“अगदी खरं सांगावयाचं म्हणजे तीनच दिवस मी शिकवणीस आलो नाही तर मला फार चुकल्याचुकल्यासारखं झालं. पण मी काय करू? मला खरेच पैसे नको आहेत. पैसे घेतले की माझं चित्त थाऱ्यावर राहात नाही.”

“मी तुम्हाला यावर उपाय सांगू का? तुम्ही पैसै घ्या आणि कुणाला तरी देऊन टाका!”

“आईसाहेब, एक काम करा. ते जे पैसे देतील ते मी तुमच्या हाती देतो व तुम्ही कसाही विनियोग करा. हे तुम्हाला कबूल असेल तर मी उद्यापासून शिकवणीस येईन.”

आमच्या सासूबाईंनी ते कबूल केले व दुसऱ्या दिवशी सुब्बण्णा शिकवणीस आले. पण हे सारे आमच्या सासऱ्यांना माहीत नव्हते. सुब्बण्णा ही गोष्ट मला सांगताना म्हणाले, “पाहिलंत अपील. सुभेदारांच्यापेक्षाही सुभेदारीणबाई जास्त हिकमती!”

मी हसलो, सुब्बण्णांनी बोलणे पुढे चालू केले.

“तिथंही जरी अन्याय झाला तरी अपील करावयाचंच.”

“कुठं?”

“परलोकात! शंकरानं हट्ट धरला तर आम्हीही हट्ट धरणारच व पार्वतीपुढे अपील करणार! सोडणार नाही.”

मी त्यांच्याकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावरून असे दिसून आले की ते जे काही म्हणाले त्यावर त्यांची श्रद्धा होती. इहलोकातील वागणुकीवरून तेथील गती ठरते यावर त्यांचा विश्वास होता.

# ११

अशीच चार वर्षे गेली. या अवधीत सांगण्यासारखे काही फारसे घडले नाही. पण माझी त्यांची गाठ पडली याच काळात. ललितेस मला द्यावे असे ठरल्यामुळे सुब्बण्णांना माझ्याविषयीही ममता वाटू लागली. आम्ही कधीमधी एकमेकांशी बोलू लागलो. मलाही संगीत शिकण्याची आवड होती. सुब्बण्णा मलाही शिकवू लागले. सुब्बण्णांच्या स्वभावाचे मला हळूहळू दर्शन होऊ लागले. 'हे खरेच मोठे आहेत, गानयोगी आहेत, देवाचा साक्षात्कार झालेले आहेत' असे मला मनापासून वाटत होते.

सुब्बण्णा कधीच घरी झोपत नव्हते. एकदा आमचे सासरे त्यांना म्हणाले, "सुब्बण्णा, उगीच कशाला इकडे तिकडे राहाता! आमच्याकडे राहायला लागा. जागेची काही कमतरता नाही. तुमचा आमचा घरोबाही चांगला आहे."

ह्याचा परिणाम असा झाला की, पुढील चार दिवस सुब्बण्णा सासऱ्यांच्या घरीच आले नाहीत! "रहावयाचं नसलं तर राहू नका, पण शिकवणीस या" असा आमच्या सासऱ्यांनी निरोप पाठवला. आमच्या सासऱ्यांची सुब्बण्णांना जरा भीतीच वाटावयाची, कारण दर खेपेस आमच्या सासूबाई सासऱ्याची कड घेऊन बोलू लागल्या तर उत्तर देणे जड जाईल हे सुब्बण्णा ओळखून होते.

ललितेच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपला काहीतरी विशेष मानसन्मान करणार आहेत ह्याची एकदा सुब्बण्णांना कुणकुण लागली. सुब्बण्णा तीनचार दिवस अदृश्य झाले. वाढदिवसाला ते नव्हतेच. तीन दिवसांनंतर ते आले. आमचे सासरे त्यांच्यावर उखडले. पण सुब्बण्णांनी लक्षच दिले नाही. ललितेच्या लग्नातही तसेच घडले. जेव्हा जेव्हा आमचे सासरे सुब्बण्णांचा काही सत्कार करावा असे ठरवत तेव्हा तेव्हा सुब्बण्णा तो प्रसंग चुकवत. अशा स्वभावाची मी पाहिलेली ही एकच वल्ली. आमच्या घरच्या सर्व लोकांवर प्रेम असूनही प्रेमपाशात सापडू नये असा जाणीवपूर्वक प्रयत्न सुब्बण्णा करीत असत. शेवटपर्यंत ते तसेच वागले.

आमच्या सासऱ्यांची बेंगळूरला बदली झाली, हे जेव्हा सुब्बण्णांना कळले तेव्हा त्यांचा चेहरा उतरला. मी तेव्हा तेथेच होतो. मी विचारले, "काय सुब्बण्णा, झालंय काय तुम्हाला?"

"बाबारे, मी ह्या सर्वांना सांगत होतो की माफ करा मला, तुमच्या लोभात अडकवू नका. मला कठीण प्रसंगात पाडू नका. पण ह्या लोकांनी ऐकलं नाही."

"असला कोणता कठीण प्रसंग?"

"हाच की-तुम्हाला मी पाहिलंच नसतं व तुम्ही निघून गेला असता तर मला कधी दुःख झालं असतं का? आता पहा! सारे दुसऱ्या गावी गेल्यावर मला रात्रभर झोप येणार नाही व मन शांत करण्यासाठी मला देवळात बसून 'शक्ती दे' अशी प्रार्थना करावी लागेल."

त्या दिवशी संध्याकाळी मी त्याच्यापाशीच होतो. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर त्यांनी आपणहून स्वतःचे चरित्र सांगावे असे सूचक प्रश्न मी करू लागलो व सुब्बण्णा जसेजसे सांगत गेले तसतसा मी त्यांना प्रतिसाद देऊ लागलो. एकदोन तात्त्विक मुद्यांवरही बोलणे झाले. सुब्बण्णांनी आपले संपूर्ण चरित्र सांगितले. "दुथडी भरून वाहणाऱ्या नदीचे पाणी लाल असते व नदीचे पात्र रोडावत जाते तसे पाणी स्वच्छ होत जाते." ह्या वाक्याने सुब्बण्णांनी आपल्या आत्मकथेचा शेवट केला. नंतर मी म्हणालो, "गुरुजी, संसार सोडून सुख मिळवलं तर ते सुख नव्हे. संसार करून विरक्त राहणं म्हणजेच खरं सुख. तुम्ही जर संसारच केला नसता तर हा सारा संस्कार तुमच्यावर झालाच नसता."

"हा शेवटच्या टप्प्यापर्यंत पोचल्यावर या असल्या संस्कारावाचून काय अडलं होतं?"

मी त्याला काही उत्तर देऊ शकलो नाही. पुष्कळ वेळ आम्ही गप्पा मारल्या व नंतर मी निघून आलो.

आम्ही गाव सोडेपर्यंत पुन्हा कधी सुब्बण्णा दिसले नाहीत. त्यामुळे आमच्या सासूबाईंना काळजी वाटली. मुंबईच्या सावकाराने दिलेले शंभर रुपये सुब्बण्णांनी आमच्या सासऱ्यांच्यामार्फत बँकेत ठेवले होते. शेवटच्या काळात ते पैसे उपयोगी पडावेत म्हणून अशी व्यवस्था त्यांनी केलेली होती. आमच्या सासऱ्यांनी दिलेले पैसेही त्यांनी माझ्या सासूबाईंच्याच हाती दिले होते. सासूबाईंनी ते पैसे खर्च केले नव्हते. गवा सोडताना सारे पैसे जमवून सुब्बण्णांच्या हाती देण्याचा त्यांचा विचार होता. पण आता सुब्बण्णाच नव्हते. त्यामुळे सासूबाईंनी माझ्यापुढे ही अडचण सांगितली. मला सासऱ्यांना हे सारे सांगावे लागले. प्रथम सासरे जरा नाराज झाले. नंतर आपल्या बायकोला म्हणाले, "खरं आहे, मी हट्टी आणि तेही हट्टी. तू तरी काय करणार?" असे म्हणून सासऱ्यांनी ते साठलेले पैसे बँकेत सुब्बण्णांच्या नावे जमा केले व ही घटना सुब्बण्णांना कळविण्यास वेंकटरमणास सांगितले. सुब्बण्णांच्याकडे लक्ष द्या असे गावच्या प्रतिष्ठित लोकांना सांगून आम्ही सारे बेंगळूरला निघालो.

आम्ही तीन मैल प्रवास केला असेल नसेल, तेवढ्यात कोणीतरी आमच्याकडे धावत येत होते. त्यामुळे आम्ही गाडी थांबवली. धावत आलेले दुसरे कोणी नसून स्वतः सुब्बण्णाच होते. "हा संसारपाश नको म्हणून मी निघून गेलो होतो. पण मला राहवलं नाही. ललितेला पाहावं असं वाटलं म्हणून असा मी धावत आलो."

"अरे बिचाऱ्या ब्राह्मणा! आधी पळून जावयाचं व मग धावाधाव करावयाची हा काय प्रकार आहे?" असे माझे सासरे म्हणावयाचे. कारण त्यांना सुब्बण्णांची वागण्याची सारी पद्धत व त्यांच्या मनाची ठेवण माहितीची झाली होती. सुब्बण्णांनी ललितेस जवळ बोलावून आशीर्वाद दिला व सासऱ्यांना नमस्कार केला. मलाही आशीर्वाद दिला व माझ्या सासूबाईंना नमस्कार करून ते आले तसेच घाईघाईने निघून गेले.

चार वर्षांनंतर सुब्बण्णा बेंगळूरला आले. आमच्या मुलास पाहून त्यांना फार आनंद झाला. "तुम्हाला साऱ्यांना सोडून मला राहता येईल की नाही या भीतीनं मी त्या दिवशी पळून गेलो होतो. पण तुमची गाडी पाहताच माझा प्राण थबकला. त्या दिवशी मी परत घरी गेलो नाही. माझं शरीरच परत गेलं."

आम्ही सर्वांनी त्यांचे आदरातिथ्य केले. एक दिवस ते आमच्याकडे राहिले. दुसऱ्या दिवशी परत गेले. परत जाताना पूर्वीप्रमाणे ते बेचैन नव्हते. आता त्यांना मानसिक परिपक्वता आल्यामुळे ते स्थितप्रज्ञ बनले होते. आम्हाला भेटावे असे त्यांना वाटले त्यातही काही गैर वाटले नाही, म्हणून ते आले आणि सर्वांना भेटले. परत निघाले त्याचेही त्यांना दुःख वाटले नाही. आम्ही मात्र त्यांना म्हणालो, "आता इथंच काही दिवस रहा. उद्याचा एक दिवस तरी राहून जा." पण त्यांनी आमचे ऐकले नाही व ते सरळ निघून गेले.

गावी जाण्याच्या दिवशी सकाळी सुब्बण्णा म्हणाले, "आम्हाला तो विसरला असं दिसतं."

"कोण?" मी विचारले.

"यमधर्म!"

यावर काय बोलावे मला कळेना. आमचे सासरे म्हणाले, "काही चिंता करू नका! सुब्बण्णा, तो तुम्हाला विसरणार नाही."

सुब्बण्णांना जगणे पुरे झाले होते, त्याचा अर्थ ते वैतागले होते असा नव्हे. पण 'आता बस' येवढेच वाटत होते. ती वेळ लवकरच आली. ते गावी परतल्यानंतर एका आठवड्यात वेंकटरमणाचे आम्हाला पत्र आले. त्यात त्याने लिहिले होते की, "तीन दिवसांपूर्वी सुब्बण्णा देवळापासून पन्नास फूट अंतरावर असलेल्या एका झाडाखाली हात जोडून देवाचे ध्यान करीत होते. तशा स्थितीतच त्यांचा प्राण गेला! गावातील सर्व ब्राह्मणांनी मिळून त्यांची उत्तरक्रिया केली. तो खर्च सारा निघून अजून बँकेत दोनशेच्या वर पैसे आहेत. त्यामधून दर वर्षी देवळामध्ये त्यांच्या नावानं अन्नसंतर्पण होईल अशी व्यवस्था करतो. कारण त्यांची तशी इच्छा होती ."

त्या दिवशी आमचा कुणी जवळचाच नातलग गेला असे आम्हांला वाटले.

या रीतीने सुब्बण्णांनी आपले जीवननाटक संपवून मुक्ती मिळविली.

# १२

मुक्ती नावाचे काहीतरी असेल तर ते सुब्बण्णांना निश्चित मिळाले यात मला काही संशय नाही.

मी एकदा सुब्बण्णांना विचारले होते की संगीतात हे सात सात स्वरांचेच सप्तक कां असते? "सात असे ठरविले म्हणून सात. नाहीतर स्वरांना हिशोब नाही. शंभर कोटी स्वरही निघतील अगर सारा मिळून एकच स्वरही होईल." असे सुब्बण्णांनी त्यावर उत्तर दिले. सुब्बण्णांचे फिडलवादन ऐकताना त्यांच्या त्या उत्तराचा प्रत्यय येत असे. आणखी एकदा मी त्यांना विचारले, "द्वैत आणि अद्वैत यांत श्रेष्ठ कोणते?"

"माझ्या जीवनदृष्टीतून पाहिले तर अद्वैत चांगले. पण तिच्या जीवनाकडे पाहिले तर द्वैतच चांगले."

मी गप्प होतो. त्यांचे बोलणेच या थाटाचे असे. एका क्षणानंतर मी विचारले, "तिचे म्हणजे कुणाचे?" थोड्या वेळानंतर ते म्हणाले, "जाताना ती असं म्हणाली, "इतके दिवस तुमच्या सावलीत राहून मी गौरीपूजन केलं. आता ती गौरच मला बोलावत आहे. तुम्हाला एकट्यांना सोडून जात आहे. ह्याचं मला दुःख होतं. पोटची पोरं सारी निघून गेली. पण काय करावयाचं? कर्म संपताच तुम्हीही येथे यालच. मी तेथेच असेन. मग आपण दोघे मिळून देवीची सेवा करू.' तिचं जीवन पाहिलं तर द्वैतच बरं असं वाटतं. आणि माझं जीवन पाहिलं तर हा खेळ जितका लवकर संपेल तेवढा बरा, म्हणजे अद्वैत साधलं म्हणजे झालं."

आणखी एकदा मी विचारले , "सुब्बण्णा, शिव श्रेष्ठ की विष्णु?" सुब्बण्णांनी उत्तरच दिले नाही. मला वाटले की त्यांना माझे बोलणे ऐकू आले नसावे. पण थोड्याच वेळाने त्यांनी फिड्ल् हाती घेतले आणि शंकराभरण राग पाऊण तास आनंदाच्या तंद्रीत वाजवला. आदले दिवशी त्यांनी भैरवी असाच वाजवला होता. त्यांचा शंकराभरण राग ऐकत असताना माझे त्यांचे बोलणें काय झाले होते हे मी पार विसरून गेलो होतो. "वा! सुब्बण्णा, काय छान राग आहे! काय पण आलापी! खूपच रंग भरला!" असे मी म्हणताच सुब्बण्णांनी विचारले, "कालचा भैरवी राग कसा होता?"

"उत्तम."

"भैरवी श्रेष्ठ की शंकराभरण श्रेष्ठ?"

अशी सुब्बण्णांची उत्तर देण्याची पद्धत होती.

सुब्बण्णांना गायनाच्या माध्यमानेच सारी तत्त्वे कळून गेली होती. तशीच त्यांची साधनाही होती. अशा जाणिवेच्या, अशा साधनेच्या माणसाला जी गती मिळते त्याला मुक्तीशिवाय दुसरे नाव देता येईल का?

## महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाची आगामी प्रकाशने

**भाषांतरमाला**

मी इसाडोरा, अनुवादक : श्रीमती रोहिणी भाटे
महाराष्ट्रातील संगीताचे कार्य, अनुवादक : श्री. श्री. ह. देशपांडे
समाजवाद विरुद्ध भांडवलवाद, अनुवादक : प्रा. जी. लु. गांधी
डॉन क्विक्झोट, भाग १ व २, अनुवादक : श्री. दा. न. शिखरे
देकार्तची चिंतने, अनुवादक : डॉ. दि. य. देशपांडे
असे होते मुघल, अनुवादक : श्री. ज. स. चौबळ
ॲरिस्टोफेनीसची नाटके, अनुवादक : श्री. शा. नी. ओक

**विज्ञानमाला**

बुद्धिबळे, लेखक : श्री. ना. रा. वडनप
सुती वस्त्रोद्योग, लेखक : श्री. न. गो. देवधर
छायाचित्रणकला, लेखक : श्री. के. बा. गोडबोले